


# चित्रग्रीव

## एका कबुतराची कथा

धन गोपाळ मुखर्जी

अनुवाद
मारुती चितमपल्ली

चित्रांकन
बोरिस अर्टझिबॅशेफ



# चित्रग्रीव

## एका कबुतराची कथा

**धन गोपाळ मुखर्जी**

चित्रांकन

**बोरिस अर्टझिबॅशेफ**

अनुवाद

**मारुती चितमपल्ली**

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

# अनुक्रमणिका

*प्रस्तावना* 5

**भाग पहिला**

चित्रग्रीवाचा जन्म 7

चित्रग्रीवाचे शिक्षण 12

दिशांची ओळख 18

चित्रग्रीव हिमालयात जातो 23

चित्रग्रीवाच्या शोधात 39

चित्रग्रीवाचे पलायन 53

चित्रग्रीवाची कथा 56

चित्रग्रीवाचे आत्मपुराण (चालू) 63

**भाग दुसरा**

युद्धाकरिता चित्रग्रीवाचे शिक्षण 77

युद्धाकरिता शिक्षण (चालू) 84

चित्रग्रीवाचा प्रणय 96

चित्रग्रीवाला युद्धाची हाक 102

दुसरे साहस 111

सर्वेक्षणासाठी महाजनाचे प्रयाण 116

चित्रग्रीवाने संदेश कसा नेला (आत्मपुराण) 124

तिरस्कार आणि भयापासून मुक्ती 130

लामाचा शहाणपणा 140

# प्रस्तावना

धन गोपाळ मुखर्जी यांचे नाव भारतीयांना फारसे परिचित नाही. असामान्य अशा लेखकात त्यांची गणना होते. *चित्रग्रीव (गे-नेक)* ही त्यांची प्रमुख साहित्यकृती आहे. 1928 साली या पुस्तकाला न्यूबेरी हा पुरस्कार प्राप्त झाला. न्यूबेरी वाङ्मय गौरव पुरस्कार अमेरिकन लायब्ररी असोसिएशनतर्फे दर वर्षी दिला जातो. बालसाहित्यात ज्यांनी अपूर्व मोलाची भर घातली आहे अशा साहित्यिकांना तो मिळतो. हा सन्मान मोठ्या प्रतिष्ठेचा मानला जातो. गेल्या पाऊण शतकात ज्यांना हा पुरस्कार मिळाला आहे, त्यात मुखर्जी हे एकमेव भारतीय आहेत.

बालसाहित्यात दरवर्षी सहस्रावधी पुस्तके भारतामध्ये प्रसिद्ध होतात. ती बहुतेक पांडित्य मिरवणारी, तसेच नीतीपाठ आणि उपदेश देणारी असतात. असे वाङ्मय मुलांच्या कल्पनाशक्तीला भावत नाही. वनस्पती सृष्टी आणि जीवसृष्टी यांनी भारत देश समृद्ध आहे. भारतातील विविध वन्यजीवांविषयी अगदी थोडी पुस्तके मुलांसाठी लिहिली गेली आहेत. भारतातील पक्षीजीवनाविषयी माहिती देणारी सुंदर पुस्तके उपलब्ध आहेत. त्यात खूप काही तपशील दिलेला असतो. पण केवळ अशा रीतीने पक्ष्यांचा परिचय करून देण्यापेक्षा मुलांना पाखरांच्या जीवन संगीताचा समग्र परिचय करून घेणे अधिक आवडेल. *चित्रग्रीव* ही साहित्यकृती अशा साहित्याची उणीव भरून काढते. या पुस्तकातील शास्त्रीय माहिती कथेच्या पटावर विणली आहे. सत्य आणि कल्पिताची सुरेख गुंफण केली आहे म्हणून ती निर्मितीच्या पातळीवर गेल्यामुळे वाचनीय झाली आहे. मूळ इंग्रजीतील *चित्रग्रीवा*ची पुनरावृत्ती काढण्यासाठी साठ वर्षाचा अवधी लागावा यावरून बालवाङ्मयविषयी भारतात किती उदासीनता आहे हे दिसून येते. एडवर्ड हॅमिल्टन एटकेन अथवा *इहा* हे भारतातील एक श्रेष्ठ निसर्ग लेखक होते. *नॅचरॅलिस्ट ऑन प्राऊल,* आणि *द कॉमन बर्डस ऑफ इंडिया* ही त्यांची उत्तम दर्जाची पुस्तके पन्नास वर्षांपासून अधिक काळ दुर्मीळ झाली आहेत.

*चित्रग्रीव* जरी मूलतः मुलांसाठी लिहिले असले, तरी रानावनातून भ्रमण करणाऱ्या निसर्गप्रेमींना आनंद देणारे हे पुस्तक आहे. कबुतराच्या जीवनाविषयी

त्यात सूक्ष्म निरीक्षण आहे. त्यात हिमालयातील वनस्पती जगताविषयी सुंदर वर्णने आहेत. कोलकात्यातील एका पाळीव कबुतराची आणि संवेदनशील मुलाची ही कथा आहे. कबुतराला संदेश वाहकाचे काम शिकविले जाते. त्याला हिमालयात नेण्यात येते. तेथे तो हरवतो. त्याला अनेक साहसातून जावे लागते. पहिल्या जागतिक महायुद्धात फ्रान्समधील हिंदुस्तानी सैनिकांनी कबुतराचा उपयोग गोपनीय संदेश पाठविण्यासाठी केला होता.

धन गोपाळ मुखर्जी (1890-1936) यांचा जन्म कोलकात्यानजीक असलेल्या गावी झाला. ते पुरोहित घराण्यातील होते. वयाच्या एकोणिसाव्या वर्षी ते अमेरिकेत गेले. कॅलिफोर्निया आणि स्टॅन्फर्ड या विद्यापीठांत त्याचे शिक्षण झाले. अमेरिकन मुलीशी त्यांचा विवाह झाला. पुढे ते अमेरिकेत स्थायिक झाले. आयुष्यभर त्यांनी लेखन केले आणि व्याख्याने दिली. कुमारांसाठी त्यांनी प्राण्यांविषयी नऊ पुस्तके लिहिली. त्यात *कारी द एलिफंट* (1922), *हरी द जंगल लॅड* (1929) आणि *गोंड द हंटर* (1928) या प्रमुख पुस्तकांचा समावेश आहे. भारतभूमीचा त्यांना कधी विसर पडला नाही. भारतीय कथा, कहाण्या, धर्म, याविषयी त्यांनी अगदी हळुवार मनाने लिहिले. *चित्रग्रीव* हे खरोखर साऱ्या मानव जातीला प्रेम, धैर्य आणि शांतीचा संदेश देणारे कबुतर आहे.

एप्रिल 1998 अरविंद गुप्ता
नवी दिल्ली

## चित्रग्रीवाचा जन्म



कोलकाता शहराची लोकसंख्या दहा लाखांहून अधिक असावी. परंतु त्याच शहरात आढळून येणाऱ्या कबुतरांची गणना केली तर ती लोकसंख्येपेक्षा दुप्पट तरी असावी. प्रत्येक तिसऱ्या घरटी कबुतरे पाळण्याचा लोकांना शौक आहे. तिथे निदान दहा-बारा कबुतरे तरी पाळलेली असतात. त्यात काही आकाशात उंच उडणारी 'गिर्रेबाज', तर ज्यांचे शेपूट जपानी ललनाच्या हातातील पंख्याप्रमाणे असते, त्यांना 'लक्का' म्हणतात. हातांनी थोपटले असता जे जमिनीवर 'लोळण' घेते-ते लोटण इत्यादी जातीची असतात. कबुतरे मनोरंजनासाठी (म्हणजे *पारावत विनोद*) पाळण्याची प्रथा भारतात हजारो वर्षांपासून चालत आलेली आहे. गिर्रेबाज आणि लोटण या दोन शोभिवंत जातीच्या कबुतरांचा जन्म भारतातच झाला आहे. अनेक शतकांपासून राजे, महाराजे, राण्या आणि राजकुमारांनी आपल्या प्रासादात कबुतरांचे पालन आणि पोषण केले आहे. तसेच गरिबांनी आपल्या चंद्रमौळी घरांत त्यांना आश्रय दिला आहे. अमीर-उमरावांची उद्याने, अलिशान निवासस्थाने आणि कारंजी यांना त्यांनी सुशोभित केले आहे. सामान्य जनांच्या लहान शेतीवाडीत आनंद निर्माण केला

आहे. प्रत्येक कबुतराचे घुमणे वेगळे, त्यांचे रंग आगळे वेगळे आणि गुंजासारखे डोळे असलेले शुभ्र वर्णाची कबुतरे वेगळी.

आजही भारतातील कुठल्याही मोठ्या शहरातून परदेशी लोकांनी हिवाळ्यातील एखाद्या सकाळी फेरफटका मारला तर अनेक मुले घराच्या माळवदावर उभे राहून हातातील पांढऱ्या निशाणांनी स्वच्छ आकाशात उडणाऱ्या कबुतरांना पालविताना दिसतील. निळ्या आभाळातून कबुतरांचे थवे एखाद्या ढगासारखे तरंगत असतात. कबुतरांची लहान लहान भिरे सुरुवातीला आपापल्या धन्याच्या माळवदावर घिरट्या घालीत उडताना दिसतील. ती हळूहळू उंच आकाशात झेप घेतात. साऱ्या शहरातील कबुतरांच्या झुंडी एकत्रित उडू लागतात. हा विशाल समुदाय उडत उडत पार दृष्टीआड होतो. मग हे कबुतरांचे थवे आपल्या धन्याच्या माळवदावर बिनचूक कसे उतरत असतील हे एक आश्चर्यच. कारण गुलाबी, पिवळी, जांभळी आणि पांढऱ्या रंगाची घरे आभाळातून बहुधा एकसारखीच दिसतात.

दिशा ओळखण्याचे अद्भुत ज्ञान आणि आपल्या मालकावरील प्रेम ही कबुतरांची वैशिष्ट्ये आहेत. कबुतरे आणि हत्ती यांच्यासारखे एकनिष्ठ जीव इतर प्राणिजगतात तर माझ्या पाहण्यात नाहीत. या दोन्ही प्राण्याच्या संगतीत मी राहिलोय. दोन सुळे आणि चार पाय असलेला हत्ती, तसेच गावातील अथवा शहरातील दोन पंखांचे कबुतर कितीही दूर भटकले तरी अगदी अचूक उपजत जाणिवेने ते आपला मित्र आणि बंधू असलेल्या माणसाकडे अचूक परत जातील.

कारी नावाचा हत्ती माझा दोस्त होता. मी पाळलेल्या कबुतराचे नाव होते 'चित्रग्रीव'. म्हणजे विविधरंगी कंठ असलेला. गळ्यावरील झगझगीत विविध रंगांच्या रेषांमुळे चित्रग्रीव अतिशय सुंदर दिसे. सूर्याच्या प्रकाशात त्याचा कंठ बहुरंगी दिसायचा. म्हणून त्याला आम्ही 'इंद्रनीळ कंठी' असेही म्हणत असू.

अर्थात चित्रग्रीवाला हे लावण्य जन्मताच मिळाले नव्हते. सुरुवातीला



दूधभुरा असलेले हे कबुतराचे शावक दिवसेंदिवस वाढत असता तीन महिन्यांनी त्याला सुरेख पंख फुटले. असा लावण्यसंपन्न कंठ घेऊन तो जन्माला येईल असे कधी वाटले नव्हते. त्याला आकर्षक रूप लाभले होते. आमच्या गावातील चाळीस हजार कबुतरांत तो सर्वांगसुंदर होता.

परंतु चित्रग्रीवाची कहाणी अगदी सुरुवातीपासून सांगायला हवी. ती त्याच्या आईबापांपासून सुरू होते. त्याचा जन्मदाता लोटण कुळातील होता. त्या काळात रुपसंपन्न असलेल्या चारुगात्रीशी त्याचा समागम झाला. संदेश पाठविण्यासाठी ज्या कबुतरांचा उपयोग केला जातो त्या कपोत कुळात तिचा जन्म झाला होता. म्हणूनच चित्रग्रीव पुढच्या आयुष्यात युद्ध आणि शांततेच्या काळात कुशल संदेशवाहक झाला. आईपासून त्याला शहाणपणा मिळाला होता. शौर्य आणि प्रसंगावधान हे गुण त्याला पित्यापासून लाभले होते.

तो इतका प्रसंगावधानी होता की बहिरी ससाण्याच्या तावडीतून अगदी त्याच्या तोंडावर कोलांटया घेत शेवटच्या क्षणी सुटका करून घेई. परंतु हे सारे नंतरचे. ते पुढे योग्यवेळी सांगेनच.

चित्रग्रीव अंड्यात असतांनाची गोष्ट. त्यावेळी तो एका जीवाच्या संकटातून वाचला. तो दिवस मला अजूनही आठवतो. त्याच्या आईने घातलेल्या दोन अंड्यांपैकी एक अंडे चुकीने माझ्या हातून फुटले. तो म्हणजे माझा मूर्खपणाच होता. अजूनही मला त्याचा पश्चाताप होतो. कुणी सांगावे! त्या नष्ट झालेल्या अंड्यातून जगातील एखाद्या जातिवंत कबुतराचा जन्म झाला असता! त्याचे असे झाले--आमचे घर चार मजली. चौथ्या मजल्याच्या माळवदावर कबुतरखाना होता. चित्रग्रीवाच्या आईने कबुतरखान्याच्या खणात (पिजन होल) अंडी घातली होती.

अंडी उबविण्याचे तिचे काम चालू होते. काही दिवसांनी त्या खणाची साफसफाई करण्यासाठी मी तिला अंड्यांवरून माळवदावर ठेवले. त्यातील एक एक अंडे हळुवार काळजीपूर्वक उचलून शेजारच्या खणात ठेवले. त्या खणातील तक्तपोशीवर कापूस अथवा लोकर

नव्हती. घरट्यातील काडीकचरा काढून मी ते स्वच्छ केले. त्यानंतर शेजारच्या खणातील एक अंडे उचलून परत घरट्यात ठेवले. दुसरे अंडे उचलण्यासाठी मी खणात सावकाश हात घातला तोच माझ्या तोंडावर जबरदस्त फटका बसला. पाहतो तो चित्रग्रीवाचा जन्मदाता माझ्या चेहऱ्यावर पंखाचा मारा करीत होता. पंजाच्या नखांनी त्याने माझे नाक बोचकारले. त्या अचानक आघाताने मी पार बावरून गेलो. त्याक्षणी अनावधानाने माझ्या हातातील अंडे कधी खाली पडले हे मला कळलेदेखील नाही. तोंड आणि डोके यावर होणाऱ्या माराचा मी दोन्ही हात आडवे करून प्रतिकार करीत होतो. शेवटी तो उडून दूर गेला. परंतु आता जे घडले त्याला नाइलाज होता. ते चिमुकले अंडे फुटून माझ्या पायाजवळ पडले होते. मी त्या आडमुठ्या कबुतरावर, तसेच स्वतःवरच चरफडत राहिलो. कारण घरट्याची साफसफाई करताना तो माझ्यावर हल्ला करील याचा अंदाज यायला हवा होता. मी अंडी चोरत असल्याचा चित्रग्रीवाच्या बापाचा समज झाला होता. त्याने स्वतःचे प्राण धोक्यात घालून घरट्यातील अंडी चोरण्यापासून मला परावृत्त केले होते. पाखरांच्या विणीच्या काळात घरट्याला हात लावायला गेलात तर अशा तऱ्हेचे त्यांचे आचरण अपेक्षितच आहे.

पुढची कथा. चोचीने अंडे कधी फोडायचे हे चित्रग्रीवाच्या आईला माहीत होते. चित्रग्रीवाचे या जगात पदार्पण व्हावे म्हणून त्याचा बाप सकाळपासून दुपारपर्यंत अंड्यावर बसत असला तरी पिलाचा जन्म कुठल्या क्षणी होईल हे मात्र त्याला ठाऊक नसायचे. फक्त त्याच्या आईलाच तो जन्माचा क्षण कधी येईल हे कळत असे. जीवनदायी पिवळ्या आणि पांढऱ्या बलकाचे रूपांतर अर्भकात कधी होते ते तिला कोणत्या बिनतारायंत्री संदेशाने कळत असेल, याविषयी मात्र आपणाला काहीच ज्ञान नाही! अंड्यातील शावकाला कसलीही इजा, न होता कोणत्या भागावर अचूक वेळी चोच मारावी याची तिला जाण असते. मला तर हा सारा प्रकार एक चमत्कारच वाटायचा. वर वर्णन



केल्याप्रमाणे चित्रग्रीवाचा जन्म झाला. अंडे घातल्यापासून विसाव्या दिवशी मी त्या घरट्याकडे पाहिले, तेव्हा चित्रग्रीवाची आई अंड्यावरून उठली होती. माळवदावरून उडत तिचा जोडीदार घरट्याकडे धाव घेऊन अंड्यावर बसण्याचा प्रयत्न करी. परंतु प्रत्येकवेळी चोचीने टोचा मारून नवऱ्याला हुसकावून देई. तो नाराजीने आपल्या भाषेत कूजन करून जणू तिला विचारी, "अग, तू मला अशी दूर का लोटतेस!"

ती आई त्याला पुन्हा टोचा मारे, जणू तिचे म्हणणे असे, "कृपया इथून जा. ही वेळ फार महत्वाची आहे."

शेवटी बिचारा दूर उडून गेला. ते अंडे कधी एकदा उबवेल याची मला काळजी वाटत होती. तो असा दूर निघून गेल्यामुळे, त्या अंड्याला पुरेशी ऊब मिळेल की नाही या विचाराने माझी चिंता अधिक वाढली. कबुतरखान्याच्या खणीतल्या घरट्याकडे मी आतुरतेने पाहू लागलो. पळे गेली, घटका गेल्या परंतु घडत काहीच नव्हते. काही वेळाने आई कलती मान करून कदाचित अंड्यातील जीवाच्या हालचालीचा कानोसा घेत होती. नंतर तिने अंड्यावर हळुवार टोचा मारला. तसे तिचे सारे अंग थरथरू लागले. जणू तिच्या सर्वांगातून एक लहर गेली. आणि त्याबरोबरच तिचा आत्मविश्वासही वाढला. निश्चयाने तिने आपली मान उंच केली आणि बरोबर वेध घेतला. त्या क्षणी अंड्याचे कवच फुटले. त्यातून एक इवलासा कंप पावणारा जीव बाहेर पडला. माझी नजर आईकडे गेली. ती आश्चर्यचकित झालेली दिसत होती. इतके दिवस ती याच कौतुक सोहळ्याची वाट पाहत होती काय? एवढासा चिमुकला असहाय जीव! पिलाची ही अगतिकता पाहून तिने त्याला छातीवरील निळ्या, मुलायम-उबदार पिसांखाली घेतले.

# चित्रग्रीवाचे शिक्षण



पाखराच्या दुनियेत दोन आनंद सोहळे असतात. पहिला प्रकाश दर्शनाचा आणि दुसरा उदरभरणाचा. पिलाला प्रकाशाचे दर्शन व्हावे म्हणून आई चोचीने अंड्याचे टरफल हळुवार फोडते. नंतर त्या शावकाचे पाखरमायेने पालन पोषण करते. आईवडिलांनी अलोट माया करून चित्रग्रीवाला वाढविले. आई आपल्या बाळाचे जसे पालन पोषण करते तसे चित्रग्रीवाचे मातापिता त्याच्यावर माया आणि प्रेम करीत. अशा असहाय अवस्थेत पिलांना अन्नापेक्षा पाखरमायेची अधिक गरज असते. अशा काळात कबुतरखान्याच्या खणीतील घरट्यांत ऊब निर्माण होण्यासाठी अधिक कापूस अथवा लोकर भरू नये. पुरेशी ऊब येण्यासाठी या वस्तू मऊ आणि उबदार बिछायतीपुरत्या ठेवल्या तरी त्यांची गरज भागते. पिलाच्या वाढीबरोबर त्याच्या शरीरातून अधिक अधिक उष्णता बाहेर पडू लागते. अज्ञानी कबुतर शौकिनांना याची कल्पना नसते. मला तर वाटते की या काळात त्यांच्या घरट्याची वारंवार स्वच्छतादेखील करू नये. त्यांचे आईबाप घरट्यांत जे काही अवशेष राहू देतात ते पिलांकरिता पोषकच असते.

आजही मला चित्रग्रीवाच्या जन्मानंतरचा दुसरा दिवस आठवतो. आईबाप त्याला भरविण्यासाठी आले की ते सानुले पाखरू इवलीशी चोच वासायचे. गुलाबी पिवळसर रंगाचे त्याचे दूधभुरा अंग एखाद्या भात्याप्रमाणे वरखाली व्हायचे. माय किंवा बाप त्याच्या तोंडात आपली चोच घालून दुधासारखा पातळ पदार्थ भरवीत. चरलेल्या दाण्यागोट्यांतून हे दूध त्यांच्या शरीरात तयार होई. हा दुधासारखा द्रव पदार्थ एखाद्या पातळ खिरीसारखाच असतो. पिलू महिन्याचे होईपर्यंत त्याचे भरण पोषण अशाच दुधावर होते. परंतु दाण्याचा चारा देणे गरजेचे असेल तर पहिल्यांदा ते दाणे तोंडात ठेवून ओले आणि मऊसर झाल्यावरच पिलांना भरवितात.

चित्रग्रीव नेहमीच भुकेला असे. आईबापांपैकी एकजण त्याला सतत अन्न भरविण्याच्या उद्योगात असे. तर दुसरा त्याला ऊब देण्यासाठी घरट्यांत राही. मला वाटते उबारा देण्याचे काम त्याचा बाप करी. तो आईच्या ममतेने त्याच्यावर पाखरमाया घाली. परिणामी चित्रग्रीवाने चांगलेच बाळसे धरले. त्याच्या अंगावरील दूधभुरा वाढू लागला. तो सायी रंगाचा दिसू लागला. नंतर साळूच्या कोवळ्या काट्यांसारखी पांढरी पिसे येऊ लागली. असा कायापालट होऊन डोळे आणि मुखाजवळचे पिवळे पापुद्रे गळले. आता लांब, टोकदार आणि कठीण चोच दिसू लागली. त्याची चोच किती कणखर आहे याचा अनुभव मला लगेच आला. तो तीनेक आठवड्याचा असतानाचा प्रसंग. एका मुंगळ्याने त्याच्या घरट्यात प्रवेश केला. त्याक्षणीच त्याला चोचीने फटकारा मारताच त्याचे दोन तुकडे झाले. त्याने मेलेल्या मुंगळ्याचा वास घेऊन बारकाईने पाहिले. जेव्हा त्याने मुंगळ्याला पहिल्यांदा पाहिले तेव्हा त्याला वाटले की ते बी असावे. अगदी अनावधानाने त्या निष्पाप जीवाला त्याने मारले होते. खरे म्हणजे मुंगळे कबुतरांना उपकारकच असतात. केलेल्या कुकर्माबद्दल त्याला पश्चाताप झाला असणार! नंतरच्या आयुष्यात मात्र तो कधी मुंगळ्याच्या वाटेला गेला नाही.

तो पाच आठवड्याचा झाला. तो दुडक्या चालीने घराच्या बाहेर

येऊन जवळच ठेवलेल्या परळातील पाणी पीत असे. तो चारा मिळविण्याचा प्रयत्न करी. तो त्याला अपुरा पडे. म्हणून आईबाप त्याला भरवीत असत. माझ्या मनगटावर बसून तो तळहातावरील दाणे टिपून घेई. ते वेचताना त्याला मोठी कसरत करावी लागे. गारुडी जसा हवेत चेंडू उडवितो तसा चित्रग्रीव एकदोनदा दाणा हवेत उडवून तो गट्ट करी. असे करतांना प्रत्येकवेळी तो माझ्याकडे सहेतुक पाही. तो मनात म्हणत असावा, "कसं? मला सारं जमतं ना! जेव्हा माझे मायबाप इथल्या माळवदावर ऊन्हं खायला येतील तेव्हा तुला त्यांना सांगावं लागेल की त्यांचा पोर किती हुशार आहे ते! तसे पाहिले असता माझ्या इतर कबुतरांपेक्षा तो शिकण्यात मागेच होता.

डोळ्यांना इजा न होता वाऱ्यावादळातून कबुतरे कशी वाट काढत असतील याचा मी विचार करीत होतो. त्याच वेळी मला या गोष्टीचा बोध झाला. चित्रग्रीव जसा दिवसेंदिवस वाढत होता तसा त्याच्या शरीरातही बदल घडत होता. मी त्याच्या डोळ्यांकडे बारकाईने बघत असता त्याच्या नेत्रांवर तलम पापुद्रा येत असल्याचे माझ्या ध्यानी आले. चित्रग्रीव आंधळा तर होणार नाही ना, या विचाराने मी मनात भ्यालो. मी त्याला घरट्यांतून माझ्या नजरेसमोर धरले अन् त्याच्या डोळ्यांकडे पाहू लागलो. त्याच्याकडे अशा रितीने मी एकटक पाहू लागल्यामुळे तो बुजला नाही. पुढच्या क्षणी आश्चर्य घडले. त्याच्या बुबळावरील पातळ पडदा बाजूला सरला. अन् तो सुंदर, सोनेरी डोळ्यांनी माझ्याकडे पाहू लागला. मी त्याला तसेच हातात धरून छपरावर नेले. मे महिन्यातील कडक उन्हे जिकडे तिकडे पडली होती. माझे सारे लक्ष त्याच्या डोळ्यांकडेच होते. त्यांवरील तलम पडदा पुन्हा एकदा सरकू लागला. तसे त्याचे तोंड मी सूर्याकडे वळविले. तिरीप लागताच सोन्यासारख्या चमकणाऱ्या नेत्रांवर परत एकदा पडदा पडला. नंतर माझ्या लक्षात आले की डोळ्यांवरचा तलम पडदा त्याला हवा तसा उघडझाप करता येतो. या त्याच्या चलत नेत्रपटलामुळे वाऱ्यावादळाला सामोरे जाऊनही डोळ्यांना अपाय होत



नाही. किंवा सरळ सूर्याच्या दिशेने उडतांना डोळे दिपून जात नाहीत.

कसे उडावे याचे पाठ दुसऱ्या पंधरवड्यात देण्यात आले. तो जरी पक्षिकुलातील असला तरी त्याचे पहिले उड्डाण काही सोपे नव्हते. मुलाला जरी पाण्याची ओढ असली तरी त्याला पोहायला शिकवावे लागतेच. पोहण्याचा सराव करतांना नाकातोंडात पाणी जाणारच! माझ्या कबुतराचीदेखील तीच गत झाली. भीतीने तो आपले पंखच उघडेना. तासन् तास तो छपरावर बसलेला असे. वाऱ्याची झुळूक त्याच्या अंगावरून जाई. परंतु त्याला उडण्याची अंतःकरण प्रवृत्ती अजिबात होत नसे.

या अगोदर आमच्या घराचे माळवद कसे होते हे सांगायला हवे. माळवदाच्या चोहोबाजूला कॉन्क्रीटची छातीइतकी उंच भिंत उभी होती. उन्हाळ्यात आम्ही माळवदावरच झोपत असू. झोपेत चालणारा माणूस देखील चौथ्या मजल्यावरून तोल जाऊन पडणे शक्य नव्हते.

चित्रग्रीवाला मी रोज त्या भिंतीवर सोडून द्यायचो. वाऱ्याकडे तोंड करून तो तासन् तास तिथे बसलेला असे. बस्स! त्याने कधी उडण्याचा प्रयत्न केला नाही. मी एकदा काही दाणे माळवदावर टाकून त्याला चुचकारून खाली उतरविण्याचा प्रयत्न केला. त्यावर काही क्षण त्याने माझ्याकडे चौकसपणे पाहिले. नंतर खाली पडलेल्या दाण्यांकडे पाहू लागला. एकदा माझ्याकडे नजर टाकणे, नंतर पडलेल्या दाणेगोट्यांकडे बघणे—असा त्याचा क्रम बराच वेळ चालू होता. शेवटी त्याची खात्री झाली की हे चविष्ट दाणे मी काही त्याच्या मुखाजवळ नेणार नाही. तसा तो भिंतीवरून इकडून तिकडे चालू लागला. मध्येच मान वळवून तो खाली पडलेल्या दाण्याकडे पाहू लागला. जवळ जवळ पंधरा एक मिनिटे मी त्याची आतुरतेने वाट पाहिली. नंतर त्याने दुडक्या चालीत खाली झेप घेतली. तसे त्याचे पंख लगेच पसरले. त्या उघडलेल्या पंखांच्या आधारे तो हवेत तरंगू लागला. असे होते नीलग्रीवाचे पहिले उडणे. खाली त्याला अन्नाचे कण दिसत होते.

त्यावेळी क्षणोक्षणी रंग बदलणाऱ्या त्याच्या पंखांकडे मी पाहत होतो.

अवर्णनीय अशा निळ्या-पारव्या पंखांवर वैदूर्यमण्यांची झांक पडली होती. एकदा सकाळच्या सूर्यप्रकाशात त्याची मान कांचनमण्यासारखी चमकत होती.

परंतु अजूनही आकाशात भरारी मारण्याचा सोहळा राहिला होता. त्याने आकाशात उडावे म्हणून मी जरी प्रयत्न करीत होतो तरी त्याच्या मातापित्यांनी आभाळात उड्डाण करण्याचे पहिले धडे द्यावेत याची वाट पाहत होतो. रोज त्याला माझ्या मनगटावर बसवून, मी आपले हात अनेक वेळा खालीवर करी. माझ्या हातावर स्थिर बसण्यासाठी त्याला वारंवार पंखांची उघडझाप करावी लागे. एका दृष्टीने अशी कसरत त्याला फायदेशीरच होती. परंतु यापेक्षा त्याला अधिक शिकविणे मला शक्य नव्हते. आपण विचाराल की त्याला उडावयाला शिकविण्याची एवढी घाई का होती? त्याचे कारण असे की तो उडण्याच्या बाबतीत त्याच्या इतर भावंडापेक्षा बराच मागे होता. अन् जून महिन्यात एकदा का पावसाला सुरवात झाली की तो पावसाळी हवेत उडत असताना लांबचा पल्ला गाठू शकणार नव्हता. माझी इच्छा होती की चित्रग्रीवाला उडण्याबरोबर दिशेचे ज्ञान लवकर प्राप्त व्हावे.

मेच्या अखेरीस एके दिवशी ही जबाबदारी त्याच्या बापाने अंगावर घेतली. उत्तरेकडून वेगात वाहणाऱ्या वाऱ्यामुळे साऱ्या शहरातील हवामान गारठले होते. नंतर वाऱ्याचा वेग मंदावला. स्फटिकाप्रमाणे स्वच्छ असलेल्या इंद्रनीलमण्यासारखे आकाश शोभत होते. सारा आसमंत इतका निर्मळ होता की शहरातील घरांची छपरे, गावापासून दूर असलेली शेतीवाडी आणि राया स्पष्टपणे दिसत होत्या. दुपारची तीनची वेळ. चित्रग्रीव माळवदाच्या भिंतीवर बसून उन्हे खात होता. आभाळात उडत असलेला त्याचा बाप खाली येऊन त्याच्या शेजारी बसला. आपल्या या केविलवाण्या पोराकडे त्याने चमत्कारिक दृष्टीने पाहिले. जणू काय त्याला उद्देशून तो म्हणत होता, "अरे, कोवळ्या पोरा आता तू काय लहान आहेस. तीन महिन्याचा झालास. तरी तुला उडण्याची हिंमत होऊ



नये! अरे, तू कपोत कुळातील की कोंबडीच्या कुळातील आहेस?" या टोचून बोलण्याचा चित्रग्रीवावर काहीच परिणाम झाला नाही. तो गप्पच होता. त्याचे वडील कपोतांच्या बोलीत आंजारून गोंजारून तर कधी लटक्या रागाने त्याला समजावीत होते.

संतापलेल्या वडिलांपासून चित्रग्रीव दूर जाऊन बसला. परंतु बापाने त्याचा पिच्छा सोडला नाही. चित्रग्रीव जसा दूर सरके तसा बाप त्याच्या अधिक जवळ जाई. त्याच्यावर चरफडे आणि लागट बोले. अशा रितीने बापाने त्याला कडेपर्यंत आणले. आता तेथून खाली पडण्याशिवाय चित्रग्रीवाला गत्यंतर नव्हते. ही संधी साधून बाप पोराच्या अंगावर झपाटला. चित्रग्रीव तेथून जो घसरला तो गडगडत खाली जाऊ लागला. स्वतःला सावरण्यासाठी चित्रग्रीवाने पंख पसरले. अन् क्षणात सहज उडू लागला. त्याच्या जीवनातील तो मोठ्या आनंदाचा क्षण! खालच्या भागात त्याची आई दुपारच्यावेळी पाण्यात पंख फडफडवीत आंघोळ करीत होती. आपल्या पोराला उडताना पाहून तशी ती उडत वर आली. अन् त्याच्यासोबत उडू लागली. माळवदाभोवती मायलेक उडू लागले. दहाएक मिनिटांनी खाली झेपावत भिंतीवर येऊन पंख मिटून ती चुपचाप बसली. परंतु पोराने तिचे अनुकरण केले नाही. थंडगार पाण्यात प्रवेश करताच एखाद्या बालकाची जशी तारांबळ उडते तशी चित्रग्रीवाची अवस्था झाली. त्या रोमांचकारी अनुभवाने त्याचे सारे शरीर थरथर कापत होते. आपले पंख वेगाने फडफडवीत, तोल सांभाळीत तो मोठ्या सावधगिरीने माळवदावर उतरताना भिंतीला धडकला तसे एखाद्या पंख्याप्रमाणे त्याचे पंख मिटले. अजूनही त्याच्या मनातील खळबळ कमी झाली नव्हती. तेवढ्यात त्याची आई जवळ आली. त्याला हळुवार पंखाखाली घेऊन गोंजारू लागली. आपल्या पोराच्या यशस्वी उड्डाणामुळे आनंदलेले वडील आंघोळीसाठी निघून गेले.

# दिशांची ओळख



नवीन शिकलेला पाणबुड्या ज्या कुशलतेने पाण्यात संचार करतो त्याच सहजतेने चित्रग्रीव निर्भयपणे आकाशात उड्डाण करावयाचा. उत्तरोत्तर तो उंच उंच पल्ला गाठू लागला. थोड्याच दिवसात तो रोज अर्धा तास तरी आभाळात संथपणे विहार करू लागला. माळवदावरील कबुतरखान्याकडे येताना तो असा काही सूर मारी की त्याच्या आईवडिलांच्या उडण्याची आठवण व्हावी. माळवदावर पाय टेकण्यापूर्वी त्याला सुरुवातीला जी पंखांची विलक्षण फडफड करावी लागे, त्याची आता गरज नव्हती, इतकी कुशलता त्याने उडण्यात साध्य केली होती.

आरंभी चित्रग्रीवाचे आईबाप त्याच्याबरोबर उडायचे. नंतर मात्र त्याला मागे सोडून ते गगनात खूप उंचावरून भरारी मारू लागले. हे पाहून मला वाटले की ते आपल्या पोराला अति उंचावर नेण्याचा प्रयत्न करीत असावेत. चित्रग्रीव देखील त्यांची उडण्याची उंची गाठण्याचा प्रयत्न करी. कदाचित त्याचे मातापिता अंतरिक्षात उडण्यातील कौशल्य त्याला शिकविण्याचे प्रयास करीत असावेत. त्या दिवशीच्या प्राणघातक प्रसंगाने तर मला आश्चर्याचा धक्काच बसला.

जूनचे ते अखेरचे दिवस. चित्रग्रीव अंतरिक्षात उडत होता. तो आकाराने लहान दिसत होता. त्याच्या वरच्या पातळीवर आईबाप उडत होते. तेसुद्धा आकाराने अंगठ्याएवढे दिसत होते. ते चित्रग्रीवाभोवती घिरट्या घालीत होते. आकाशात त्यांचे भ्रमण कितीतरी वेळ चालू होते. त्यांच्याकडे एकटक पाहून माझे डोळे शिणले. म्हणून मी क्षितिजाकडे पाहू लागलो. वेगात उडण्याऱ्या त्या काळ्या ठिपक्याकडे पाहत असता क्षणोक्षणी त्याचा आकार मोठा मोठा होत, पाहतो तो पक्षी सरळ रेषेत अति वेगाने मार्ग आक्रमित होता. मला आश्चर्य वाटले की हे पाखरू कोणते असावे! कारण संस्कृतात पक्ष्याला *तिर्यक* म्हणजे वक्र गतीने उडणारा असे म्हटले आहे.

परंतु हा पक्षी मात्र बाणासारखा सरळ रेषेत उडत होता. पुढच्या काही क्षणांतच माझी खात्री झाली की चित्रग्रीवाचा वेध घेणारा तो पक्षी म्हणजे बहिरी ससाणा होता. मी वर पाहतो तो मला अद्भुत असे दृश्य दिसले. चित्रग्रीवाचा बाप कोलांटउड्या घेत त्याच्याभोवती घिरट्या घालत होता. आई त्याच पद्धतीने त्याच्या खालच्या बाजूने गोलाकार उडत होती. बहिरी ससाणा त्या अजाण पोराजवळ पोचण्यापूर्वीच त्याच्या दोन्ही अंगाने उडत होता. नंतर ते तिघेही सूर मारीत खाली येऊ लागले. कबुतरांनी उडण्याचा पवित्रा बदललेला पाहून बहिरी ससाण्याने मोठ्या चपलतेने त्यांच्यावर झडप घातली. लगेच तिघांनी खाली डूब घेतली. सावज तडाख्यातून सुटल्यामुळे तो ससाणा नाउमेद झाला. ज्या सामर्थ्याने ससाण्याने त्यांच्यावर हल्ला चढविला होता तो इतका प्रखर होता की त्याच वेगात तो तीव्रतेने खाली आला. हवेत घिरट्या घालीत कबुतरे वेगाने खाली खाली येत होती. त्यांनी आता अर्धाअधिक पल्ला गाठला होता. यानंतर ससाण्याने आपला मोर्चा बदलला. त्याने अंतरिक्षाचा वेध घेतला. नेहमीसारखा उडताना त्याच्या पंखातून वाहणाऱ्या वाऱ्याचा सूंऽ सूंऽऽ सूंऽऽऽ आवाज ऐकू यायचा. तो देखील आता कानावर पडत नव्हता. आपला शत्रू दृष्टीआड झाल्याने कबुतरांना हायसे वाटले. त्यांनी उडण्याचा वेग कमी केला. ती सारी आता संथ गतीने खाली झेपावत

होती. तोच काय आश्चर्य! दोन्ही पंख मिटून ससाणा विलक्षण वेगाने त्या कबुतरांवर एखाद्या धूमकेतूसारखा आदळणार, तोच मी तोंडाने शीळ घालून त्यांना वेळीच सावधगिरीची सूचना दिली. म्हणून ती बचावली. त्यांनी एखाद्या खंजिरासारखा खाली वेध घेतला. परंतु ससाण्याने त्यांचा पाठलाग सोडला नाही. क्षणोक्षणी तो त्यांच्या नजीक येत होता. वेगाने त्यांचा नेम घेऊ पाहत होता. कबुतरे आणि ससाण्यामधील अंतर वीस एक फुटाचे असावे. ससाण्याचा मुख्य रोख चित्रग्रीवावर होता. त्याने आपल्या पंजाची तीक्ष्ण नखे काढली. तेव्हा मी भयाने मनात म्हणत होतो, ''ही मूढ कबुतरे स्वतःचा जीव वाचविण्यासाठी काहीच हालचाल करणार नाहीत काय! तो नक्कीच आता त्यांचा ग्रास घेईल. एकूण प्रसंग बाका होता.

माझ्या मनात असे विचार येतात न येतात तोच कबुतरांनी वरच्या कलांनी घिरट्या घालण्यास सुरुवात केली. ससाण्याने अजूनही त्यांचा पिच्छा सोडला नव्हता. नंतर कबुतरे लंब वर्तुळात चकरा मारू लागली. पक्षी जेव्हा आकाशात वर्तुळाकार उडू लागतात, तेव्हा त्यांचे शरीर वर्तुळाच्या आतल्या किंवा बाहेरच्या अशा कुठल्याही बाजूला झुकू शकते. कबुतरांच्या उडण्याचा रोख ससाण्याच्या लक्षात न आल्यामुळे तो वर्तुळाच्या आतल्या बाजूला झुकला, अन् तिथल्या तिथे घिरट्या घालू लागला. कबुतरे मात्र मोठ्या गोलातून उडत होती. तो पाठमोरा होताच कबुतरांनी माळवदाच्या दिशेने सूर मारला. परंतु त्या दुष्ट ससाण्याने माघार घेतली नाही. तो विजेच्या चपळाईने त्यांचा वेध घेतच होता. मी दोन्ही हात वर करून मोठ्याने हाका घालून ससाण्याला पिटाळून लावले. त्यावेळी तो कर्कश आवाजात ओरडत होता. अगदी माझ्या डोक्यावरून उडला. संतापाने त्याचे डोळे अंगाराने फुलले. एखाद्या जहरी सापाच्या जिभेप्रमाणे त्याच्या पंजाच्या नखांची हालचाल होत होती. त्याच्या पंखातून सूंऽ सूंऽऽ सूंऽऽऽ असा वारा वाहत होता.



माझ्या कबुतराची एका जीवघेण्या संकटातून सुटका झाल्याने मला हायसे वाटले. चित्रग्रीवाला मी दिशा ओळखायला शिकवू लागलो. एकदा तिन्ही कबुतरांना पिंजऱ्यात घालून शहराच्या पूर्वेला गेलो. सकाळी नऊ वाजता त्यांना आकाशात सोडून दिले. त्यानंतर ती अगदी सुरक्षितपणे घरी परतली. दुसऱ्या दिवशी पश्चिमेला नेले आणि आकाशात उडविले. याप्रमाणे आठवड्याच्या आत त्यांना आमच्या घराकडे येण्याचा मार्ग माहीत झाला. सुमारे पंधरा मैलाच्या* टापूतून ती सहज घराकडे अचूक परत येत.

या जगात हाती घेतलेल्या शुभ कार्यात अनेक अडचणी येतात. चित्रग्रीवाचे दिशाज्ञानाचे शिक्षण त्याला अपवाद कसे असणार! चित्रग्रीव आणि त्याचे आईबाप अशा तिघांना पिंजऱ्यात घालून मी गंगा नदीतून नावेने प्रवास करीत होतो. सूर्योदयापूर्वीची वेळ. आकाशात जिकडे तिकडे ढग विखुरले होते. दक्षिणेकडून मंद मंद वारा वाहत होता. आमची नाव पांढऱ्याशुभ्र तांदळाच्या राशींनी भरली होती. ती एखाद्या हिमपर्वतासारखी धवल दिसत होती. त्यावर तांबूस आणि पिवळ्या आंब्यांचा ढीग रचलेला. हा सारा देखावा सूर्यास्ताच्या वेळच्या हिमशिखरासारखा सुंदर भासत होता.

जून महिन्यातील लहरी पावसाळी हवामानाची मला उन्हाळ्यापासूनच कल्पना होती. माझ्या अंदाजाप्रमाणे चांगल्या वातावरणाचे रूप पालटून ते कुठल्याही क्षणी वाऱ्यावादळात होणे शक्य होते.

आम्ही जलमार्गाने वीसेक मैलाचा प्रवास केला असू. तोच आकाश पावसाळी ढगांनी भरून गेले. वाऱ्याचा वेग इतका प्रचंड होता की नावेचे एक शीड पार फाटून गेले. आता अधिक वेळ वाट पाहण्यात अर्थ नव्हता. मी पिंजऱ्याचे दार उघडले आणि कबुतरांना मुक्त केले. पिंजऱ्याबाहेर येताच त्यांनी उडण्याचा प्रयत्न केला. परंतु जोरदार

*1 मैल = साधारणपणे 1.6 कि.मी.

वाहणाऱ्या वाऱ्याच्या तडाख्यात ती उलटीपालटी झाली. खरे म्हणजे ती नदीतच पडायची परंतु मोठ्या शिकस्तीने स्वतःला सावरून ती पाण्यालगत उडू लागली. अशारितीने एखादा तास तरी ती उडत होती. परंतु वाऱ्याच्या गतिविरूद्ध ती एक तसूभर देखील पुढे सरकत नव्हती. त्यांच्या झालेल्या त्रेधातिरपिटीकडे मी नाइलाजाने पाहत होतो. वादळ वाऱ्याशी निकराची झुंज घेता घेता त्यांनी जमीन गाठली. नंतर काही वेळेत ती जमिनीवरून उडताना दिसली. थोड्याच अवधीत डावीकडच्या गावात पोचली. तोच आकाशात काळ्याकुट्ट ढगांनी गर्दी केली. दिशा मिटल्या. विजेचा कडकडाट होत होता. मुसळधार पावसाला सुरुवात झाली. जिकडे तिकडे मृत्यूचे थैमान चालू होते. माझे मन शंकाकुशंकानी भरून गेले. आता आपल्या कबुतरांची पुन्हा भेट होईल असे काही वाटले नाही. आमची नाव बुडता बुडता वाचली आणि सुदैवाने आम्ही एका गावाच्या किनाऱ्याला पोहोचलो. दुसऱ्या दिवशी मी रेल्वेने घरी आलो. तिथे मला तीन कबुतरांपैकी दोनच दिसली. तसे माझ्या छातीत धस्स झाले. चित्रग्रीवाचा बाप वादळात कामी आला होता. खरे म्हणजे या सर्व प्रकारात मीच दोषी होतो. घरातील मंडळींनाही त्याचे दुःख झाले. जराशी पावसाची उघडीप झाली की मी त्या दोघांना घेऊन माळवदावर जाई. आकाशात माझी नजर भिरभिरे. चित्रग्रीवाचा बाप दिसतो काय म्हणून मी शोधू लागे. परंतु तो पुन्हा कधीच परत आला नाही.



## चित्रग्रीव हिमालयात जातो



सपाट प्रदेशात जसा उन्हाचा ताप असतो तसा पाऊसही खूप पडतो. म्हणून आमच्या परिवाराने हिमालयात हवापालटासाठी जायचे ठरविले. हिंदुस्तानच्या नकाशावर दृष्टिक्षेप टाकला तर उत्तर-पूर्वेला एका बाजूला दार्जिलिंग आहे. त्या गावाच्या अगदी समोर गौरीशंकर हे जगातील सर्वात उंच पर्वत शिखर उभे आहे. दार्जिलिंगहून काफल्याबरोबर मजल दर मजल करीत आम्ही देंटम या गावी पोचलो. माझ्या बरोबर दोन कबुतरे देखील होती. समुद्रसपाटीपासून आम्ही दहा हजार फूट उंचीवर होतो. अमेरिकेतील पर्वत अथवा आल्प्स पर्वतावर इतक्या उंचीवर थोडाबहुत हिमरेषा आढळून येतो. परंतु हिंदुस्तानसारख्या उष्ण कटिबंध प्रदेशात एवढ्या उंचीवर हिमरेषेचा अभाव असतो. अशा पर्वताच्या पायथ्यावरील अरण्यात नाना प्रकारचे वन्यप्राणी आढळून येतात. सप्टेंबरनंतर इथे कडाक्याची थंडी पडू लागताच हे वन्यप्राणी दक्षिणेकडे स्थलांतर करू लागतात.

आजूबाजूच्या परिसराचे वर्णन करायचे तर आमच्या दगडी आणि मातीने काही भाग लिंपलेल्या घरासमोर लहान खोरे दिसे. तिथे चहाचे मळे होते. पलीकडच्या पर्वतमालांवर शिखरांच्या दंतुर रांगा दिसत.

तिथल्या खोऱ्यात भातांची शेते होती. मक्याची शेते दिसत. फळबागा होत्या. त्या पलीकडे डोंगर उतारावर गर्द, हिरवी वने होती. त्या पलीकडच्या रांगावर कांचनगंगा, माकालू आणि गौरीशंकर यांसारखी हिमाच्छादित शिखरे दिसत. ब्राह्ममुहूर्तावर ती धवल वर्णाने शोभत. सूर्य माथ्यावर आला की ती शिखरे आकाशाला भेदून उभी असत. तेथून गुलाबी वर्णाच्या प्रकाशाचा झोत दिसू लागे.

हिमालयाचे खरे दर्शन प्रातःकाली होते. दिवसाच्या इतर प्रहरांत ढगांमुळे तो दिसत नाही. धार्मिक हिंदू सकाळी लवकर उठून भव्य दिव्य हिमगिरीचे दर्शन घेऊन ईश्वराची प्रार्थना करतात. ज्याची अनेक शिखरे अजिंक्य आणि अस्पर्श आहेत अशी पार्श्वभूमी प्रार्थनेसाठी कुठे मिळू शकेल? ती पावित्र्य आणि मांगल्याची प्रतीके आहेत. त्या पर्वताकडे पाहून म्हणावे लागेल :

अस्त्युत्तरस्यां दिशि देवतात्मा,
हिमालयो नाम नगाधिराजः ।

(उत्तरेकडे देवतास्वरूप हिमालय नावाचा पर्वतांचा राजा विद्यमान आहे)

पहाटेची वेळ सोडली तर दिवसभर ही पर्वतशिखरे मेघांनी आच्छादित असतात. जे परदेशी लोक हिंदुस्तानात येतात त्यांना वाटते की या गिरीशिखरांचे दर्शन दिवसाच्या कोणत्याही प्रहरी व्हावे. भव्योदात्त आणि वैभवशाली गौरीशंकर शिखराचे दर्शन झाले तर ते म्हणतील, ''दिवसाच्या सर्व प्रहरी त्यांचं भव्यदिव्य दर्शन होत नाही ही एका परीनं ईश्वर इच्छाच म्हणावी लागेल. कारण त्यांचं तेज कोणीही सहन करू शकणार नाही.''

जुलै म्हणजे पावसाचे दिवस. त्यमुळे अगदी पहाटेदेखील एव्हरेस्टची शिखरे आम्हाला निश्चितपणे दिसतील याची खात्री देता येत नसे. साऱ्या पर्वतमालांत बर्फाच्या प्रचंड वादळाने थैमान घातलेले असे. वादळ आणि हिमवर्षाव यामधून बर्फाने आच्छादलेल्या शिखरांचे तेजोमय



दर्शन होई. सूर्य प्रकाशात ती देदीप्यमान दिसायची. त्यांच्या पायथ्याला हिममेघांचा पिंगा चालू असे. वाटे की रुद्रापुढे भैरव नृत्य चालू आहे.

उन्हाळ्यात एकदा माझा मित्र राजा आणि वृद्ध गोंड भेटायला आमच्या घरी आले. हा गोंड वनविद्येत कुशल होता. ब्राह्मण पुरोहित असलेल्या राजाचे वय जेमतेम सोळा वर्षाचे असावे. गोंडाचे वय मात्र कुणालाच सांगता आले नसते. आम्ही आदराने त्याला महाजन म्हणत असू. महाजन म्हणजे शहाणा माणूस. महाजन हा मुळचा पट्टीचा शिकारी. जंगल आणि वन्य प्राण्यांच्या जीवनातील रहस्ये जाणून घेण्यासाठी आम्ही त्याचे चेले झालो होते. वनविद्या आणि अरण्यवाचन याविषयी माझ्या दुसऱ्या एका पुस्तकात लिहिले आहे. म्हणून मी त्याची इथे पुनरावृत्ती करीत नाही.

देंटममध्ये स्थिरस्थावर झाल्यावर माझ्या कबुतरांना दिशांचे ज्ञान व्हावे म्हणून त्यांना उडवू लागलो. जेव्हा पावसाला उघाड असे त्यादिवशी दुपारीच आम्ही इलेक्स आणि बॉलसम या वृक्षांची वने असलेल्या उंच पर्वतशिखरावर जात असू. एखादा बुद्धमठ अथवा लामासराईच्या छपरावरून आम्ही कबुतरे उडवीत असू. सायंकाळी आम्ही जेव्हा घराकडे परत येत असू तेव्हा चित्रग्रीव आणि त्याची आई आमच्या अगोदर तेथे पोचलेली असत.

साऱ्या जुलै महिन्यातील पावसात आम्हाला जेमतेम सहा-सात दिवसाची उघडीप मिळाली. वनविद्या जाणत असलेल्या महाजनाचे मार्गदर्शन आणि राजाच्या सोबतीने थोड्या काळात दूरदूरवरचा प्रवास केला. सर्व प्रकारच्या पहाडी लोकांत आम्ही राहिलो. ही पहाडी माणसे चिनी लोकांसारखी दिसायची. ते लोक सौजन्यशील, आदरातिथ्य करणारे आणि उदार मनाचे होते. अर्थात अशा प्रवासात कबुतरे देखील आमच्या सोबत असायची. काही वेळा आम्ही त्यांना पिंजऱ्यातून नेत असू. परंतु बहुतेक वेळा आमच्या डगल्यातून घेऊन जात असू. पावसामुळे आम्ही ओले होत असलो तरी चित्रग्रीव आणि त्याची आई

पावसामुळे भिजणार नाहीत याची दक्षता घेत असू.

जुलै महिन्याच्या अखेरी आम्ही लामासराईपलीकडे आणि सिक्किममधील सरदाराचा किल्ला ओलाडून पार दूरवर गेलो. आम्ही तिघे आणि दोन कबुतरे यांना आता सारेजण ओळखू लागले होते. आम्ही सिंगालिलाही मागे टाकले, तेथून फालूरच्या मार्गावर छान अशी छोटी लामासराई होती. पुढे अज्ञात असा प्रदेश पसरलेला. शेवटी आम्ही गरुडांच्या निवासस्थानी पोचलो. सभोताली उजाड वज्रतुंड शिखरे होती. पायथ्याला फर आणि देवदाराची खुरटी झाडे होती. आमच्या समोर उत्तरेला कांचनगंगा आणि गौरीशंकर शिखरांचे उतार दूरवर पसरलेले होते. एका गिरीकुहराच्या कड्यावरून आम्ही आमच्या दोन पाखरांना सोडून दिले. शाळा सुटल्यावर लहान मुले जशी स्वच्छंदपणे नाचू बागडू लागतात तशी भुर्रकन उडून गिरीकुहरातून विहार करीत होती. चित्रग्रीवाची आई आपल्या पोराला पर्वताची उदात्त भव्यता दाखवण्यासाठी उंच उंच भराऱ्या मारू लागली.

ती दोन पाखरे सुदूर गेल्यावर आम्ही तिघेजण आपसात बोलत होतो की, ही गगनभरारी मारल्यावर त्यांना खालचे जग कसे दिसत असावे! त्या पाखरांसमोर कांचनगंगा शिखरांची जोडी दिसत होती. गौरीशंकर शिखरापेक्षा ती किंचित कमी उंचीची होती. परंतु गौरीशंकर शिखर अजूनही अजिंक्य आणि अस्पर्श होते. त्याविषयी पवित्र आणि मंगल भावना आमच्या मनात होती. दूरवर असलेल्या त्या पर्वतकळसाकडे आम्ही दृष्टी टाकली. अनंतापुढे आरसा ठेवावा असे ते दृश्य होते. मी स्वतःशी म्हणालो :

"तू पावित्र्य आणि मांगल्याचा उत्तुंग कळस आहेस,
तू अस्पर्श आणि सनातन आहेस,
मानव तुला कलंकित न करो,
तुझी शुचिर्भूतता आणि मांगल्य अभंग राहो,
तू युगानुयुगे अजिंक्य राहो,



तू साऱ्या सृष्टीचा आधार स्तंभ आहेस,
तू अमरत्वाचा मानदंड आहेस."

मी आपणाला एवढ्या उंचीवर आणले ते काही पर्वतांविषयी सांगण्यासाठी नव्हे, तर आम्ही घेतलेला विलक्षण अनुभव कथन करण्याकरिता. चित्रग्रीव आणि त्याची आई दिगंतरात गेली. त्यांचे अवलोकन करायचे आम्ही सोडून दिले. त्यानंतर आम्ही गरुडाच्या घरट्याच्या शोधात निघालो. ते जवळ त्या एका पर्वताच्या कड्यावर होते. हा हिमालयातील पिंगट वर्णाचा गरुड असून त्यावर सुवर्ण अशी आभा असते. दिसायला राजस असलेला हा पक्षी सौंदर्य आणि सामर्थ्य यांचे मूर्तीमंत प्रतीक आहे. हा खगेश्वर निष्णात शिकारी आहे.

त्या दिवशी दुपारी त्याच्या नैसर्गिक प्रवृत्तीचा अनुभव आम्हाला आला नाही. परंतु त्या गरुडाच्या घरट्यात दूधभुरा असलेली दोन गबदुल पिले दिसली. दक्षिणेकडचा वारा अगदी त्यांच्या तोंडावरून वाहत होता. परंतु त्यांना त्याची पर्वा नव्हती. हिमालयातील गरुड आपली घरटी वाऱ्याच्या दिशेला बांधतात. याचे कारण काय असावे? ते कोणालाच माहिती नाही. ज्या वाऱ्याच्या प्रवाहातून सहज तरंगता येईल अशा दिशेला समोर असणे त्याला आवडत असावे.

पिले तीन आठवड्यांची असावीत. कारण त्यांच्या अंगावरचा दूधभुरा गळून तिथे पंख फुटताना दिसत होते. वयाच्या मानाने त्यांच्या पंजाची नखे मात्र तीक्ष्ण होती. त्यांच्या चोची कठीण आणि टोकदार होत्या.

गरुडाचे घरटे भले मोठे आणि उघडेच होते. जिथे गरुड उतरतो ती जागा मात्र सहा-सात फूट रूंद आणि अगदी स्वच्छ होती. आतील भाग मात्र अंधारा आणि निरूंद होता. तो झाडांच्या डहाळ्या आणि फांद्यानी बांधला होता. तिथे पिलांनी खाऊन टाकलेल्या भक्ष्यांचे केस आणि पिसे होती. भक्ष्याचा इतर भाग मात्र शावके खाऊन टाकू शकतात. त्यांचे आईबाप मांस चिकटलेली हाडे,केस आणि पिसे गिळंकृत करतात.

आजूबाजूच्या प्रदेशात देवदाराची खुरटी जंगले होती, परंतु ते जंगल पाखराच्या आवाजाने गजबजले होते. फर वृक्षांवर चमत्कारिक कीटकांची किर्रकिर्र चालू होती. जांभळ्या फुलांच्या आमरी (आर्किड)वर निळ्या पंखाची, रत्नजडित फुलपाखरे उडत होती. ऱ्होडोडेन्ड्रॉनच्या वृक्षांवर अनेक आकाराची फुले फुलली होती. त्यात काही चंद्रबिंबाएवढी मोठी होती. अधूनमधून मार्जार कुलातील वाघाबिबट्याची गुर्र गुर्र ऐकू येई. रात्री शिकारीवर ताव मारल्यामुळे आता त्यांना डुलकी लागली असावी.

अचानक महाजनाने आवाज दिला की इथून पळा आणि झुडपात लपून राहा. आम्ही लगेच सूचनांचे पालन केले. जिकडे तिकडे सामसूम झाले. लगेच रातकिड्यांची किरकिर थांबली. पाखरे चिडिचूप झाली. एवढेच नव्हे तर झाडेही कुठल्यातरी प्रतीक्षेत स्तब्ध उभी होती. हवेतून कसलीतरी हळुवार कुणकुण येत होती. काही क्षणानंतर तो स्वर खालच्या पट्टीत ऐकू येऊ लागला. नंतर भीतिदायक कर्कश ध्वनी कानावर आदळताचक्षणी विशाल आकाराच्या वैनतेयाने घरट्याकडे झेप घेतली. पंखातून वाहणाऱ्या वाऱ्याचा घों घों आवाज येत होता. तो पक्षी म्हणजे दोन पिलांची आई असावी हे महाजनाने हेरले. काही वेळ पंख न फडफडता ती हवेत स्थिर झाली. पिले घरट्याच्या आंतरभागात गेली. तिच्या पंजात कातडे सोललेला, सशाएवढा प्राणी लोंबत होता. घरट्याच्या प्रवेशद्वाराच्या कड्यावर शिकार ठेवण्यासाठी ती खाली झेपावली. तिच्या पंखाची लांबी सहा फूट तरी असावी. तिने आपले पंख मिटले. पिले तिच्याकडे धाव घेताना पाहून तिने पंजाची नखे आत ओढून घेतली. कारण त्या अजाण शावकांना त्यापासून इजा होण्याची शक्यता होती. अर्ध मिटल्या पंखाने ती टूणटूण उड्या घेत घरट्याकडे गेली, तसा त्या पिलांनी तिच्या पंखांचा आश्रय घेतला. आता तिच्या पाखरमायेची त्यांना गरज नव्हती. कारण ती भुकेली होती. तिने पिलांना मृत सशाकडे नेले. बिनहाडाच्या मांसाचे काही लचके तिने काढले आणि त्यांना भरविले. शांत असलेला वरचा तसेच खालचा परिसर पुन्हा



एकदा मुखरित झाला. पाखरे आणि कीटकांचे आवाज पुनश्च ऐकू येऊ लागले. आम्ही लपणातून बाहेर आलो. आम्हाला पुन्हा एकदा गरुडाच्या दर्शनासाठी महाजनाने इथे आणावे, असे वचन मी आणि राजाने त्याच्याकडून घेतले, अन् घरची वाट धरली.

त्यानंतर एका महिन्याने आम्ही तेथे परत आलो. बरोबर चित्रग्रीव आणि त्याच्या आईला आणले. माझी इच्छा होती की त्या पोरने दुसऱ्यांदा इथून उड्डाण करावे. म्हणजे त्याला इथले प्रत्येक गाव, लामासराई, सरोवर आणि नदी, तसेच श्वापदे आणि इतर पक्षी, क्रौंच, पोपट, हिमालयातील सारंग (हेरॉन), हंस, टिबुकली, बहिरी ससाणे, आभोळ्या यांची माहिती व्हावी. या खेपेला आम्ही गरुडाच्या घरट्यापलीकडे शंभर यार्ड गेलो. शिशिर ऋतूचा प्रभाव ऱ्होडोडेन्ड्रॉन वृक्षांवरदेखील जाणवत होता. त्यांच्या नारिंगी पाकळ्या आता गळत होत्या. त्यांचे उंचच्या उंच बुंधे वाऱ्याने सळसळत होते. इतरही अनेक झाडांची पानगळ सुरू होती आणि वातावरणात विषण्णता भरली होती. अंदाजे अकरा वाजता आम्ही आमच्या कबुतरांना पिंजऱ्यातून मुक्त केले. शुभ्र हिमशिखरांवर इंद्रनील मण्यासारखे दिसणारे आकाश एखाद्या शिडासारखे शोभत होते.

ती कबुतरे अर्धाएक तास उडत होती. तोच त्यांच्या वरच्या अंगाला बहिरी ससाणा दिसला. तो त्या दोन कबुतरांजवळ पोचला आणि त्यांचा पाठलाग करू लागला. परंतु कबुतरे मोठी सावध निघाली. ती त्याच्या तावडीतून सुखरूप निसटली. चित्रग्रीव आणि त्याची आई वेगाने झाडीच्या दिशेने खाली येत होती, तोच ससाण्याची सहचरी दिसली. अन् लगेच तिने त्यांच्यावर हल्ला चढविला. उडत त्यांच्याजवळ जाण्यात तिने पतीचे अनुकरण केले. परंतु तिचा प्रयत्न निष्फळ ठरला. आपल्या हातची शिकार सुटतेय हे पाहून नराने कर्कश आवाजात सखीला शीळ घातली. त्याचबरोबर योग्य संधीची वाट पाहत ती हवेत स्थिर झाली. कबुतरांना सुरक्षित वाटून, लगेच वेगाने ती दक्षिणेला उडाली. तसे

ससाण्यांच्या जोडीने पिच्छा करताना चाल बदलली. एकाने पूर्व, तर दुसऱ्याने पश्चिम दिशा धरली. पंख फडफडवीत त्यांनी कबुतरांना गाठले. त्यांचे पंख एखाद्या तलवारीच्या पात्याप्रमाणे हवेला चिरत होते. बाप रे! एखाद्या भाल्याप्रमाणे ससाणे खाली आले. तोच चित्रग्रीवाची आई थबकली अन् हवेत तरंगू लागली. त्यामुळे ससाण्याचा नेम चुकला. आता पुढे काय? कोणावर झडप घालावी, अशा संभ्रमात असताना त्या संधीचा फायदा घेऊन चित्रग्रीवाने लगेच आपल्या उडण्याची दिशा बदलली. तो उंचउंच उडू लागला. काही क्षणातच आईनेही त्याचे अनुकरण केले. परंतु तिला उशीर झाला होता. त्याचा फायदा मिळून ते दोन्ही ससाणे तिच्यावर झपाटले. ती लगेच सावरली. आपल्या पोराच्या मागे ही जोडी लागली अशी तिला भीती वाटून त्याच्या रक्षणासाठी धावली. परंतु तो प्रयत्न निरर्थक होता. पाठलाग करणाऱ्या जोडीकडे ती उडाली. अन् क्षणातच त्या शिकारी पक्ष्यांनी तिच्यावर झडप घातली. तसा हवेत पिसांचा फवारा उडाला! या दृशाने चित्रकंठ गर्भगळीत होऊन त्याने सुरक्षितता आणि रक्षणासाठी जवळच्या कड्याचा आश्रय घेतला. आईच्या प्रमादामुळे तिला प्राण गमवावे लागले. एवढेच नव्हे तर पोराचा जीवही तिने धोक्यात घातला.

चित्रग्रीव ज्या कड्यावर पडला त्या ठिकाणी आम्ही तिघे त्याचा शोध घेऊ लागलो. परंतु हिमालय ही विस्मयजनक भूमी आहे. माणूस त्यात कुठल्याकुठे भटकतो. व्याघ्रादिकांची भीती नसली तरी अजगरापासून सावध राहावे लागते. राजाचा आग्रह होता की अशा अनिश्चित अरण्यभ्रमणामुळे आपले ज्ञान वाढेल. याला महाजनानेही दुजोरा दिला.

आम्ही कड्यावरून उतरून एका खिंडीत प्रवेश केला. तिथे विखुरलेली हाडे दिसली. यावरून आमची खात्री झाली की आदल्या रात्री हिंस्र श्वापदाने इथे शिकार केली असणार. त्याचे हे अवशेष होते. एके काळचा बंगालमधील निष्णात शिकारी महाजन सोबतीला असल्यामुळे अशा गोष्टींची आम्हाला भीती वाटली नाही. आम्ही बिकट वाट कष्टाने



चढू लागलो. कडेकपारीतून हिरवे शेवाळ लोंबत होते. त्यावर जांभळी फुले असलेल्या आमरी वाढल्या होत्या. फर आणि बॉलसम वृक्षांचा गंध नाकाला सुखवीत होता. काही ठिकाणी ऱ्होडोडेन्ड्रान अजूनही फुलांच्या बहरात होता. गार हवा सुटली. पर्वताची चढण संपता संपत नव्हती. दुपारचे दोन वाजले. बरोबर ओले हरभरे आणले होते. त्यावर भूक भागली. जेथे चित्रग्रीव लपला होता त्या कड्यावर आम्ही पोचलो. इकडे तिकडे पाहत असता आम्हाला आश्चर्याचा धक्काच बसला. तिथे आम्हाला गरुडाचे घरटे सापडले. काही दिवसांपूर्वी पाहिलेली गरुडाची दोन पिले—आता पंख फुटून मोठी झाली होती. ती घरट्यासमोरच्या रूंद खडकावर बसली होती. अन् दुसरा चमत्कार म्हणजे शेजारच्या कड्यापासून काही अंतरावर दुबळा आणि भयग्रस्त चित्रग्रीव दिसला. आम्ही दिसताक्षणीच गरुडशावक चोच वासून हल्ला करण्यासाठी धावले. राजा पुढे असल्यामुळे त्यांनी केलेल्या आघातामुळे त्याचा अंगठा फुटला. त्यातून रक्त वाहू लागले. अलीकडे आम्ही, पलीकडे चित्रग्रीव आणि मध्ये गरुड. काय करावे समजेना. परंतु थांबूनही चालणार नव्हते. आम्ही नेटाने उंच कडा चढून चित्रग्रीवाजवळ पोचलो. घरट्यापासून आम्ही पुढे सहा एक यार्ड चालत गेलो असू. तोच महाजनाने खुणावून आम्हाला थांबायला सुचविले. पहिल्यांदा इथे आलो होतो तेव्हा असेच आम्हाला लपावे लागले होते. आम्ही लगेच देवदार वृक्षामागे लपलो. इतक्यात हवेतून मंद चीत्कार ऐकू येऊ लागला. गरुडाच्या जोडीपैकी एकाचे आगमन झाले. काही क्षणात क्रेंकार करीत तो गरुड घरट्यावर उतरला. ज्या झाडाखाली आम्ही आश्रय घेतला होता, त्या झाडाच्या शेंड्याला त्याच्या शेपटीचा स्पर्श झाला होता. त्याचे क्रेंकार ऐकू आले. त्याच्या या अवचित दर्शनाने मला अत्यानंद झाला. त्यामुळे माझे सारे अंग रोमांचित झाले.

जेथे कोणी पोचणार नाही अशा एकांत कडेकपारीवर गरुड घरटे बांधतो असा जो लोकांचा समज आहे तो चुकीचा आहे. समर्थ पक्ष्याला

अथवा श्वापदाला घरट्याची जागा निवडताना फार काळजी घेण्याची आवश्यकता नाही. याबाबतीत थोडेफार चोखंदळ नसले जरी चालते. अशा महाकाय पक्ष्याला घरटे बांधण्यासाठी प्रथम कशाची गरज असेल तर विशाल पंखांची उघडझाप करण्याकरिता घरट्याबाहेर पुरेशी जागा हवी. असे ठिकाण कधी दुर्गम नसते. तसा गरुड घरटे बांधण्यात कुशल नसतो. उंच अशा खडककपारीची जागा तो घरट्यासाठी पसंत करतो. अशी निसर्गनिर्मित जागा घरट्यासाठी अनुकूल असते. राहिलेले घरटे पूर्ण करण्यासाठी त्याला फार परिश्रम करावे लागत नाही. फांद्या, काटक्या, पाने आणि गवताची पाती ही सामग्री वापरून ते पक्षी घरटे बांधतात. त्यात अंडी घालून पिले वाढवितात.

ज्या लपणात बसलो होतो, तेथून हळूच सरपटत बाहेर डोकावून आम्ही घरटे बांधणीविषयीचा तपशील गोळा केला, अन् दुरून पुन्हा एकदा गरुडाच्या घरट्याचे निरीक्षण केले. आता तर आमची खात्रीच झाली की आमचे हे जुने मित्र म्हणजे आता मोठी झालेली दोन शावके आणि त्यांची आईच आहे. पिले मोठी झाली होती तरी त्यांच्याजवळ जाताना गरुडमातेने सवयीप्रमाणे पंजातील नखे आत ओढून घेतली. हेतू हा की पोराना इजा होऊ नये. असे वर्तन करताच ती पोरे तिच्याकडे धाव घेत आहेत हे लक्षात येताच तिने पूर्ववत नखे बाहेर काढली आणि घरट्यासमोरच्या खडकावर खंबीरपणे उभी राहिली. खरे म्हणजे गरुडाची ती पोरे आता काही लहान नव्हती. पंख फुटून ती चांगली जाणती झाली होती. तरी पण ती आईच्या विशाल पंखाखाली आश्रयासाठी धावली. पण पोरे फार वेळ पंखांखाली थांबली नाहीत. ती भुकेली होती. त्यांना काहीतरी खावयाला हवे होते. अन् तिच्याजवळ तर काही नव्हते. हे ज्यावेळी त्यांना कळून चुकले त्यावेळी तिच्याकडे पाठ करून ती वाऱ्याच्या दिशेला तोंडे फिरवून बसली.

महाजनाने जसे खुणविले तसे आम्ही चढण चढू लागलो. अगदी शांतपणे सरड्याप्रमाणे सरपटत गरुडाचे जेथे घरटे होते त्याच्या वरच्या अंगाला पोचलो. तोच हाडे आणि कुजत असलेल्या मांसाची असह्य दुर्गंधी आमच्या नाकाला झोंबू लागली. गरुड जरी खगेंद्र असला तरी कबुतराइतका स्वच्छ आणि नीटनेटका नाही. मला तर गरुडाच्या घरट्यापेक्षा कबुतराचे खुराडे अधिक आवडते.

आम्ही चित्रग्रीवाजवळ गेलो. अन् त्याला पिंजऱ्यात घालण्याचा प्रयत्न केला. आम्हाला पाहून त्याला आनंद झाला. परंतु तो पिंजऱ्यात जाण्यास तयार नव्हता. आता बराच उशीरही झाला होता. म्हणून मी त्याच्यापुढे मसुरीचे दाणे टाकले. ते टिपण्यात मग्न असताना मध्येच त्याला हातात पकडण्याचा प्रयत्न केला असता तो बिचारा घाबरला अन् दूर उडून गेला. पंखाच्या फडफडणाऱ्या आवाजाकडे घरट्यातील गरुडाच्या आईचे लक्ष वेधले. तिने वर नजर टाकली. तिची चोच करकरत होती. लगेच तिने उडण्याचा पवित्रा घेतला. क्षणात खालच्या जंगलातील आवाज शांत झाले. ती दूर उडून गेली. वाटले, निदान चित्रग्रीव एका संकटातून वाचला. अकस्मात त्याच्यावर सावली पडली. माझ्या मनात आले, गरुड त्याच्यावर झेप तर घेणार नाही ना? ती सावली काही क्षण स्थिर झाली अन् पुढे निघून गेली. चित्रग्रीवाला भासले की ती त्याचा पाठलाग करीत आहे. या भीतीमुळे तो वाट फुटेल तसा वेडावाकडा उडत पार आमच्या दृष्टीआड झाला.

माझी खात्री झाली की चित्रग्रीव आपल्या हातचा गेला. परंतु महाजनाचे म्हणणे असे की एक दोन दिवसात तो पुन्हा सापडेल. म्हणून आम्ही ठरविले की आता इथेच मुक्काम करून त्याचा मागोवा घ्यायचा.

झपाट्याने रात्रीचे आगमन झाले. आम्ही देवदार वृक्षाचा आसरा घेतला. दुसऱ्या दिवशी सकाळी महाजन म्हणाला की गरुडाच्या पिलांनी आता घरटे सोडून देण्याचा दिवस आला. तो पुढे म्हणाला, "गरुड आपल्या शावकांना कसं उडायचं हे शिकवत नाहीत. पिलांना पंख कधी फुटतात हे त्यांना माहीत असते. मग मातापिता त्यांचा कायमचा त्याग करतात."

त्या दिवशी गरुडाच्या पोराचे आईवडील पुन्हा घरट्याकडे परत आले नाहीत. रात्र पडली तरी ते माघारी आले नाहीत. तेव्हा पोरांनी त्यांच्या परतीची आशा सोडली. ती घरट्याच्या आंतरभागात गेली. ती रात्र अविस्मरणीय होती. खूप उंचीवर असल्याने आम्हाला हिंस्र श्वापदाकडून काही भय नव्हते. वाघ आणि बिबट खालच्या भागात जातात. उंचावरील प्रदेशात जाण्याची त्यांना भीती वाटते असे नव्हे, तर त्यांचे भक्ष्य असलेल्या वन्यप्राण्यांचे ते अनुसरण करतात. मृग, हरणे, रानम्हसरे, वनवराह, हे प्राणी खोऱ्यातील समृद्ध जंगलात चरावयास जातात. तिथे गवत, झुडपे, शाक, फळ, मूळकंद मुबलक असतात. थोडक्यात सांगायचे तर या तृणभक्षी प्राण्याचे खाद्य नदीकाठी विपुल प्रमाणात आढळते. साहजिकच मांसाहारी प्राणी, तृणभक्षी प्राण्यांच्या शोधात जातात. पक्षी, रानमांजरे, अजगर आणि हिमबिबटे या प्राण्यांचा अपवाद सोडला तर उंच प्रदेशात हिंस्र श्वापदांचा अभाव असतो. याक-चमुरु म्हणजे तिथल्या गाईच. त्यासुद्धा एकट्या दुकट्या अथवा कळपातून इतक्या उंचीवर दिसून येत नाहीत. एखाद-दुसरा रानबकरा क्वचितच दिसतो. मोठ्या हिंस्र प्राण्यांचे इथे वास्तव्य नसल्याने साहजिकच नाट्यपूर्ण घटना घडल्या नाहीत. त्याची भरपाई केली तिथल्या कडाक्याच्या थंडीने. पहाटेसमयी आमचे सर्वांग तिथल्या अति हिवाने कापत होते. अशात झोप येणे तर शक्यच नव्हते. अंगाभोवती कांबळे गुंडाळून मी रात्रभर सभोवताली पाहत होतो. आजूबाजूचे ऐकत होतो. सर्वत्र इतकी विलक्षण शांतता होती की केवळ श्वासोच्छ्वासाच्या आवाजाने ढोल ढण् करून वाजला असता. चोहोकडच्या निःशब्द शांततेने मला घेरले. एका फांदीवरून दुसऱ्या फांदीवर उडी मारताना रानमांजराची पावले पाचोळ्यावर पडल्यामुळे एखादा स्फोट व्हावा तसा आवाज येई. परंतु तो शांततेच्या लाटात विरून जाई. हळूहळू ग्रहनक्षत्रे अस्ताला जाऊ लागली. तिथे नांदत असलेली गूढता अधिक वाढत होती. खड्ग एकमेकावर वाजावेत तसा आवाज गरुडांच्या घरट्यातून येत होता.



पहाटेचे आगमन होत होते. पुन्हा तसाच ध्वनी त्याच ठिकाणून आला. गरुड आपले पंख चोचीने साफ करीत होते. त्याची ती खसखस होती. नंतर पंखांची सळसळ ऐकू आली. वाटले, गरुड आता घरट्यातून समोरच्या खडक कपारीवर आले असावेत. नंतर संमिश्र रव आरव येऊ लागले. ढोक पक्षी उडू लागले. क्रौंच पक्षी जणू आभाळाचे ओझे घेऊन उडत होते. चमुरुची डरकाळी शांततेला चिरा पाडत होती. खोऱ्यातील पक्षी एकमेकांना साद घालीत होते. शेवटी कांचनगंगेची शिखरे आणि तिच्या उतारावर धवल प्रकाश पडला. माकालूचे शिखर देदीप्यमान वलयाने शोभू लागले. माँ ब्लाँ (Mont Blanc) सारखी कमी उंचीची पर्वत श्रेणी जणू दुधाने न्हाऊन निघाली. आता वृक्ष आणि शिळा यांचे आकार, रंग आणि रूप स्पष्ट दिसू लागले. पहाटेच्या दवाच्या थेंबांनी आमरी थरथरत होत्या. एखाद्या मृगेंद्राप्रमाणे सूर्याने नभावर झडप घातली. हिमाच्छादित क्षितिज अग्निसारखे ताम्रवर्णाचे दिसू लागले.

महाजन आणि राजा कधीचे जागे झाले होते. ते उभे राहिले. राजा तर उत्तम पुरोहित होता. तो वेदातील सूर्यसूक्त म्हणू लागला—

प्राङ्निक्वाणस्य सुमोदय त्वं
पुरुषाक्षुण्णं ते प्राचीनं भाज मार्गम् ।
अद्भुतं विरजसं तम् ।
देवस्य तत् सुवर्णं भाज त्वमासनम् ।
प्रतिनिधिनो भव तस्य देवस्य निःशद्वस्य
तस्य दयापूर्णस्य निक्वाणस्य च पुरः ।

नीरव वेळी होणारा फुलांचा उदय तू,
हे पुरुष तुझ्या अखंड अन् प्राचीन
मार्गाची उपासना कर.
तू अद्भुत आणि रजोगुणापासून
मुक्त आहेस.

सुवर्णरुपी असे तुझे देवांचे आसन आहे.
निःशद्ध अशा देवाचा तू प्रतिनिधी आहेस.
त्या दयापूर्ण, नीरव पुराचा
तू प्रतिनिधी आहेस.

त्यांच्या प्रार्थनेच्या आवाजाने गरुड बुजले. कारण त्यांनी कधी माणसाचा आवाज ऐकला नव्हता. त्या आवाजाने अस्वस्थ होऊन ते कोपले. तोपर्यंत आमची प्रार्थना म्हणून झाली. अशा परिस्थितीत आम्ही एका खुरट्या देवदार वृक्षाचा आश्रय घेतला. न्याहारी न करताच गरुडांनी घरटे सोडले. आपले आईबाप दिसतात काय म्हणून त्यांनी आकाशात एकदा नजर फेकली. ते खाली पाहू लागले. पोपट आणि नीलकंठ या पक्ष्यांचे थवे उडत होते. शीज्जिरिका (हमिंग बर्ड) सारखे चिमुकले पक्षी संचार करताना दिसत होते. हंस पक्षी हिमशिखरावरून उडत होते. दक्षिणेकडे स्थलांतर करताना याच शिखरावर त्यांनी रात्री विसावा घेतला. आकाशात उंच उडताना ते मुंग्याएवढे लहान दिसत. पुढे त्यांचा थवा एखाद्या सुतळीसारखा बारीक दिसत होता. नंतर अवकाशात ते दिसेनासे झाले. तासामागून तास गेले, तरी मोठे गरुड काही दिसले नाहीत! नवजात गरुड भुकेने व्याकूळ झाले, अन् घरट्यात आपसात चिडचिड करू लागले. आपसात भांडत असल्याचा गलबला घरट्याच्या आंतरभागातून येत होता. वरचे वर गलबलाट वाढतच होता. शेवटी वैतागून एका गरुडाने घरटे सोडले अन् कड्यावरून तो उडू लागला. आम्ही देखील उंचावर चढत होतो. पंखाची किंचित देखील हालचाल न करता तो सहजपणे हवेत तरंगत होता. मध्यान्हीची वेळ झाली. आम्ही जेवून घेतले. तरीही त्याच्या आईबापाचा पत्ता नव्हता. घरट्यात थांबलेले गरुडाचे पोर म्हणजे त्याची बहीणच होती. कारण ती त्या गरुडापेक्षा लहान दिसायची. वाऱ्याच्या दिशेला तिचे तोंड होते. डोळे किलकिले करून ती दूरवर पाहत होती. शेवटी ती निराश झाली. हिमालयातील गरुड बालपणापासून वाऱ्याच्या दिशेला तोंड करून



बसतात ते पार त्यांना उडता येईपर्यंत, जसा दर्यावर्दीचा पोर गलबत चालवायला शिकेपर्यंत सागराकडे पाहत असतो. याला मी कधी अपवाद पाहिला नाही. दुपारी दोन वाजेपर्यंत ती घरट्यात बसून कंटाळली. मग ती आपल्या भावाच्या शोधात निघाली. तो आता उंच कड्यावर बसला होता. त्यांचे तोंडदेखील वाऱ्याच्या दिशेला होते. बहिणीला येतांना पाहून त्याला आनंद झाला. केवळ अन्नासाठी दाही दिशा फिरावे लागते असे मनात येणारे उदास विचार बहिणीला पाहताच कुठल्याकुठे निघून गेले. त्याला वाटले आपण काही एकटे नाही. गरुड आपल्या पोरांना उडायला शिकवत नाहीत. जोपर्यंत ती भुकेने व्याकूळ होत नाहीत तोपर्यंत आपले पंख उघडणार नाहीत. गरुड मातापित्याला हे चांगले माहीत असते. म्हणूनच पोरे मोठी झाली अन् उडण्याची वेळ आली की ते त्यांचा त्याग करतात.

ती छोटी बहीण मोठ्या कष्टाने उंच उडत आपल्या भावाजवळ आली. परंतु दोघे बसू शकतील एवढी जागा नव्हती. बैठकीवर संतुलन साधण्याऐवजी बहिणीच्या धक्क्यामुळे त्याचा तोल गेला. तोच त्याने आपले पंख पसरले. हवेत तरंगत तो वर वर जात होता. त्याने आपल्या पंजांची नखे बाहेर काढली. परंतु जमिनीवर पोचायला त्याला उशीर झाला. म्हणून पंखांची उघडझाप करीत तो थोडा उंच उडाला. सुकाणूसारखे उपयोगात येणारे शेपूट त्याने खाली केले, अन् तो पूर्व, दक्षिण, पूर्व अशा दिशांना झुकत राहिला. तो आमच्या डोक्यावरून उडत होता. त्याच्या पंखातून वाहणाऱ्या वाऱ्याचा आवाज येत होता. एवढ्यात जिकडे तिकडे विलक्षण शांतता पसरली. रातकिड्यांची किरकिर बंद झाली. सशांनी आपल्या बिळाचा आश्रय घेतला. नवजात खगेंद्र हवेतून उड्डाण घेत क्षणोक्षणी अंतराळात जात असल्याचे कौतुक पाहण्यासाठी जणू झाडांच्या पानांची सळसळ देखील थांबली होती. त्याला वर वर जाणे आवश्यक होते. तसे जाण्यानेच तो ज्याच्या शोधात आहे ते त्याला प्राप्त झाले असते. अठराशे ते तीन हजार फूट उंचीवरून ससा दुडक्या

चालीत जमिनीवरून जात असल्याचे काहीवेळा गरुडाला सहज दिसते. नंतर क्षणात आपले पंख मिटून विजेच्या चपळाईने क्रेंकार करीत तो खाली येतो. त्याचे आगमन होताना जो प्रचंड ध्वनी येतो त्यामुळेच बिचाऱ्या श्वापदांवर मोहिनी पडते. त्याक्षणी गरुड झडप घालून भक्ष्याला जागच्या जागी खिळवतो आणि क्षणभरात त्याच्या तीक्ष्ण नखांची पकड भक्ष्याच्या मानेवर बसते.

आपला भाऊ दूर निघून जातोय आणि आपल्याला एकटेच राहावे लागेल या भीतीने तिने देखील उडण्यासाठी पंख पसरले. खालून वाहणाऱ्या वाऱ्याच्या प्रवाहातून ती उंच उंच जाऊ लागली. हवेत तरंगू लागली. शेपटीचा सुकाणूसारखा उपयोग करून ती भावाच्या दिशेने उडू लागली अन् काही क्षणातच दोघे दिसेनाशी झाली. आता हा पर्वत सोडून चित्रग्रीवाच्या शोधासाठी जाणे आम्हाला भाग होते. वाटले तो देंटमला तर गेला नसेल! पूर्वी ज्या ठळक स्थळांचा दिशा ओळखण्यासाठी त्याला साहाय्य झाले होते त्या लामासराई आणि किल्ला याठिकाणी चित्रग्रीवाचा शोध घ्यावा लागणार होता.



## चित्रग्रीवाच्या शोधात



निर्मनुष्य आणि माणसाच्या विस्मृतीत गेलेल्या दऱ्या, खोरी आणि खिंडी ओलांडीत आम्ही खाली उतरत होतो. इतक्यात आम्ही उत्तरोत्तर अंधार वाढत असलेल्या जगात प्रवेश केला. ती भर दुपारची वेळ होती. उंच पर्वताच्या लांबच लांब सावल्यांमुळे हा अंधार वाढला होता. थंडगार वारे वाहत असल्याने आम्ही झपाट्याने पावले टाकत होतो. हजार एक फूट उंचीवरून खाली उतरताच हवेतील उबदारपणा जाणवू लागला. परंतु जशी रात्र होऊ लागली तसे तापमान कमी होऊन थंडीचा कडाका वाढला. शेवटी आम्हाला एका ओळखीच्या बुद्ध मठात आश्रय घ्यावा लागला. तिथल्या बुद्ध भिक्षूंनी आमचे चांगले आगत-स्वागत केले. रात्रीचे भोजन वाढतांना आणि नंतर अतिथीगृहात पोचवितांना ते आवश्यक तेवढेच बोलत, सायंकाळी ध्यान करीत.

डोंगरात खोदलेल्या तीन विहारांत आम्ही थांबलो. समोर कुंपण असलेली हिरवळ होती. विहारात दिव्याचा मंद प्रकाश पडला होता. तिथे गवताच्या चटया अंथरलेल्या होत्या. प्रवासामुळे आम्ही इतके थकलो होतो की अंथरुणावर पाठ ऐकताच निद्रादेवीच्या आधीन झालो. दुसऱ्या दिवशी ब्राह्ममुहुर्तावर मला जाग आली. तत्पूर्वी येणाऱ्या जाणाऱ्या

भिक्षूंच्या पावलांच्या आवाजामुळे माझी झोप चाळवली होती. मी अंथरुणातून उठलो, अन् पावलांच्या आवाजाच्या दिशेने चालू लागलो. इतक्यात मला प्रकाशाचा प्रखर झोत दिसला. त्या अनुरोधाने पहिल्यांदा मला खाली उतरावे लागले. नंतर अनेक पायऱ्या चढून गेल्यानंतर बुद्ध मंदिराचा मध्यवर्ती मठ दिसला. तो मठ म्हणजे पर्वताच्या प्रचंड शिळा प्रस्तरातून खणलेली एक मोठी गुहा होती. कातळाचे छत असलेले हे विहार तीन बाजूनी उघडेच होते. तिथे आठ भिक्षू दिवे घेऊन उभे होते. त्यांनी ते हळूच शेव केले, अन् पद्मासन घालून ते ध्यानस्थ झाले. त्यांच्या पिंगट चेहऱ्यावर आणि निळ्या झग्यावर सौम्य प्रकाश पडला होता. त्यांच्या प्रसन्न मुद्रेवर दृगोचर होत होती ती फक्त शांती आणि प्रेम.

त्यासमयी त्यांचा नायक मला हिंदीत म्हणाला, "गेल्या अनेक शतकापासून आमची परंपरा आहे की जे कोणी निद्रावस्थेत असतात त्यांच्यासाठी आम्ही प्रार्थना करतो. रात्रीच्या अशा शांत प्रहरी निद्रानाश झालेल्या व्यक्तींना देखील त्यांच्या व्याधीचा विसर पडतो. माणूस झोपला की तो मनाच्या नेणिवेत जातो. आम्ही प्रार्थना करतो. त्या दयाघनाच्या कृपेने त्यांचे कल्याण होवो. जेव्हा ते प्रभात समयी जागे होतात तेव्हा त्यांचा दिनक्रम पवित्र आणि मांगल्यानं सुरू होतो. जीवी धारिष्ट धरुन जीवनाचे प्रेमाने स्वागत करतो." पुढे त्याने विचारले, "ध्यानाला बसणार काय?"

मी लगेच होकार दिला. आम्ही मानवांच्या शुभ कल्याणासाठी प्रार्थनेला बसलो. आजही प्रातःकाळी जेव्हा जाग येते तेव्हा झोपलेल्या स्त्री-पुरुषांचे विचार पवित्र व्हावेत म्हणून ईश्वराची करुणा मागणाऱ्या बुद्धभिक्षूची आठवण झाल्याशिवाय राहत नाही.

अरुणोदय झाला. पर्वताच्या एका उंच कड्यावर बौद्ध मठ उभा होता. मी खाली पाहतो तो पायानजीकच सरळ कडा दिसला. तेथून डोकावत असता भोवळ येत होती. सूर्यनारायणाच्या सोनेरी किरणात चांदीच्या घंटीची किणकिण ऐकू येत होती. चांदीसोन्याच्या मधुर



घंटीनादाने वातावरण मुखरित झाले होते. उदयाचली येणाऱ्या सूर्याच्या स्वागताची ही जणू पूर्व तयारीच होती. सूर्योदयाबरोबर तिमिराचा नाश होत होता—

मला सहजच मंत्र आठवला :

तमसो मा ज्योतिर्गमय
मृत्योर्मा अमृतं गमय।

न्याहारीच्या वेळी माझा मित्र राजा आणि महाजनाची भेट झाली. आम्ही अल्पोपाहार घेत असता बौद्धभिक्षू म्हणाले, "काल तुमचे कबुतर इथं आश्रयाला आले." चित्रग्रीवाचे तंतोतंत वर्णन करताना त्याच्या नाकाजवळच्या गाठीचा आकार आणि रंग ते विसरले नव्हते.

महाजनाने त्यांना विचारले, "आम्ही कबुतराच्या शोधात आलो हे आपण कसं ओळखलंत?" डोळ्याची पापणी न लवता बौद्धभिक्षू म्हणाले, "मी तुमच्या मनातील विचार ओळखू शकतो."

"आमचे विचार आपण कसे जाणू शकता?" राजाने अधीरतेने विचारले.

"सर्व जण सुखी व्हावे म्हणून जर त्या करुणानिधीची दिवसातील चार तास आराधना केली तर एका तपानंतर त्याच्या कृपेनं लोकांच्या मनातील विचार ओळखण्याचं आत्मबल प्राप्त होतं. त्यातल्या त्यात इथं ज्याचं आगमन होतं त्याचा मनोदय सहज जाणता येतो," अन् पुढे ते म्हणाले, "तुमच्या कबुतरानं इथं आसरा घेतला तेव्हा त्याला आम्ही चारापाणी दिलं. तसंच त्याच्या मनातील भय नाहीसं केलं." मी आश्चर्यचकित होऊन म्हणालो, "भीती नष्ट केली ते कसं देवा?"

त्यावर लामा सहज म्हणाले, "तो खूप घाबरलेला होता म्हणून त्याला हातात घेऊन लाडिकपणं कुरवाळलं आणि म्हणालो की घाबरू नकोस. नंतर काल सकाळी त्याला मुक्त केलं. त्याला आता कशाचंही भेव नाही."

महाजनाने नम्रपणे लामांना विचारले, "असं का केलंत महाराज, हे

सांगू शकाल काय?" त्या देवस्वरूप तपस्वी लामांनी उत्तर दिले, "तू तर मृगया शिरोमणी आहेस--म्हणजे शिकार करण्यात निष्णात आहेस. तुला माहीत आहे की कोणीही मृग अथवा माणूस भ्याल्याशिवाय शत्रूला त्याचा वध करता येत नाही. मी जंगलात पाहिलंय ससासारखा भित्रा प्राणीदेखील जेव्हा निडर असतो तेव्हा तो शिकारी कुत्रा किंवा कोल्हा यांनादेखील दाद देत नाही. भीतीमुळं बुद्धिभ्रंश होतो. त्याचा ज्ञानतंतुंवर आघात होतो. जो कोणी जीव अशा भयचक्रात सापडतो त्याचा मृत्यू अटळ आहे."

"देवा, मला हे सांगा की आपण त्या पाखराला भयमुक्त कसं केलंत?" राजाच्या या प्रश्नाचे उत्तर देताना ते पुण्यशील लामा म्हणाले, "जर तुम्ही भयमुक्त असाल तर तुमचे विचार शुद्ध आणि मंगलदायक असतील. तसंच अनेक महिने स्वप्नात देखील भ्याला नसाल तर तुम्ही ज्या प्राणिमात्रांना स्पर्श कराल तो भयरहित होईल. तुमच्या कबुतराच्या मनातून भयगंड नाहीसा झाला आहे. त्याला मी हातात धरून गोंजारलं आहे. किमान गेली दोन दशकं तरी काया, वाचा आणि मनानं मी या सर्व प्रमादांपासून दूर आहे. सध्यातरी तुमचं कबुतर सुरक्षित आहे. त्याला कसलीही इजा होणार नाही."

त्या तपाचरणी लामाच्या सहज उद्‌गारातून आलेल्या शब्दाशब्दातून विश्वास प्रगट होत होता. एक खरे की चित्रग्रीवाला आता कसलाच धोका नव्हता. अधिक विलंब न करता मी त्या बुद्ध श्रमणाचा निरोप घेतला अन् दक्षिणेकडे प्रयाण केले. त्या श्रमणाच्या आशीर्वचनावर माझा पूर्ण विश्वास होता. दर दिनी लोककल्याणासाठी तुम्ही देवाजवळ अर्चना केली तर त्यांचा दिवस पावित्र्य आणि मंगलमय कामना, तसेच धैर्य न प्रेम यांनी युक्त असतो.

आम्ही देंटमकडे मजल दरमजल करीत निघालो. जसजसे खाली उतरू लागलो तसतशी हवा नेहमीसारखी उबदार वाटू लागली. ऱ्होडोडेन्ड्रानचे वृक्ष आता दिसेनासे झाले. शिशिर ऋतूचा प्रभाव



वरच्याइतका इथे जाणवत नव्हता. अजूनही इथल्या झाडांची पाने गुलाबी, सोन्यासारखी पिवळी, लाल आणि ताम्रवर्णी दिसत होती. चेरी वृक्षांवर अजूनही कामुन्या (बेरी) दिसत होत्या. झाडाझाडांवर दाट शेवाळ वाढले होते. त्यावर हाताच्या मुठीइतकी आमरीची अंजिरी आणि गुलाबी फुले हवेत डोलत होती. मंद वायुच्या लहरींबरोबर या फुलांचे परागकण शेवाळावर पसरत होते. वाटेत कुठे कुठे धोतऱ्याची फुले फुलली होती. त्या शुभ्र फुलांवर दवबिंदू चमकत होते. वृक्षराजी उंच आणि विशाल वाटत होती. बांबूंचे उंचच उंच शेंडे आभाळात एखाद्या मिनारासारखे शोभत. अजगराएवढ्या जाडीच्या वेली वाटेत पसरल्या होत्या. रातकिड्यांची किरकिर इतकी वाढली की ती असह्य वाटू लागली. नीलकंठ पक्षी इकडून तिकडे उडत होते. अधूनमधून हिरव्यागार पोपटांचा थवा उडताना वाटे की जणू पाचूचा कंठा सूर्यासमोरून ओघळत नाहीसा होत आहे. नाना प्रकारची कीटक सृष्टी विपुल होती. काळ्या मखमली पंखाच्या फुलपाखरांचा थवा फुलाफुलांवरून बागडत होता. गुणगुणणाऱ्या असंख्य माशांवर अनेक छोटे छोटे पक्षी तुटून पडत होते. नांगी असणारे कीटक आम्हाला डसत. समोरच्या रस्त्यावरून सरपटत जाणाऱ्या सर्पाला पाहून आम्ही जागच्या जागी थबकलो. अरण्यावाचन करणारा आणि वनविद्या जाणणारा महाजन आमच्यासोबत नसता तर विषारी सापांनी आम्हाला दंश केला असता आणि रानम्हसरांनी तुडविले असते. आजूबाजूला संचार करणाऱ्या वन्यप्राण्यांच्या सावटीवरून त्यांचे अस्तित्व त्याला ज्ञात होत असे. प्रचंड रानटी श्वापदाच्या चालण्यामुळे जमीन कंपायमान होई. त्यावेळी महाजन धरतीला कान लावून लक्षपूर्वक ऐकत असे. नंतर तो कळप किती अंतरावर आहे, हे सांगत असे. काही वेळाने तो म्हणे, "आपल्या समोरून रानम्हशींचा कळप येत आहे. तो निघून जाईपर्यंत इथंच थोडा वेळ थांबू या." काही वेळानंतर रानम्हशींच्या कळपाची सावट ऐकू येई. त्यांच्या तीक्ष्ण खुरांनी झुडपे कराकरा कापली जातांनाचा आवाज पार आमच्या कानावर

आदळे. अशा अनेकविध संकटांना तोंड देत आम्ही वाटचाल करीत होतो. मध्यंतरी दुपारच्या वेळी दशम्या खाण्यासाठी थांबावे लागले. शेवटी एकदाचे आम्ही सिक्कीमच्या सरहद्दीवर पोचलो.

तोच आम्ही एक अविस्मरणीय असे सुंदर दृश्य पाहिले. जंगलात समोरून एक रस्ता जात होता. तो क्षणोक्षणी बदलत्या उन्हात तिथे अनेक रंगाच्या संमिश्र लहरी दिसत होत्या. आम्ही काही पावले पुढे गेले असू, तोच हिमालयातील जीवजीवकांचा (फिझंट), थवा मेघगर्जना व्हावी तसा उडत जंगलात नाहीसा झाला. ते अभूतपूर्व दृश्य होते. उन्हात त्यांचे पंख मोरपिसांसारखे चमकत होते. आम्ही वाटचाल करीतच होतो. काही वेळाने पक्ष्यांचा दुसरा थवा उडाला. त्यातील पक्षी मात्र मातकट वर्णाचे होते. मला त्याविषयी जिज्ञासा वाटून महाजनाला त्याविषयी विचारले.

तो म्हणाला, "अरे, एवढं तुझ्या लक्षात कसं येत नाही! आपण येण्यापूर्वी या वाटेनं याक चमुरू बैलांचा काफला गेला होता. त्यांच्या पाठीवर तांबूस धान्याच्या गोणी लादल्या होत्या. त्यातील एखाद-दुसऱ्या गोणीला भोक पडल्यामुळं त्यातील धान्य रस्त्यावर सांडलं. जंगलात इतस्ततः चरत असलेल्या या पक्ष्यांनी ते पाहताच त्यावर तुटून पडले. ते चरण्यात मग्न असताना आपण अकस्मात इथं पोचलो. आपल्या चाहुलीनं ते पक्षी बुजून उडाले."

"अरण्यविद्येविषयी तू सर्व काही जाणतोस म्हणूनच तर तुला महाजन म्हणतात. तर तू मला असं सांग की थव्यातील नर पक्ष्यांचा पिसारा इतका रंगीबेरंगी, सुंदर का? आणि पक्षिणी मात्र अनाकर्षक, मातकट रंगाच्या कशा? नर आणि मादी पक्ष्यांना सौंदर्य देतांना असा पक्षपात का करावा?"

त्यावर महाजन खुलासा करताना म्हणाला, "आजूबाजूच्या परिसरात आहार विहार करताना ते पक्षी सहज दिसू नयेत, तसंच शत्रूपासून स्वतःचं रक्षण व्हावं म्हणून निसर्गानं या पाखरांना रंगगोपन दिलं आहे.



तू त्या जीवजीवक पक्ष्यांना पाहिलंस ना? ते एखाद्या मयूरचित्रकासारखे सहज दृष्टीस पडतात. त्यामुळं एखादा आंधळा माणूस देखील त्यांची सहज पारध करू शकेल.

त्यावर राजाने विचारले, "अशी त्यांची शिकार करता येईल काय?

महाजन म्हणाला, "नाही! कारण ते पक्षी झाडांच्या आश्रयानं राहतात. अन् जमीन खूप तापल्याशिवाय ते खाली उतरत नाहीत. आपल्या हिंदुस्तानसारख्या प्रदेशात जमिनीपासून दोन इंचावरील हवा इतकी तापलेली असते की त्यामुळं वातावरणात लक्षावधी रंगाच्या छटा दिसू लागतात. अन् जीवजीवकांच्या पंखां-पिसाऱ्याच्या रंगाशी त्याचं साम्य असतं. त्या रंगगोपनामुळंच ते पक्षी आपणाला दिसत नाहीत. काही क्षणापूर्वी आपणाला भास झाला की हा रस्त्याचाच भाग आहे. म्हणून तर आपले पाय त्यांच्यावर पडता पडता बचावले."

"ते माझ्या ध्यानात आलं," राजा म्हणाला, "परंतु माद्या मातकट रंगाच्या का असाव्यात अन् त्या नराबरोबर का उडून गेल्या नाहीत?"

महाजनाने लगेच उत्तर दिले, "जेव्हा शिकारी अकस्मात पक्ष्यांना गाठतात, तेव्हा नर पक्षी त्याच्या गोळीला समोर जातात. हेतू हा की माद्यांचं रक्षण व्हावं. माद्यांचे पंख बळकट नसतात. त्यांचे पंख मातकट असल्यामुळं पिलांना पंखांखाली घेऊन त्या तशाच जमिनीवर मुरतात. जमिनीशी झालेल्या त्यांच्या रंगगोपनामुळं त्या अजिबात शिकाऱ्याला दिसत नाहीत. वध झालेल्या त्यांच्या जोडीदारांच्या शोधात जेव्हा शिकारी जातात तेव्हा या संधीचा फायदा घेऊन माद्या आपल्या पिलावळीसह जवळच्या झाडीत निसटून जातात. जर वाढलेली पिलं त्यांच्या बरोबर नसतील तरीही त्या धपकन जमिनीवर पडतात. पंख जमिनीवर पसरतात. जणू काय पिलांचं संरक्षण करीत असल्याचे नाटक करतात. पिलांच्या संरक्षणासाठी प्राणार्पण करण्याचं आचरण त्यांच्या जीवनाचा भाग बनतो. मग पिलं त्यांच्या सोबतीला असोत वा नसोत. त्या आपले पंख मातीवर उघडून पडलेल्या असतात. आपण अशाच

वेळी जेव्हा अकस्मात त्यांच्या नजीक पोचलो तेव्हा त्यांना असहाय वाटलं. तसंच त्यांच्या संरक्षणासाठी आजूबाजूला कुणीच नव्हतं. त्यामुळं त्यांना विवशतेनं उडून जावं लागलं."

काळोख पडू लागल्यामुळे आम्ही एका सिक्किमी सद्‌गृहस्थाकडे थांबलो. त्यांचा मुलगा आमचा चांगला मित्र होता. इथेच चित्रग्रीवाचा ठावठिकाणा लागला. ह्या घरी तो अनेकवेळा आल्यामुळे त्या घरातील माणसे त्याच्या चांगल्या परिचयाची होती. इथे तो नुकताच आला होता. या ठिकाणी चारापाणी घेतल्यानंतर त्याने आंघोळ केली होती. चोचीने पंख साफ करताना जांभळ्या रंगाची दोन पिसे खाली पडली होती. ती माझ्या मित्राने शोभेसाठी मुद्दाम जपून ठेवली होती. ती पिसे पाहून मला अत्यानंद झाला. त्या रात्री मी सुखासमाधानाने झोपलो. अशा शांत झोपेचे आणखीन एक कारण होते. महाजनाने आम्हाला सल्ला दिला होता की चांगली विश्रांती घ्या. कारण उद्या दिवसभर वाटचाल करून रात्री जंगलात मुक्काम करावयाचा आहे.

दुसऱ्या दिवशी रात्री आमचा मुक्काम घनदाट जंगलातील एका झाडावर होता. तेव्हा मला सिक्किमी मित्राच्या घरातील सुखसोयींची आठवण झाली.

दिवसभराच्या वाटचालीनंतर भयानक जंगलाच्या आंतरभागातील एका विशाल वटवृक्षावर रात्र काढायची तेव्हा एखाद्याच्या मनाची स्थिती काय होत असेल, याची कल्पनाच केलेली बरी. ते झाड शोधून काढण्यासाठी आम्हाला अर्धा एक तास लागला. उंच पर्वतावर वडांची झाडे वाढत नाहीत. आम्ही मोठ्या वडाच्या झाडाच्या शोधात होतो. कारण नुसतीच सरळसोट वाढलेली झाडे यादृष्टीने कुचकामाची असतात. रानटी हत्तीने अशा झाडाच्या बुंध्यावर मागेपुढे होऊन जरी अंग घासले तर ते कोलमडून खाली पडते. अशाच कारणामुळे काही बळकट झाडांच्या सालीला इजा पोचते. हत्तीची सोंड वरच्या फांद्यापर्यंत पोचू नये किंवा शक्तिनिशी सुळ्यांच्या साहाय्याने रेटा दिला तरी झाड



कोलमडणार नाही अशा सुरक्षित झाडाच्या आम्ही शोधात होतो.

शेवटी एकदाचे आम्हाला हवे ते झाड मिळाले. महाजनाच्या खांद्यावर राजा आणि राजाच्या खांद्यावर मी उभा राहून चांगल्या बळकट फांदीवर चढून बसलो. आम्ही दोरखंडाची शिडी नेहमी अशा प्रवासात जवळ ठेवीत असू. त्या शिडीचे एक टोक फांदीला मजबूत बांधून खाली सोडले. राजा शिडीने वर येऊन माझ्या शेजारी बसला. अन् महाजन आम्हा दोघांमध्ये स्थानापन्न झाला. आम्ही खाली नजर फेकली. जिकडे तिकडे कभिन्न अंधार होता. जेथे काही क्षणापूर्वी महाजन उभा होता तेथे हिरव्या प्रकाशाचे दोन ठिपके चमकताना दिसले. ते कोणाचे आहेत हे आम्हाला माहितीच होते. महाजन गमतीने म्हणाला, "जर मी दोन मिनिटं उशिरा खाली थांबलो असतो तर पट्टे असलेल्या या जनावरानं मला ठार केलं असतं."

आपल्या तावडीतील सावज सुटल्याचे पाहून वाघाने डरकाळी फोडली. साऱ्या आसमंतात ती भयानक गर्जना पसरली. जिकडे तिकडे एकदम विलक्षण शांतता पसरली. सारे काही चिडीचूप झाले. ती डरकाळी दऱ्याखोऱ्यांत दूरपर्यंत घुमत गेली अन् शेवटी जंगलात विलीन झाली.

शिडीच्या दोरीचे एक टोक महाजनाने स्वतःच्या कमरेभोवती बांधले. नंतर राहिलेला भाग राजा आणि माझ्या कमरेभोवती बांधला. त्याचे दुसरे टोक झाडाच्या मुख्य फांदीला बांधले. अशारितीने आम्ही फांदीवर सुरक्षित बसलो. ती फांदी आमच्या ओझ्याने तुटणार नाही याची खात्री केली. झोपेत आमच्यापैकी कोणी जमिनीवर पडू नये म्हणून इतकी काळजी घ्यावी लागली. कारण झोपेत शरीर शिथिलावस्थेत असते. ते एखाद्या दगडाप्रमाणे खाली पडू शकते. गाढ झोपेत महाजनाच्या हाताचा उपयोग आम्हाला उशीसारखा झाला.

अशी सर्वप्रकारे आवश्यक ती काळजी घेतल्यावर आमचे लक्ष खाली काय चाललेय याकडे वेधले. आम्ही ज्या झाडावर बसलो होतो



त्या झाडाखालचा वाघ निघून गेला होता. रातकिड्यांची किरकिर पुन्हा चालू झाली. दूर असलेल्या झाडावरून कसलेतरी अवजड धूड अल्लाद खाली आले. तशी रातकिड्यांची किरकिर पुन्हा थांबली. रात्र होताच, दिवसभर झाडावर झोपलेल्या बिबट्या वाघांनी शिकारीला जाण्याकरिता खाली उड्या घेतल्या होत्या.

बिबट्या वाघ निघून जाताच बेडकांचा डरॉव डरॉव आवाज ऐकू येऊ लागला. रातकिड्यांचा सतत आवाज अन् घुबडांचा घुत्कार चालू होता. जसे हिऱ्याला अनेक पैलू असतात तसेच आवाजालाही लक्षावधी पैलू असतात. जंगलातील अनेक प्रकारच्या सावटी क्षणाक्षणाला कानावर आदळत. समोर जे दिसले ते तुडवत आणि मोडत बेमुर्वतपणे रानडुक्कर गेले. इतक्यात बेडकांचे गाणे बंद झाले. खालच्या भागातील उंच गवत आणि झुडपातून कोणते तरी सरपटणारे श्वापद जात असता त्याची नागमोडी हालचाल गवताच्या हलण्यावरून दृगोचर होत होती. त्याच्या फुत्काराचा आवाज जवळ जवळ येत होता. नंतर ते झाडाखालून जाताना दिसले. तेव्हा कुठे आम्हाला हायसे वाटले. ते धूड तसेच पाणझरीकडे गेले. आम्ही अगदी शांत बसलो होतो. तरीदेखील श्वासोच्छवासांच्या होणाऱ्या आवाजाने अजगराचे आमच्याकडे लक्ष वेधील की काय असे महाजनाला वाटे.

काही वेळाने फांद्या मोडल्याची सावट ऐकू येऊ लागली. बाराशिंगाची भारशिंगे वेलीत अडकल्यामुळे, स्वतःची सुटका करून घेण्यासाठी तो धडपडत होता. कसातरी तेथून तो निसटला. त्यानंतर जंगलात अगदी गूढ शांतता पसरली. काहीतरी अघटित घडणार की काय असे वाटत होते. हळूहळू एक एक सावट जंगलात विरघळून जात होती. आता फक्त तीन आवाज काय ते कानावर येत होते. रातकिड्यांची किरकिर, पाणझरीजवळ अजगराने बाराशिंगाच्या शरीराभोवती घातलेल्या मरणप्राय विळख्यामुळे त्याच्या तोंडातून येणारा आर्तस्वर, अन् वाऱ्याचे घोंघावणे. आता रानटी हत्तीच्या कळपाचे आगमन होत होते. त्या तांड्यात पन्नास



एक तरी हत्ती असावेत. आम्ही ज्या वडाच्या झाडावर बसलो होतो त्याभोवतीच ते हिंडू-फिरू लागले. हत्तिणींचा चीत्कार, हत्तींचा किंकाट, त्याच्या छाव्यांचा हुंदडण्याचा आवाज यांनी वातावरण मुखरित झाले.

इथे बसल्या बसल्या डुलकी लागली. त्यामुळे पुढे काय घडले हे मला आठवतदेखील नाही. मी चित्रग्रीवाशी नीळावंतीच्या भाषेत बोलत होतो. धड निद्रावस्था नव्हे, धड स्वप्नावस्था नव्हे—अशी काहीतरी गोंधळलेली परिस्थिती मी अनुभवत होतो. कुणीतरी मला हालवून जागे केले. अन् काय आश्चर्य. महाजन हळू आवाजात कुजबुजत होता, "जागा हो! पुढं काय काढून ठेवलंय ते तरी बघ. मस्तीला आलेला हत्ती कळपाच्या मागं राहिला आहे, हा एकांड्या आपणाला इजा करेल. त्याची सोंड आपल्या पावेतो पोचू शकणार नाही, एवढ्या आपण उंच ठिकाणी नाही. जर का त्यानं हवेत सोंड उंच केली तर त्याला आपला सुगावा लागल्याशिवाय राहणार नाही. रानटी हत्तींना माणसं आवडत नाहीत. ते त्यांचा द्वेष करतात. जर का एकदा आपला वास त्याला आला की तो आपणाला शोधून काढीपर्यंत इथून हालणार नाही. सावध हो पोरा! अन् शत्रू हल्ला करण्यापूर्वी दक्षतेचं खड्ग घेऊन सावध राहा."

त्या हत्तीविषयी आमचा अंदाज चुकला नाही. ब्राह्ममुहूर्ताच्या सौम्य प्रकाशात एखाद्या काळ्या ढगासारखा तो आमच्या झाडाभोवती पिंगा घालत होता. एका झाडापासून दुसऱ्या झाडापर्यंत तो त्वेषाने जाई अन् हिरव्या फांद्या तोडी. खरे म्हणजे अशा ऋतूत चाऱ्याचे दुर्भिक्ष असते. परंतु त्या ऋतूचा प्रभाव अद्यापि या वनावर पडलेला नव्हता. तो बुभुक्षित मस्त हत्ती हिरव्या चाऱ्यावर तुटून पडला. अर्ध्या एक तासानंतर तर त्याने कमालच केली. पुढचे पाय झाडाच्या बुंध्यावर ठेवून तो मागच्या पायावर उभा राहिला अन् झाडांच्या फांद्यातून सोंड फिरवू लागला. ते धूड पाहून मला अति पुरातन काळातील हत्तीची आठवण झाली. अशा अवस्थेत त्याची सोंड पार वृक्षाच्या छतापर्यंत पोचली. झाडाच्या शाखेच्या रुचकर डहाळ्या तोडून त्याने खाल्ल्या. हिरव्या फांदोऱ्यांचा चारा

संपल्यावर तो आमच्या शेजारच्या झाडाजवळ आला. तेथेही त्याचप्रकारे त्याने झाडांची पाने खाल्ली. त्यानंतर एक किरकोळ झाड त्याने सोंडेने खाली पाडले. पुढचा पाय त्यावर ठेवताच ते कडाड मोडून पडले. त्यावरची सारी पाने त्याने ओरबाडून खाल्ली. सकाळच्या न्याहारीसाठी त्याने जंगलात जी खळबळ माजविली, त्यामुळे पाखरे बुजून उडाली, तर माकडे एका झाडावरून दुसऱ्या झाडावर उड्या मारू लागली. नंतर तुटलेल्या झाडाच्या खुंटावर पाय ठेवून ज्या फांदीवर आम्ही बसलो होतो त्या फांदीला सोंड लागली, तसा त्याला माणसाचा वास आला. या वासाला वन्यप्राणी खूप घाबरतात. त्याक्षणी आम्हाला त्याचा किंकाट ऐकू आला. अन् त्याने लगेच सोंड बाजूला घेतली. नाराजी व्यक्त करण्यासाठी त्याने तुतारीसारखा आवाज काढला. महाजनाच्या अगदी तोंडासमोर त्याने सोंड आणली. तशी महाजनाला जोराची शिंक आली. माणसांनी जणू वेढा घातला आहे या भयाने त्याची गाळण उडाली. तो तुतारीसारखा आवाज करीत एखाद्या झपाटलेल्या पिसाटासारखा जंगलातून सैरावैरा धावू लागला, वाटेत जे काही समोर येईल ते तो तोडत-मोडत होता, तसा पोपटांचा विशाल थवा आभाळात उडाला. माकडे झाडाझाडांवर उड्या घेत भीतीने किलकिलाटू लागली. रानडुकरे आणि मृगपरिवार वाट फुटेल तिकडे जंगलात पळू लागली. काही काळ जंगलात झाडावरच थांबावे लागले. अशा परिस्थितीत पुढची वाटचाल करण्यासाठी खाली उतरण्याचे धैर्य झाले नाही.

सुदैवाने वाटेत आम्हाला एक व्यापारी काफिला भेटला. त्यांनी आम्हाला काफल्यातील घोड्यावर बसवून देंटम येथे आणून सोडले. आम्ही तिघे प्रवासाने पार थकून गेलो होतो. पण आमच्यासमोर चित्रग्रीव आपल्या कबुतरखान्यात बसलेला पाहून खूप आनंद झाला. झोपी जाण्यापूर्वी, त्या सायंकाळी शांतपणे आश्वासन देणाऱ्या त्या लामाची आठवण झाली. तो म्हणाला होता, ''तुमचा पक्षी सुरक्षित आहे.''

## चित्रग्रीवाचे पलायन



आमच्या आगमनाच्या दुसऱ्या दिवशीच चित्रग्रीव सकाळीच जो उडाला तो पुन्हा काही परतला नाही. चार दिवस आम्ही त्याची आतुरतेने वाट पाहिली. आता त्याची अधिक प्रतीक्षा न करता महाजन आणि मी त्याला शोधून काढण्याचे ठरविले. सिक्किमच्या प्रवासासाठी या खेपेस आम्ही दोन तट्टे भाड्याने घेतली. वाटेत लोकांजवळ चित्रग्रीवाविषयी चौकशी करीत करीत कोणत्या मार्गाने जायचे हे ही निश्चित केले. बऱ्याच लोकांनी त्या पक्ष्याला पाहिले होते. काही जणांनी त्याचे हुबेहूब वर्णन केले. बौद्ध मठातील घराच्या आढ्याखाली आभोळ्यां (स्विफ्ट) बरोबर तो घरटे करून राहत असल्याचे एका शिकाऱ्याने मला सांगितले. एका बौद्ध भिक्षूने सांगितले की सिक्किममधील नदीकाठच्या एका बौद्ध मठात हुबेहूब त्याला पाहिले होते. या नदीकाठी रानबदके घरटी करतात. दुसऱ्या दिवशी दुपारी तिथल्या एका गावातून जाताना कळले की चित्रग्रीव आभोळ्यांच्या थव्याबरोबर उडत होता.

चित्रग्रीवाविषयीच्या चांगल्या वार्ता ऐकत ऐकत आम्ही सिक्किमच्या सर्वात उंच पठारावर पोचलो. तिसऱ्या दिवशी रात्री आम्हाला उघड्यावर

तात्पुरता तळ ठोकणे भाग पडले. आमची तट्टे अगदी थकून गेली होती. आम्हालाही झोप आवरत नव्हती, म्हणून आम्ही पथाऱ्या पसरून झोपलो. एका तासाने मला जाग आली. जिकडे तिकडे विलक्षण गूढ शांतता होती. चोहोकडे उगवत्या चंद्राचा मंद प्रकाश पडला होता. आगोटी जळत होती. या दोहोंच्या अंधुक प्रकाशात आमची तट्टे ताठ उभी होती. टवकारलेले त्यांचे कान कसलातरी खूप दूरवरचा आवाज एकाग्रतेने ऐकण्याचा प्रयत्न करीत होती. त्यांची शेपटीदेखील हालत नव्हती. मी देखील कानात जीव आणून लक्षपूर्वक ऐकत होतो. रात्रीची ती शांतता अवर्णनीय होती. निःस्तब्धता पोकळ असते. परंतु आमच्याभोवती जे शांततेचे आवरण पसरलेले होते ते अभूतपूर्व होते. गूढरम्य होते. जणू काही चंद्रप्रकाशाच्या वाटेने परमेश्वराचे आगमन होत आहे. ते इतक्या जवळून की त्याच्या प्रावरणाला सहज स्पर्श करता आला असता.

त्या शांत वातावरणातून अस्पष्टपणे येणाऱ्या आवाजाचा प्रतिध्वनी ऐकण्यासाठी घोड्यांनी आपल्या कानांची हालचाल केली. देव अंतर्धान पावला. तणावयुक्त वातावरण हळूहळू निवळू लागले. गवताची पातीदेखील थरथरत आहेत असे वाटे. परंतु ही परिस्थिती देखील क्षणभरच टिकली. उत्तरेकडून येणारा ध्वनी घोडे ऐकत होते. सारा प्राण कानात आणून एकचित्ताने तो आवाज ग्रहण करीत होते. मलाही तो ऐकू येत होता. ते कूजन अत्यंत सुरेल आणि संगीतमय होते. एखाद्या नुपुराच्या झंकाराप्रमाणे वाटे. थोड्या वेळाने घोड्यांनी कान झटकले, अन् शेपटी हालविली. मला देखील हायसे वाटले. तोच आकाशातून लक्षावधी हंसाच्या श्रेणीच्या श्रेणी उडतांनाचे अभूतपूर्व दृश्य दिसू लागले. त्या हंसमाला चार हजार फूट उंचीवरून उडत होत्या. त्यांच्या मधुर आणि मंगलमय आवाजाच्या कुजबुजीची पहिली साद घोड्यांना लागली होती तर!

कूजन करीत उडणाऱ्या हंसामुळे पहाटेची चाहूल लागली. मी बसून त्या श्रेणीबद्ध उड्डाणाकडे पाहत होतो. एक एक तारा धूसर होत होता.




घोडे चरू लागले. त्यांच्या पायाला बांधलेल्या दोऱ्या मी सैल केल्या. आता रात्र संपल्यामुळे घोड्यांना आगोटीजवळ बांधण्याची आवश्यकता नव्हती.

थोड्याच वेळात पहाटेच्या शांततेचा प्रभाव साऱ्या चराचर सृष्टीवर पडला. त्याचा परिणाम आमच्या घोड्यांवर देखील झाल्याशिवाय राहिला नाही. यावेळी ते उंच मान करून ऐकत होते. कुठला आवाज ऐकण्याचा ते प्रयत्न करीत होते? परंतु त्यासाठी मला अधिक वाट पाहावी लागली नाही. झाडाझाडावरील पाखरांना हलकेच जाग येत होती. एकीने गायला सुरवात केली. ती गाणारी चिमणी होती. साऱ्या आसमंतात तिचा आवाज भरून राहिला. नंतर इतर गाणारे पक्षी तिला साथ देऊ लागले! आता पर्वताच्या रांगा, विविध वृक्षांच्या छताचे आकार, त्यांचे रंगरूप प्रकाशात दृगोचर होत प्रभातसमयीचे आगमन झाले आणि महाजन प्रार्थना करायला उठला.

चित्रग्रीवाचा शोध घेत भटकत आम्ही सिंगालिलाच्या बौद्धमठात आलो. तेथील लामांनी चित्रग्रीवाविषयी आनंदाची वार्ता दिली. बौद्ध मठाच्या आढ्याखाली घरटी बांधणाऱ्या आभोळ्यांच्या थव्याबरोबर चित्रग्रीव आदल्या दिवशी दुपारी दक्षिण दिशेकडे गेल्याचे त्यांनी सांगितले.

लामांचे आशीर्वाद आणि तिथल्या सराईतील अगत्यशील आतिथ्याचा निरोप घेऊन आम्ही चित्रग्रीवाच्या मागावर निघालो. मागे वळून पर्वताकडे पाहिले. दीपलेल्या कडक उन्हात तो उजळून निघाला होता. वसंतऋतूचे आगमन दर्शवणारी हिरवी, जांभळी आणि सोनेरी वर्णाची वनश्री समोर तळपत होती.

## चित्रग्रीवाची कथा



चित्रग्रीव ज्या ज्या स्थळी गेला, त्याला कोणकोणत्या प्रसंगांना सामोरे जावे लागले याची हकिकत गेल्या प्रकरणात मी सांगितली आहे. दहा दिवसाच्या आमच्या शोध मोहिमेत महाजनाने त्यांचा बरोबर भाग काढला होता. या प्रसंगाची कथा मी सांगण्यापेक्षा चित्रग्रीवाकडून ते आत्मपुराण ऐकू या. आपण कल्पनेचा कोश वापरला तर त्याच्या बोलीचे आकलन व्हायला कठीण जाऊ नये.

चित्रग्रीवाचा शोध लागल्यावर आम्ही कोलकात्याला येण्यासाठी दार्जिलिंग इथे ऑक्टोबर महिन्यात आगगाडीत बसलो. या प्रवासात पिंजऱ्यात असलेल्या चित्रग्रीवाने देंटम ते सिंगालिलाच्या साहसी प्रवासाची कथा सांगण्यास सुरवात केली.

तो सांगू लागला, "हे स्वामी, मनुष्यप्राण्यांच्या अनेक भाषांबरोबर तू पक्ष्यांची भाषा देखील जाणतोस. तर माझी कथा ऐक. तशी ती सरळ नाही. नदीचं मूळ डोंगरात असतं तशी माझ्या कहाणीची सुरुवात पर्वतातून होते."

"गरुडाच्या घरट्याजवळ त्या क्रूर ससाण्यानं आपल्या नखानं माझ्या आईचे तुकडे तुकडे केले. त्यामुळं मी इतका शोकाकुल झालो की मी जीव द्यायचं ठरविलं. पण त्या दुष्ट पक्ष्याच्या पंजानं मला मरण नको होतं. जर कोणाच्या तोंडचा घास व्हायचं तर पक्षिराजाच्या का नको, म्हणून मी गरुडाच्या घरट्याजवळील कड्यावर बसलो. परंतु त्याच्या पिलांनी मला कसलीही इजा केली नाही. त्यांच्या घरावर कोसळलेल्या संकटामुळं ते दुःखी होते. त्यांच्या पित्याला सापळ्यात पकडून ठार मारलं होतं. त्या पिलांची आई जीवजीवक पक्षी आणि सशाच्या शिकारीसाठी दूर गेली होती. त्या पिलांसाठी जी काही शिकार आणून ठेवली होती ती त्यांनी केव्हाच खाल्ली होती. मजसारख्या दीनदुबळ्या जीवावर त्यांनी हल्ला केला नाही. गेल्या काही दिवसात मी अनेक गरुड पाहिले होते. परंतु का कोण जाणे त्यांनी मला इजा केली नाही.

"तुम्ही मला पकडून पिंजऱ्यात घालायला आला होता. परंतु मला माणसांची संगत नको होती. म्हणून मी तेथून पळ काढला. तुमच्या मित्रपरिवारांची राहती घरं माझ्या आठवणीत होती. दक्षिणेकडं देंटमला जाताना मी त्यांच्या निवासस्थानी राहिलो. त्या दोन दिवसाच्या प्रवासात एका नवजात ससाण्यानं माझ्यावर चाल केली. मी प्रतिकार करून त्याच्या तावडीतून निसटलो. एकदा सकाळी मी सिक्किममधल्या जंगलात उडत असता हवेतून चीत्कार ऐकू आला. त्याची चाहूल मला लागली. मी एक युक्ती लढविली. उडता उडता मी एकदम स्थिर झालो. त्यामुळं माझा वेध घेणाऱ्या ससाण्याचा नेम चुकला. तो तसाच वेगानं खाली झाडाच्या शेंड्यावर थडकला. मी वेगानं वर वर जात होतो. पण शेवटी त्यानं मला गाठलं तसं मी आकाशात गोल गोल उडत वर जाऊ लागलो. इतका उंच गेलो की तिथल्या विरळ हवेत मला श्वासोच्छ्वास घेणं देखील कठीण जात होतं. म्हणून मी परत खाली झेपावलो.

"ससाणा चीत्कार करीत माझ्यावर झपाटला. सुदैवानं मी आयुष्यात लगेच पहिल्यांदा कोलांटी घेतली. अशी कोलांटी घेताना मी बाबांना पाहिलं होतं. दुहेरी छलांग घेण्यात मला यश आलं, अन् लगेच एखाद्या

फवाऱ्यासारखा उंच उडालो. ससाण्याचा नेम पुन्हा चुकला तसा तो अधिक आक्रमक झाला. परंतु त्याला संधी न देता त्याच्याच दिशेनं उडालो तशी त्यानं झेप घेऊन वर उसळी मारली अन् मला गाठलं. मी पुन्हा पलटी घेऊन त्याला जसा धक्का दिला, तसा त्याचा तोल गेला. नंतर काय घडलं ते मला आठवत नाही. परंतु त्या क्षणी धरतीकडं मी खोल खोल ओढला जात होतो. माझ्या पंखांत शक्ती नव्हती. गरुड जसा खाली झेपावतो तसा मी ससाण्याच्या शिरावर सर्वशक्तीनिशी झपाटलो. मला वाटतं मी अनपेक्षितपणं केलेल्या आघातानं तो सुन्न झाला असावा. तोही खाली पडला अन् जंगलात दिसेनासा झाला. नंतर आढळून आलं की आपण आयलेक्स झाडावर सुरक्षितपणं स्थिरावलो आहोत, याचा मला खूप आनंद झाला.''

चित्रग्रीव पुढे सांगू लागला, ''त्याचं असं झालं, हवेच्या प्रवाहामुळं मी खाली खेचला गेलो होतो. या पहिल्या अनुभवानंतरही असे अनेक प्रवाह मी पाहिले आहेत. काही वृक्ष आणि ओढे यांवरील हवा अति शीत होऊन त्यातून प्रवाह निर्माण होतो. अशा हवेच्या प्रवाहाच्या कक्षेत एखादा पक्षी आला की त्यात ओढला जातो. याचं कारण मात्र मला कधी समजू शकलं नाही. अशा ओघात सापडल्यावर खाली कसं जायचं याचे धडे मला घ्यावे लागले. अशा पहिल्याच हवेच्या झोतात माझे प्राण वाचल्यामुळं अशा प्रवाहाविषयी मला नावड नाही.

''या आयलेक्सच्या झाडावर बसलो असता मला खूप भूक लागली. त्यामुळं मी घराकडं परतलो. अगदी बाणासारख्या गतीनं उडत असता कोणा दुष्ट ससाण्यानं माझा मार्ग रोखला नाही.

''परंतु त्या अजाण, खुनी ससाण्याच्या तावडीतून सुटका करून घेतल्यामुळं माझं धैर्य वाढलं. तुम्ही जसं घरी पोहचलात तसं मी स्वतःशी म्हणालो, ''आता त्या मित्रानं मला जिवंत सुटलेलं पाहिलं आहे. तो आता माझ्या वाटेला येणार नाही. त्या श्येन पक्ष्यांच्या टापूत पुन्हा एकदा नव्यानं उडून आपल्या धैर्याची परीक्षा केली पाहिजे.''



आता माझ्या खऱ्या आत्मपुराणाला सुरवात करतो : ''मी उत्तरेकडं गरुडाच्या घरट्याकडं गेलो, अन् बौद्ध मठात थांबलो, तिथल्या तपस्वी लामानं मला यापूर्वीच्या भेटीत आशीर्वाद दिला होता. जुने सोबती असलेल्या आभोळी पक्ष्यांच्या जोडीला मी पुन्हा एकदा भेटलो. उत्तरेकडं मजल दरमजल करीत सिंगालिलाहून मी गरुडाच्या घरट्याजवळ पोचलो. तिथं गरुड राहत नव्हते. म्हणून मी त्या घरट्यात राहू लागलो. परंतु मी सुखी नव्हतो. कारण गरुड पक्षी आपल्या घरट्यात सर्व प्रकारची घाण टाकत असतात. एवढंच नव्हे तर त्यात उपद्रवी असे जीवजंतूही असतात. दिवसा जरी मी गरुडाच्या घरट्यात राहत असलो तरी रात्री मात्र झाडाचा आश्रय घेई. तिथं मात्र कीटकांचा अभाव होता. गरुडांच्या घरट्यात राहू लागल्यापासून मला पक्षिजगतात प्रतिष्ठा प्राप्त होऊ लागली. त्यांना माझी भीती वाटे. मी देखील एक प्रकारचा गरुड असावा असं त्यांना वाटे. ससाणेसुद्धा घरट्याच्या क्षेत्रापासून दूर राहू लागले. या अनुकूल परिस्थितीमुळं माझा आत्मविश्वास वाढीस लागला. बाणाकृती थव्यातून उडत दक्षिणेकडं जाणारे शुभ्र पक्षी मला प्रभातसमयी दिसले. त्यांच्या श्रेणी खूप उंचावरून उडत होत्या. मी त्यात सामील झालो. त्यांनी माझा स्वीकार केला. श्रीलंका आणि त्या पलीकडच्या सागरसीमेकडे जाणारा तो हंस पक्ष्यांचा थवा होता.

''दोन तासाच्या उड्डाणानंतर जशी उन्हं तापू लागली तसे ते हंस पर्वताहून वेगानं वाहणाऱ्या निर्झराकाठी उतरले. गरुडासारखे ते क्वचितच खाली पाहत. त्यांची दृष्टी क्षितिजावर असे. आकाशाच्या पार्श्वभूमीवर असलेल्या पांढुरक्या-निळ्या क्षितिज रेषेवर त्यांचं लक्ष होतं. सरळ रेषेत, संथ गतीनं ते खाली उडत असताना जणू काय धरतीच आमच्या भेटीला येत असल्याचं वाटे. नंतर साऱ्यांनी चंदेरी पाटाप्रमाणं दिसणाऱ्या प्रवाहात डुबी घेतली. आता पाणी निळं दिसण्यापेक्षा मोत्याप्रमाणं सफेत दिसत होतं. हंस पक्ष्यांचा थवा पाण्यावर तरंगू लागला. परंतु माझ्या पायाची बोटं कातडीनं जोडली नसल्यानं पाण्यात पोहणं अशक्यच.

म्हणून मी झाडावर बसून त्यांच्या जलविहाराकडं पाहू लागलो. तुम्हाला माहीत आहे की हंसाची चोच लाल आणि चपटी असते. परंतु आता त्याचं कारण कळलं. ओढ्याकाठी आढळून येणारे शंखशिंपले फोडण्यासाठी चोचीचा ते चिमट्यासारखा उपयोग करीत. किनाऱ्यावर चरत असलेले हंस लांब वाढलेली पाणवनस्पती चोचीनं ओढून बाहेर काढीत किंवा शिंपले चोचीनं फोडून, खाटीक जसा बदकाची मान मुरगाळतो तसे ते शिंपल्यातून जीव बाहेर काढून तो गिळंकृत करीत. एका हंसाला पाणसापासारखा दिसणारा बाम मासा काठावरील छिद्रात आढळून आला. हंस त्याला चोचीत पकडून बाहेर ओढू लागला. जसा हंस त्याला बाहेर ओढी तसा तो मासा लांब आणि बारीक होऊ लागला. दोघांत रस्सीखेच चालू झाली. शेवटी एकदा त्याला खेचून बाहेर काढण्यात यश आलं, तसं त्याला किनाऱ्यावर आणून हंसानं त्याचं डोकं चेचून काढलं, त्यामुळं वळवळ करणाऱ्या बाम माशानं प्राण सोडला. कोठूनतरी दुसरा हंस तिथं येऊन ठपकला. हंस उडत नाहीत किंवा पोहत नाहीत त्यावेळी ते मोठे बेढब वाटत नाहीत काय? पाण्यावर जेव्हा तरंगू लागतात तेव्हा ते स्वप्नमय सृष्टीतील पऱ्याप्रमाणं दिसतात. परंतु जमिनीवरून ते कुबड्या वापरत असलेल्या एखाद्या पांगळ्याप्रमाणं उड्या मारीत चालत असतात. एवढ्यात ते हंस आपसात भांडू लागले. त्यांनी एकमेकांची पिसं ओढली. एकमेकांना पंखांनी झोडपू लागले. उड्या घेऊन एकमेकांना लाथाडू लागले. अशा रितीनं त्या बाम माशाकरिता भांडणं चालू होती. तोच देवनळातून हुदाळ्या बाहेर आला. त्यानं त्या माशाला झडप घालून धरलं अन् नाहीसा झाला. त्यांची भांडणं थांबली. परंतु आता फार उशीर झाला होता. वाटलं की या हंसांना अक्कल नसावी! त्या तुलनेत कपोत कुल म्हणजे सर्वोत्कृष्ट शहाणपणाचा नमुना होय.

"त्यांची भांडणं थांबताच, हंसाच्या नायकानं "क्लॅक्–कॉ–कॉ–कॉ! असा आवाज दिला. तसा पाण्यातून वेग मिळण्याकरिता हंसांनी जोरानं पायांची हालचाल सुरू केली. नंतर पंखांची फडफड करीत सारेजण आकाशी उडाले. आता ते किती सुंदर दिसू लागले. त्यांच्या लांब माना, आणि डौलदार शरीर आकाशाच्या पटावर गोंदल्यासारखं दिसे. अन् बाणाच्या पातीसारखी त्याची व्यूह रचना. ही सारी दृश्यं मला कधीही विसरता येणार नाहीत.

"प्रत्येक थव्यात एखादा मागं रेंगाळणारा हंस असतो. तो मागं पडला. कारण हुदाळ्यानं पकडलेल्या माशाशी तो अजूनही झटपट करीत होता. शेवटी कसाबसा त्याला धरून तो उडाला. झाडाखाली बसून तो खावा या विचारात असताना आभाळातून उडत असलेल्या एका मोठ्या ससाण्यानं त्याच्यावर हल्ला केला. तसा हंस उंचउंच उडू लागला. परंतु ससाणा माघार घेणार नव्हता. आकाशात तो चीत्कार करीत आणि ओरडत घेऱ्या मारू लागला. इतक्यात हळू पण स्पष्ट असा हंसध्वनी ऐकू आला. थव्याचा नायक मागे पडलेल्या त्या हंसाला साद घालत होता. त्यामुळं तो विचलित झाला. आपण काय करतोय हे त्याच्या लक्षात न येऊन त्यानं आवाजाला प्रतिसाद दिला. तोच त्याच्या चोचीतून मासा खाली पडला. एखाद्या पानासारखा तो खाली येत होता. ससाण्यानं त्यावर झेप घेतली. पंजाच्या तीक्ष्ण नखांनी त्याला धरणार तोच हवेतून गर्जना ऐकू आली. कड्यावरून जशी एखादी शिळा खाली यावी तसा गरुड त्या भक्ष्यावर झेपावला. त्या ससाण्याला आपला जीव वाचविण्यासाठी पळ काढावा लागला. हे पाहून मला मोठं समाधान वाटलं.

"एखाद्या विशाल शिडाप्रमाणं गरुडाचे पंख दिसत होते. तीक्ष्ण नखं बाहेर काढून विजेच्या चपळाईनं त्यानं मासा हिसकावून घेतला अन् तपकिरी रंगाचा सुवर्ण पक्षिराज दूर आकाशात उडाला. त्याच्या मांडीवरील पिसं वाऱ्यानं उडत होती. तो ससाणा अजूनही जीवाच्या भीतीनं दूर दूर उडत होता.

"तो ससाणा दूरवर निघून गेला याचा मला आनंद झाला. कारण आता मला ज्या मार्गानं व्यापाऱ्यांचा काफला जातो त्याचा शोध घ्यायचा होता. कारण अशाच वाटांवर सांडलेलं धान्य मिळतं. त्याप्रमाणं

वाटेत सांडलेलं धान्य मला खायला मिळालं. त्यानंतर मी एका झाडावर झोप घेण्यासाठी बसलो. जेव्हा मला जाग आली तेव्हा मध्यान्हीची वेळ झाली होती. बौद्ध मठाच्या दिशेनं मी उडायचं ठरविलं. तिथं माझ्या सोबती आभोळ्यांना भेटायचं होतं. एव्हाना मी काळजीपूर्वक उडायला शिकलो होतो. त्यामुळं वाटेत काही घातपात होण्याची शक्यता नव्हती. अगदी उंचावरून उडत असताना माझं लक्ष खाली आणि क्षितिजाकडं असायचं. मला हंसासारखी लांब मान नसली तरी मी वारंवार मागं वळून शत्रू पाठलाग करीत नसल्याची खात्री करायचो.

''मी बौद्ध मठात अगदी वेळेवर पोचलो. सूर्यास्ताची वेळ. जगाच्या कल्याणासाठी भिक्षू प्रार्थनेच्या तयारीत होते. आभोळीची जोडी घरट्यानजीक उडत होती. घरट्यात तीन पिलं होती. मला भेटल्याचा आभोळ्यांना आनंद झाला. प्रार्थनेनंतर त्यांनी मला चारापाणी दिलं. वृद्ध लामानं मला हातात घेऊन आशीर्वाद दिला. पुढील प्रवास सुखाचा होवो अशा शुभेच्छा दिल्या. त्यांच्या हातातून उडताना मला अगदी निर्भय वाटत होतं. मठातील आढ्याखालच्या घरट्यात मी प्रवेश केला. शेजारीच आभोळीचा खोपा होता. मी खूप आनंदात होतो.

''ऑक्टोबर महिन्यातील रात्री खूप थंड असतात. सकाळी जेव्हा बौद्ध भिक्षूंनी घंटा वाजविल्या तेव्हा आभोळीची शावकं उडण्याचा सराव करीत होती. त्या पिलांच्या आईवडिलांना आणि मला मात्र अंगातील थंडी घालविण्यासाठी उडावं लागत होतं. दक्षिणेकडील दीर्घ प्रवासाच्या पूर्व तयारीत आभोळ्यांना साहाय्य करण्याकरिता मला त्यादिवशी तिथंच मुक्काम करावा लागला. श्रीलंका अथवा आफ्रिका जिथं कुठं जातील त्या देशांत घरटं बांधण्याचा त्यांचा बेत असल्याचं ऐकून मला आश्चर्य वाटलं. आभोळ्यांनी आपलं घरटं बांधणं सोपं नसल्याचं मला सांगितलं. त्याविषयीची माझी जिज्ञासा पाहून घरटं कसं बांधतात हे त्यांनी समजावून सांगितलं.



## चित्रग्रीवाचे आत्मपुराण (चालू)

''आभोळी आपलं घरटं कशी बांधते हे सांगण्यापूर्वी त्यात तिला काय काय अडचणी येतात हे समजावून घ्यावं लागेल. तिची चोच लहान असते. चोचीचा उपयोग कीटक पकडण्यासाठी होतो. हवेत उडतानाच भक्ष्य पकडण्यासाठी तिचं तोंड खूप रूंद असतं. ज्यावेळी ती कीटक पकडत असते त्यावेळी क्वचितच एखादा कीटक तिच्या तावडीतून निसटतो. आकारानं लहान असल्यानं आभोळी ओझं उचलू शकत नाही. म्हणून तिचं घरटं सुईएवढी जाडी असलेले गवत आणि झाडांच्या काड्या या सामग्रीनं तयार केलेलं असतं.

''जेव्हा मी पहिल्यांदा आभोळीला पाहिलं तेव्हा ती काहीशी पक्षाघात झाल्याप्रमाणं बेढब वाटत होती. आपले पाय पांगळ्यासारखे असतात याची कल्पना आभोळीला देखील असते. अशा पायावर तिला स्वतःचा तोल देखील सांभाळता येत नाही. बारीक पाय तिच्या शरीरातून एखाद्या मासोळीच्या गळासारखे बाहेर आलेले असतात. ते लवचीक नसतात. अशा पायांचा उपयोग प्रामुख्यानं भिंतीला चिकटून बसण्याकरिता होतो. ज्यांना पाय म्हणता येईल जसे अवयव तिला

नसतात. इतर पक्ष्यांच्या पायात जी लवचिकता असते तिचा पूर्ण अभाव असतो. त्यामुळं तिला टुणटुण उड्या मारीत चालता येत नाही, अथवा उडी घेता येत नाही. परंतु ही उणीव एका गोष्टीनं भरून निघाली आहे. दगडांचं कुंपण, संगमरवरी वळचण, गुळगुळीत गिलावा केलेल्या भिंती, आढं इत्यादी अवघड ठिकाणी आभोळी सहजपणं चिकटून बसते. हे कसब इतर पक्ष्यांत आढळून येत नाही.

''वळचणीखाली असलेली भिंतीतील छिद्रं ती घरट्याकरिता निवडते. तिथं अडचणीत तिला अंडी घालता येत नाहीत. कारण ती घरंगळत खाली पडतात. हवेत उडणाऱ्या बारीक काड्या आणि लहान पाने लाळेच्या साहाय्यानं चिकटवून ती घरटं बांधते. तिचं घरटं म्हणजे वास्तुशास्त्रातलं एक गूढच म्हणावं लागेल. तिची लाळ म्हणजे एक अजब चीज आहे. सरसासारखी ती लगेच सुकते आणि कठीण बनते. घरटं तयार झाल्यावर त्यात ती लंबवर्तुळाकार, पांढरी अंडी घालते. आम्हां कबुतरांप्रमाणं अंडी उबविण्याच्या कामी नरपक्षी आभोळीला साहाय्य करीत नाही. कपोत कुलातील माद्यांना नरांप्रमाणं समान हक्क असतात. आभोळीवरच घरट्याची अधिक जबाबदारी असते. नरपक्षी कधीच अंड्यावर बसत नाही. ते काम सर्वस्वी आभोळीच करते. दिवसातून अनेक वेळा तो तिला चारा आणून भरवितो. बाकीचा राहिलेला वेळ तो आपल्या सोबत्यांबरोबर घालवितो. कारण त्या सोबत्यांच्या जोडीदारणी देखील अशाच कामात गुंतलेल्या असतात. माझ्या या स्नेह्याला मी सांगायचो की त्यानं विणीबाबत आम्हां कबुतरांचं अनुकरण करून आभोळीला अधिक स्वातंत्र्य द्यावं. परंतु हा माझा सल्ला म्हणजे नेहमीचा विनोद समजून तो हसण्यावारी नेई.

''शेवटी आमच्या प्रवासाची पूर्वतयारी झाली. शरदऋतूतील एका प्रभातसमयी पाच आभोळ्या आणि मी दक्षिण दिशेनं उडूं लागलो. माझा मित्र मार्गदर्शन करीत होता. आम्ही कधी सरळ रेषेत उडत नसू. कधी पूर्व, तर कधी पश्चिम दिशेनं नागमोडी वळणं घेत उडत असू.



परंतु दक्षिण दिशेचं भान कधी सोडत नसू. नद्या आणि सरोवरावरून उडणाऱ्या माशा आणि चिलटे हे आभोळ्यांचं आवडतं भक्ष्य. त्या तासी पन्नास मैल वेगानं उडत. त्यांच्यासारख्या चिमुकल्या पाखरांचा हा वेग पाहून मला आश्चर्य वाटे. जंगलं त्यांना आवडत नसत. कारण त्यांचं सारं लक्ष जमिनीवरून उडणाऱ्या कीटकाकडं असे. दुसरं कारण असं की झाडांचा धक्का लागून त्यांचे पंख तुटण्याची शक्यता असे. पाण्यावरच अवकाश त्यांना खूप आवडे. गरुड जसा वेगानं आपल्या भक्ष्यावर झपाटतो तद्वतच चंद्रकोरीच्या आकाराचे पंख असलेल्या आभोळ्या हवेतून जलद उडत. आभोळीचा डोळा आणि तोंड यांच्या अचूक नेमाविषयी काय बोलावं! जेव्हा ती पाण्यावरून गिरक्या घेत उडते तेव्हा क्षणापूर्वी सूर्यप्रकाशात त्या क्षेत्रात उठणाऱ्या सर्व कीटकांना सहज स्वाहा करते.

''ओढे, तळी आणि खाडी यावरून आम्ही उडत होतो. आभोळी आपले भक्ष्य घाईत खाते. त्याच पद्धतीनं पाणी पिते. ती पाण्याच्या पृष्ठभागावरून उडताना मध्येच सरपटत पाण्याचे काही थेंब तोंडात घेते आणि लगेच पिते. यामुळंच झाडांच्या फांद्या, लार्चची झाडं आणि रोपं असलेली स्थळं तिला आवडत नाहीत.

''परंतु खुल्या आकाशातील तिच्या उड्डाणात धोकेही आहेत. अशा वेगानं कीटक खाणाऱ्या आभोळीवर बहिरी ससाणा वरून हल्ला करू शकतो. अशा प्रसंगी आभोळीला खाली डूब घेता येत नाही. असं घडलं तर आभोळी बुडून मृत्युमुखी पडेल. त्यांच्यावर झालेल्या हल्ल्याविषयी मला सांगितलं पाहिजे. विस्तीर्ण सरोवरावर ती उभयता भक्ष्याचा फडशा पाडत होती. ती दुपारची वेळ होती. मी त्यांच्या पिलांवर नजर ठेवून आजूबाजूला उडत होतो. इतक्यात एक ससाणा तिथं थडकला. त्या पिलांच्या संरक्षणाची जबाबदारी मी घेतली होती. माझ्या जीवाची पर्वा न करता त्यांचं रक्षण करणं क्रमप्राप्त होतं. एका क्षणाचाही विलंब न करता शत्रू आणि पिलं यांमध्ये डूब मारून मी कोलांटी घेतली. कपोत

कुलाकडून एवढ्या धैर्याची ससाण्यानं कधी अपेक्षा केली नव्हती. ना त्याला माझ्या वजनाचा अंदाज आला. त्याच्या वजनापेक्षा मी पाच औंसांनं तरी अधिक होतो. माझ्या शेपटीवर त्यानं पंजानं हल्ला केला. त्यामुळं काही पिसं झडली. आपल्या तावडीत काही तरी सावज सापडलं आहे अशा विचारात काही क्षण त्यानं आकाशात घिरट्या घातल्या. परंतु नुसतीच पिसंच लाभली आहेत हे त्याला समजण्यापूर्वी पिलं सुरक्षित स्थळी गेली. ती झाडाच्या सालीला चिकटली होती. तिथं कोणालाही जाता आलं नसतं. त्यामुळं नवजात ससाणा असा काही संतापला की एखाद्या रागावलेल्या प्रौढ ससाण्याप्रमाणं तो माझ्यावर झपाटला. ते जसा आकारानं किरकोळ होता तशी त्याची नखंही लहान होती. ती काही पंखातून माझ्या शरीरात जाणं शक्य नव्हती. म्हणून मी त्याचं आव्हान स्वीकारून एक कोलांटी घेतली. तोच त्यानंही खाली सूर मारला. मी उंच उडू लागलो. त्यानं माझा पाठलाग काही सोडला नाही. अशा नवजात ससाण्याला वरच्या वाऱ्याची भीती वाटते. त्याचे पंख त्याला साथ देईनासे झाले, तसा तो मागे पडला. मी दोनदा पंखाची उघडझाप केल्यावर त्याला मात्र एकदाच करता येई. आता तो थकून माघार घेताना पाहून, त्याला जन्माचा धडा शिकविण्याचं मी ठरविलं. माझ्या मनात आलेली कल्पना लगेच अमलात आणण्याचं निश्चित केलं. मी लगेच खाली सूर मारला. त्यानंही पाठोपाठ डूब घेतली. खोल खोल गर्तेत जात होतो! वाटलं सरोवराचा पृष्ठभाग प्रत्येक क्षणी वर वर उचलला जात आहे. शेवटी माझ्या पंखांच्या रुंदीएवढं अंतर राहिलं. नंतर पुढं काही इंच झेपावलो. तोच मी उबदार हवेच्या प्रवाहात प्रवेश केला. त्यामुळं मी आपोआपच तरंगत उंच उंच जाऊ लागलो. पोकळ अवकाश आणि खोऱ्यातील उबदार हवेची प्रवृत्ती वर वर थंड प्रदेशाकडं जाण्याची असते. अशा हवेच्या प्रवाहाची माहिती आम्हां पाखरांना असते. संधी मिळताच त्याच्या साहाय्यानं आम्ही एकदम वर वर उडत जातो. मी तीनदा तरी कोलांट्या घेतल्या अन् खाली नजर टाकली. तो



ससाणा पाण्यात बुडतांना आढळून आला. अनेक वेळा गटांगळ्या खाल्यावर तो कसाबसा किनाऱ्यावर उडत गेला. अन् तिथल्या पाचोळ्याच्या थरात शरमेनं लपून बसला. अशावेळी लपून बसलेल्या आभोळ्या बाहेर आल्या अन् दक्षिणेकडं उडाल्या.

''दुसऱ्या दिवशी आम्हाला रानबदकं दिसली. माझ्यासारखाच त्यांचा गळा चित्रविचित्र रंगाचा होता. बाकी साऱ्या शरीराचा रंग हिमासारखा शुभ्र होता. प्रवाहात संचार करणारी ती रानबदकं होती. पर्वतातून वाहणाऱ्या जलौघात तरंगत असता ती माशांचा वेध घेत. दूरवर पाण्यात गेल्यावर तेथून ती परत किनाऱ्याकडं उडत येत. सारा दिवस त्यांची अशी ये जा चालू असे. हंसपक्ष्याच्या चोचींपेक्षा रानबदकांच्या चोची चपट्या असतात. चोचींना दातऱ्या असतात. एकदा का मासा चोचीत धरला की तो निसटून जात नाही. शंख शिंपल्यातील जीवांकडं त्यांचं लक्ष नसे. याचं कारण असं की त्या जलाशयात विपुल प्रमाणात मासे होते. आभोळ्यांना मात्र हे स्थळ आवडलं नाही. पाण्याच्या पृष्ठभागावर संचार करणाऱ्या माशा आणि चिलटं, रानबदकांच्या उडण्यामुळं दूर निघून जात. तथापि पर्वतातून खळाळ वाहणाऱ्या जलप्रवाहात आहार विहार करणाऱ्या रानबदकांकडं पाहायला आभोळ्यांना आवडे.

''या भागात घुबडं आणि इतर रात्रिंचर मारेकरी पक्षी विपुल प्रमाणात होते. परंतु रानबदकं त्यांच्यापासून होणाऱ्या धोक्याची पूर्व सूचना देत. जिथं घुबडांना सहजपणे प्रवेश करता येणार नाही अशा जागेत आम्ही आश्रय घेत असू. झाडाला असलेली लहान छिद्रं आभोळ्यांना सहज उपलब्ध होत. मी मात्र बाहेर झाडावरच राहण्याचं ठरविलं.''

''जलद पावलं टाकीत रात्र येत होती. जिकडं तिकडं अंधार पसरलेला. माझ्या डोळ्यांना आता काहीच दिसत नव्हतं. काळ्या वस्त्राच्या घडीवर घडी घालाव्यात तसे अंधाराचे अनेक थर दिसायचे. कपोत कुलाच्या ईश्वराचं भक्तिभावानं स्मरण करीत मी झोपण्याचा

प्रयत्न करी. आजूबाजूला घुबडांचा धुत्कार येत असताना कोणाला शांत झोप येईल बरं? रात्रीचं मला भय वाटे. पाखराचा वेदनादायक आर्त स्वर आला नाही अशी एखादी देखील घटका नसे. उलूक जल्लोषानं चीत्कार करीत. कधी तिलोरी मैना (स्टार्लिंग) तर कधी बुलबुल घुबडाच्या खिळदार पंजात मृत्युमुखी पडत तेव्हा त्यांच्या करुण स्वरानं जणू जंगल आक्रोश करी. माझे डोळे जरी मिटले असले तरी होत असलेल्या निर्घृण हत्येची मला चाहूल येत होती. कावळा कर्कश ओरडला. नंतर एकामागून एक असा त्यांचा आवाज येतच होता. सारा थवा भीतीनं झाडावर आदळून मृत्युमुखी पडला. घुबडाच्या अणकुचीदार नखं आणि चोचीनं चिरफाड होऊन मरण्यापेक्षा असं मरण पत्करलं. अशा अपूर्व गोंधळात देखील मला भोट कुमारी (वीझेल)चा वास आला. वाटलं आपला अंत जवळ आला आहे. त्यामुळं मी अस्वस्थ झालो. मी डोळे उघडले. जिकडं तिकडं पिवळा पांढरा प्रकाश पडला होता. माझ्यापासून सहा फुटांवर भोट कुमारी येऊन ठेपली होती. तिथून मी उडालो. अशा उडण्यामुळे मी अधिक धोका पत्करला होता. आता घुबडांनी मला सहज मारलं असतं. खरंच एक घुबड चिरकत माझ्या दिशेनं आलं. त्याच्यामागून आणखीन दोन घुबडं आली. उडतांना त्यांच्या पंखांचा आवाज येत होता. त्या सावटीवरून मी जाणलं की आम्ही पाण्यावरून उडत आहोत. पिसांच्या जराशा हालचालीनं प्रतिध्वनी ऐकू यायचा. मला सहा फुटांपेक्षा अधिक दूरवरचं दिसत नव्हतं. त्यामुळं कोणत्याही दिशेनं अधिक लांबपर्यंत जाता येत नसे. मी एकाच ठिकाणी हवेत उडत असता नदीच्या पृष्ठभागावरून उगम पावलेल्या हवेच्या प्रवाहाच्या शोधात होतो. त्या घुबडांनी तर माझा पिच्छाच पुरविला होता. म्हणून मी कोलांटी घेऊन गोलाकार उडू लागलो. तरी घुबडं माझा पाठलाग सोडायला तयार नव्हती. मी उंच उडू लागलो. चंद्राचा प्रकाश माझ्या पंखातून पाझरत होता. थोडसं स्पष्ट दिसू लागलं. त्यामुळं मला पुन्हा धीर आला. परंतु त्या निशाचरांना माझी दया येत नव्हती. ती



देखील उंच उडू लागली. तसं डोळ्यावर प्रकाश पडून त्यांना अंधारल्यासारखं वाटलं. त्यापैकी दोन घुबडं माझ्याकडं झेपावली. तसा मी वर गेलो. घुबडांचा नेम चुकून ती एकमेकांवर आदळली. त्यांचे पंजे एकमेकात गुंतले. ती असहाय्यपणं आपले पंख हवेत फडफडवीत होती. सैतानासारखं किंचाळत ती नदीकाठच्या देवनळात पडली.

"आता मी आजूबाजूला लक्षपूर्वक दृष्टी टाकली. आश्चर्यचकित होऊन पाहतो तर ती पहाटेची सुरुवात होती. चंद्रप्रकाशाचा मला आभास झाला होता. माझ्या भयग्रस्त डोळ्यांना त्यातील खरा फरक कळला नाही. परंतु आता सभोवताली घुबडं नव्हती. सूर्यप्रकाशापासून तोंड लपविण्याकरिता ती अंधार असलेल्या जागेच्या शोधात होती. मला जरी सुरक्षित वाटत असलं तरी मी उंच वृक्षांच्या दाट सावलीपासून दूरच राहिलो. कारण आतासुद्धा अशा झाडावर घुबडं असण्याची शक्यता होती. जिथं सूर्याची पहिली किरणं येतात अशा वृक्षाच्या शेंड्यावर मी बसलो. वृक्षाच्या साऱ्या छताचं रूपांतर आता सोनेरी छत्रीत झालं होतं. हळूहळू साऱ्या वनावर प्रकाश पसरला. त्या प्रकाशाच्या लहरी मात्र भोट कुमारीच्या डोळ्याप्रमाणं चमकत होत्या.

"तोच नदीकाठी मी एक भयप्रद दृश्य पाहिलं. डोळे मिचकावीत असलेल्या घुबडांवर दोन मोठे काळेभोर कावळे चोचीने प्रहार करीत होते. ती घुबडं देवनळात अडकली होती. आता सूर्यप्रकाशात त्यांना काहीच दिसत नव्हतं. रात्री या दिवांधांनी कावळ्याची कत्तल केली होती. आता त्याचा सूड उगविण्याची पाळी कावळ्यांवर होती. परंतु अडचणीत असलेल्या निशाचरांवर ते दोन कावळे ज्या पद्धतीनं तुटून पडले होते ते दृश्य मला पाहवलं नाही. मी त्या मारेकऱ्यांना हुसकावून दिलं आणि सोबती असलेल्या आभोळ्यांच्या शोधात निघालो. रात्री अनुभवलेल्या काही गोष्टी त्यांना सांगितल्या. तेव्हा आभोळ्यांचे मायबाप म्हणाले की रात्रीच्या भयानक आर्त किंकाळ्यांनी आम्हाला देखील झोप लागली नाही. आभोळीनं विचारलं की आता बाहेर सर्व काही ठीक

आहे ना? सारं काही सुरक्षित असल्याचं मला वाटलं. आम्ही जेव्हा बाहेर पडलो तेव्हा देवनळाच्या जाळीत घुबड मरून पडलेलं आढळून आलं!

''आश्चर्य म्हणजे सकाळी ओढ्यावर एकही रानबदक दिसलं नाही. याचा अर्थ असा की त्यांनी अगदी सकाळीच दक्षिण दिशेकडं प्रयाण केलं असणार. आम्हीदेखील तसंच करावयाचं ठरविलं. स्थलांतराच्या आमच्या मार्गानं जाणाऱ्या पक्ष्यांची सोबत न करण्याचं ठरविलं. हंगामात कबुतरे, भटतितर (ग्राऊस) आणि इतर पक्ष्यांचे थवे जिथं जातात तिथं घुबडं, ससाणे आणि गरुड यांसारखे शत्रूही त्यांच्या मागोमाग जातात. म्हणून धोका टाळण्यासाठी तसंच काल रात्रीचा धक्कादायक प्रसंग पुन्हा अनुभवण्याचं माथी येऊ नये म्हणून आम्ही पूर्व दिशेकडं मोर्चा वळविला. सारा दिवस पूर्वेकडं उडाल्यावर आम्ही सिक्किममधील एका खेड्यांत विश्रांती घेतली. दुसऱ्या दिवशी आम्ही अर्धा दिवस दक्षिणेकडं उडत उडत पूर्वदिशेकडं वळलो. अशा प्रकारे वळणावळणानं केलेल्या प्रवासाला खूप समय लागला. परंतु त्यामुळं संकटं काही टाळता आली नाहीत. एकदा वाऱ्यावादळात सापडून आम्ही सरोवराच्या प्रदेशात आलो. तिथं मी एक चमत्कारिक दृश्य पाहिलं. मी झाडाच्या शेंड्यावर बसलो होतो. खाली मला अनेक पाळीव बदकं पाण्यावर तरंगताना दिसली. त्या प्रत्येक बदकाच्या चोचीत एक एक मासा होता. परंतु कोणीही तो मासा गिळत नव्हता. बदकं मासे गिळण्याचा मोह आवरत असल्याचं दृश्य मी पहिल्यांदा पाहत होतो. म्हणून आभोळ्यांना तो प्रकार बघण्यासाठी बोलावलं. झाडाच्या सालीला चिकटून त्या या बदकांकडं पाहत होत्या. त्यांचा देखील आपल्या डोळ्यावर विश्वास बसेना. या पाखरांना काय झालं असावं? इतक्यात बांबूने होडी वल्हवीत असलेल्या दोन व्यक्ती दिसल्या. त्यांना पाहताच बदकं वेगानं तरंगत तरंगत होडीजवळ आली. त्यांनी होडीत उड्या घेतल्या. अन् तुमचा विश्वास बसणार नाही असं ते दृश्य होतं. प्रत्येकानं



चोचीत धरलेला मासा टोपलीत टाकला अन् लगेच त्यांनी सरोवरात उड्या घेतल्या. अन् परत माशांचा वेध घेऊ लागले. हा सारा प्रकार एक दोन घंटे तरी चालू होता. ते तिबेटी-ब्रह्मी कोळी मासेमारीसाठी कधी जाळ्याचा उपयोग करत नाहीत. बदकांच्या गळ्यात दोरीचे कडे घालतात अन् त्यांना मासेमारीसाठी सरोवरावर आणतात. ती जे काही मासे पकडतात ते आपल्या धन्याच्या स्वाधीन करतात. जेव्हा त्यांची करंडी माशानं भरून जाते तेव्हा बदकांच्या गळ्यातील कडे काढतात. नंतर सारी बदकं सरोवरात उड्या मारून यथेच्छ माशावर ताव मारतात.

''नंतर आम्ही सरोवराचा प्रदेश सोडून दूर असलेल्या कृषिक्षेत्राच्या शोधात निघालो. नुकत्याच कापणी झालेल्या पिकावरच्या कीटकांवर आभोळ्या तुटून पडल्या. मी देखील पोटभर दाणे टिपले. तिथल्या भातशेतीच्या कुंपणावर बसलो असता कुणीतरी काही फोडत असल्याचा आवाज कानी आला. चॅफिंच पक्षी चेरी फळाचे कवच फोडून त्यातील गर चोचीनं काढून घेतानाचा तो आवाज असावा. या लहान पक्ष्याच्या चोचीत शिलींध्री (नटक्रॅकर) पक्ष्याची शक्ती असावी हे आश्चर्य नव्हे काय? ज्या दिशेनं तो आवाज येत होता तिकडं चटकन गेलो असता समोरच मला हिमालय कस्तुरिका (हिमालयन् थ्रश) दिसली. ती काही चेरीफळाचं कवच फोडण्यात गुंतली नव्हती, तर शिंपल्यातील गोगलगाईचा ती चोचीनं वेध घेत होती. टिक्-टॅक-टॅक-टिक-टॅक असा आवाज करीत चोचीनं ती शंखावर आघात करीत होती. गोगलगाय आतल्या आत मुरली. डोकं वर करून कस्तुरिकेनं आजूबाजूला पाहिलं. अन् पंख उघडून नेम धरून पुन्हा टॅक-टॅक-टॅक असे तीन आघात शंखावर करताच तो फुटला. त्यातून मांसल गोगलगाय बाहेर आली. तिनं तिला चोचीत पकडलं. नंतर चोचीची हालचाल करून गोगलगाईवर पक्की पकड घेतली. मग झाडावर वाट पाहत असलेल्या जोडीदाराच्या दिशेनं ती नाहीशी झाली.

''धान्याच्या शेतीवाडीतून झालेल्या आमच्या प्रवासाविषयी फारसं

काही सांगण्यासारखं नाही. जंगलातील आदिवासी मोर जाळ्यात कसं पकडतात हे मात्र चांगलं आठवतं. हे पक्षी जन्म आणि अनुकूल हवामानाच्या शोधात दक्षिणेकडील दलदलीवर जातात. अशोवळी त्यांचे भक्ष्य असलेले साप आणि इतर जीव हा प्रदेश सोडून उत्तरेकडं प्रयाण करतात.

मोर आणि वाघ यांना एकमेकांविषयी आकर्षण वाटतं. हा पक्षी वाघाच्या सौंदर्यानं मोहित होतो. तर वाघाला चित्रमयूराच्या पिसाऱ्याची भुरळ पडते. कित्येक वेळा पाणझरीजवळच्या झाडावर बसलेल्या चित्ताकर्षक मयूराच्या पिसाऱ्याकडं वाघ एकटक पाहत राहील. आणि मयूर आपली मान वेळावून वाघाच्या अंगावरील नेत्रवेधक पट्ट्याच्या सौंदर्याचं अवलोकन करीत राहील. जन्मजात मोराचा शत्रू असलेला माणूस त्याच्या या सवयीचा फायदा न घेईल तरच आश्चर्य! त्या दिवशी एका माणसानं वाघाचे हुबेहूब पट्टे रंगविलेलं वस्त्र आणलं. मोरालाही वाटलं नसतं की तो खरा वाघ नाही. झाडावरच्या बनावट वाघापुढं त्यानं सापळा मांडला आणि तिथून गुपचूप निसटला. त्या रंगविलेल्या वस्त्राच्या वासावरून वाघाचं ते कातडं नाही हे मलादेखील कळत होतं. परंतु मोरांना वासाची संवेदना म्हणावी इतकी नाही. मयूर त्या मायाजालाला बळी पडतात. काही वेळानं तिथं मोरांची जोडी आली. अन् झाडाच्या शेंड्यावरून त्या बनावट वाघाकडं टकमक पाहत हळूहळू त्या झाडावरून खाली उतरू लागली. हा वाघ झोपलेला आहे, असं वाटून ती जोडी अगदी नजीकच्या फांदीवर बसली. तिथंच सापळा ठेवला होता. त्या पिंजऱ्यात प्रवेश करायला त्यांना अवधी लागला नाही. परंतु ती एकाच पिंजऱ्यात कशी गेली हे मला देखील कळलं नाही. सापळ्यात अडकताच त्यांनी आर्त टाहो फोडला. इतक्यात तो पारधी आला. त्यानं आणखीन एक युक्ती केली. त्यांच्या डोक्यावर काळ्या कॅनव्हासच्या पिशव्या घालताच डोळे बंद होऊन दिसेनासं झालं. त्यामुळं सुटकेसाठी त्यांची धडपड आणि फडफड थांबली. त्या पारध्यानं त्यांचे दोन्ही पाय बांधले. बांबूच्या




टोकांना त्यांना टांगलं. बांबू मधोमध खांद्यावर ठेवून तो चालू लागला. टांगलेल्या मोराचा पिसारा खाली लोळत असताना तो एखाद्या इंद्रधनुष्यासारखा दिसत होता.

"इथं माझं आत्मपुराण संपतं. दुसऱ्या दिवशी मी आभोळ्यांचा निरोप घेतला. त्यांनी दक्षिणेकडं प्रयाण केलं. मी आपल्या घराच्या दिशेनं परतलो. या प्रवासात जगाच्या बरेवाईटपणाचा अनुभव घेऊन मी शहाणा झालो होतो. आता मला असं सांग–" चित्रग्रीव म्हणाला, "पशुपक्षी असे एकमेकांच्या जीवावर सदान् कदा का उठलेले असतात? असं का घडावं? माणसं असं काही एकमेकांना इजा करीत नाहीत. खरं ना? परंतु पशुपक्षी असं करतात. त्याचं मला खूप दुःख होतं."



# भाग दुसरा



## युद्धाकरिता चित्रग्रीवाचे शिक्षण



आम्ही परत गावी आलो. युरोपमध्ये होणाऱ्या महायुद्धाविषयी जिकडं तिकडं अफवा उठत होत्या. अजूनही ते दिवस हिवाळ्याचे होते. चित्रग्रीवाला युद्धाच्या कामी उपयुक्त पडेल असे शिक्षण देण्याचे मी ठरविले. कारण अशा शिकवणीचा त्याला ब्रिटिशांच्या युद्धात उपयोग होणार होता. हिमालयाच्या उत्तरपूर्व प्रदेशातील हवामानाचा त्याला चांगलाच सराव होता. त्यामुळे युरोपात कुठल्याही देशातील लढाईत संदेश नेण्या आणण्याकरिता त्याचा बहुमोल विनियोग झाला असता. आता जरी बिनतारी आणि रेडियोचे युग असले तरी आणिबाणीच्या प्रसंगी निरोप नेणाऱ्या कबुतराचे साहस कमी लेखता येणार नाही. जशी मी कथा सांगत जाईन तसे आपल्या ध्यानी सारे काही येईल.

युद्धाचे वेळी जरुरीचे संदेशवाहकाचे कामी त्याला कसे प्रशिक्षित करायचे याचा एक आराखडा मी तयार केला. त्याला महाजनानेही दुजोरा दिला. तो आमच्या बरोबरच गावी आला होता. घरी दोन-तीन दिवस राहिलाही. नंतर परत जाण्याचे ठरविल्यावर जाताना तो म्हणाला, "शहरातील वातावरण मला असह्य होतं. तशी मला कोणतीच शहरं

आवडत नाहीत. त्यात या ट्राम गाड्या बस अन् मोटारीची तर मला भीतीच वाटते. या शहरातील माझ्या अंगावरची धूळ मी लवकर झटकली नाहीतर माझं काय होईल हे सांगता येणार नाही. जंगलातील वाघाची मला भीती वाटत नाही, पण वाहनांची तशी मला खात्री देता येणार नाही. भयानक जंगलात एखादा दिवस राहणं परवडेल, पण शहरातील रस्ते ओलांडणं नको वाटतं. कित्येक निरपराधी माणसं रस्ता ओलांडताना हकनाक मरतात. बापरे! मी आपल्या गावी जातो कसा! तिथली जंगलं विलक्षण शांत आहेत. हवा इथल्याप्रमाणं धुळीनं अन् दुर्गंधीनं भरलेली नसते. आभाळ इथल्याप्रमाणं तारायंत्राच्या खांबांनं भेदून गेलेलं नसतं. इथल्या कारखान्याच्या भोंग्याच्या आवाजापेक्षा जंगलातील पाखरांची गाणी बरी. इथल्या चोरा चिल्लाटापेक्षा जंगलातील वाघ अन् बिबट परवडले बाबा!''

संदेशवाहक आणि लोटण जातीची चाळीस कबुतरे विकत घेण्यासाठी महाजनाने मला साहाय्य केले. नंतरच तो परत गावाकडे गेला. या दोन जातीचीच कबुतरे मी का पसंत केली याचे कारण मलाही सांगता येणार नाही. परंतु संदेशवाहक आणि लोटण कुळातील कबुतरे मला अधिक आवडतात. एक मात्र खरे की लक्का, मोरपंखी आणि इतर कबुतरे प्रयोजनापेक्षा अधिक शोभेची आहेत. आमच्या घरी अशा प्रतीची कबुतरे पाळली होती. संदेशवाहक आणि लोटण वर्गातील कबुतरांबरोबर ती गुण्यागोविंदाने राहत नाहीत.

कबुतरांच्या खरेदीविषयी हिंदुस्तानात एक विचित्र चाल पडून गेलेली आहे. ती मात्र मला पसंत पडली नाही. तुम्ही एखादे कबुतर भारी किंमतीला विकले अन् ते खरेदीदाराकडून पुन्हा तुमच्याकडे आले तर ते तुमच्या मालकीचे होते. आणि त्याचे पूर्वी घेतलेले मूल्य परत करावे लागत नाही. कबुतर शौकिनांनी ही पद्धत स्वीकारली आहे. नवीन घेतलेली कबुतरे पळून पुन्हा माघारी जाणार नाहीत अशी काळजी घेणे आणि त्यासाठी लळा लावणे आवश्यक आहे. त्यांच्यासाठी



मी रक्कम मोजली होती. अन् माझी इच्छा होती की त्यांनी परत मूळ मालकाकडे जाऊ नये. त्या कबुतरांनी नव्या घराविषयी निष्ठा ठेवावी याकरिता मी परोपरीने प्रयत्नशील असे. परंतु जीवन हे व्यवहारी असते. यासाठी मला सुरुवातीपासूनच अनेक क्लुप्त्या योजाव्या लागल्या. त्यांनी आमच्या घराचा परिसर सोडू नये म्हणून सुरुवातीचे काही आठवडे त्यांचे पंख बांधून ठेवावे लागले. उडता येऊ नये म्हणून त्यांचे पंख बांधावे लागतात. ही कला तशी नाजूकच आहे. पंखातील पिसे एक सोडून एक खालून दोरीने गुंफून घ्यायची. नंतर परत त्याच पद्धतीने ती पिसे वरून ओवून घ्यायची. म्हणजे आपण मशीनवर शिलाई करतो ना अगदी तसेच. कुठलीही इजा न करता पाखरांना बांधून ठेवण्याचा हा प्रकार होय. त्यामुळे कबुतरांना उडता येत नाही. परंतु त्याचवेळी त्यांना पंखाची सहज उघडझाप करता येते. पंख ताणून चोचीने साफ करता येतात. यानंतर मी त्यांना माळवदाच्या कानाकोपऱ्यात बसवू लागलो. हेतू हा की इथे स्तब्ध बसून आजूबाजूच्या परिसराची वैशिष्ट्ये त्यांनी आपल्या डोळ्यांत भरावीत. ही कृती निदान पंधरा दिवस तरी करावी लागते.

जेव्हा पहिल्यांदा चित्रग्रीवाचे पंख बांधण्यात आले तेव्हा त्याने केलेल्या लबाडीविषयी सांगायला हवे. बांधलेले पंख सोडताच तो परत माझ्याकडे येईल की नाही हे पाहण्यासाठी त्याला नोव्हेंबर महिन्याच्या सुरुवातीला विकले.

चित्रग्रीवाला खरेदी केल्यावर दोनच दिवसांनी त्याचा नवीन मालक माझ्याकडे येऊन म्हणाला, ''चित्रग्रीव उडून गेला.''

मी विचारले, ''कसं?''

''ते मला माहीत नाही. परंतु तो माझ्या घरी नाही.''

मी विचारले, ''त्याचे पंख बांधले होते काय? त्याला उडता येत होतं काय?''

''त्याचे पंख बांधले होते,'' तो म्हणाला.

त्याचे उत्तर ऐकून माझ्या पोटात भीतीने गोळाच उठला. मी म्हणालो, "मूर्खा, त्याला इथं शोधत येण्यापेक्षा तुझ्या घराच्या सभोवताली का धुंडाळलं नाहीस? तुझ्या हे कसं ध्यानात आलं नाही, की त्यानं उडण्याचा प्रयत्न केला असणार. पण त्याचे पंख बांधल्यामुळं तो तुझ्या घराच्या छपरावरच पडला असणार? एव्हाना एखाद्या मांजरानं त्याला खाऊन गट्ट केलं असणार. ही त्या जीवाची कत्तल आहे. अरेरे! तू एका चांगल्या कबुतराचा नाश केलास!" मी त्याला अद्वातद्वा बोलत होतो.

माझ्या रागावून बोलण्यामुळे तो घाबरला. हात जोडून विनंती करीत तो म्हणाला, "चित्रग्रीवाचा शोध घ्यायला चला माझ्याबरोबर." मांजराने तर त्याचा बळी घेतला नसेल ना, या विचाराने मी मनात चरकलो. सारी दुपारभर आम्ही त्याला शोधत होतो. पण व्यर्थ. साऱ्या गल्लीबोळातून त्याचा तपास करत दिवसभर फिर फिर फिरलो. इतका आटापिटा माझ्या आयुष्यात मी कधी केला नव्हता. परंतु एवढ्या प्रेमाने वाढविलेला चित्रग्रीव अशा पंख बांधलेल्या स्थितीत अखेर एखाद्या मांजराच्या भक्ष्यस्थानी पडावा ना! शेवटी चित्रग्रीवाचा पत्ता लागला नाहीच. घरी परतायला खूप रात्र झाली. त्याबद्दल घरच्यांची बोलणी खावी लागली. अगदी निराश मनाने मी झोपेच्या तयारीला लागलो.

मनाची अशी अस्वस्थ स्थिती माझी आई जाणत होती. मी अशा अशांत आणि दुःखावलेल्या मनस्थितीत झोपेच्या अधीन होऊ नये म्हणून ती मला म्हणाली, "बेटा तुझं कबुतर सुरक्षित आहे. आता शांत चित्तानं झोप."

"पण का, आई?"

ती म्हणाली, "तू शांत असलास की तुझे स्थिर विचार तुला साह्यीभूत ठरतील. तू सुचित्त असलास की मनाचं सामर्थ्य चित्रग्रीवालाही शांत करील. अन् तो शांत असला की त्याचं मन कार्यरत होईल. मनाची शक्ती अगाध आहे. अन् बेटा तुला माहीत आहे की चित्रग्रीवाचं मन किती समतोल आहे. मनाच्या अशा अवस्थेत विचार करू लागला



तर या संकटावर तो सहज मात करील अन् घरी परत येईल. अशा निस्तब्ध रात्री त्या दयाघनाची प्रार्थना करू या. रात्रीच्या शांततापूर्ण वेळी अर्धाएक तास आम्ही प्रार्थना करीत म्हटले, "मी शांत आहे. हे सारं विश्व शांत आहे. ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः!"

मी झोपी जात असताना आई म्हणाली, "तुला आता वाईट स्वप्नं पडणार नाहीत. त्या दयाघनानं तुला आता शांती बहाल केली आहे. रात्री तुला विश्रांती मिळाल्यानं शांत झोप लागेल."

आम्ही केलेली प्रार्थना फलदायी ठरली. सकाळी अकराच्या सुमारास चित्रग्रीव आभाळातून भरारी मारताना दिसला. खूप उंचीवरून उडत होता. बांधलेल्या पंखांची दोरी त्यानं कशी सोडली हे त्याच्याच नीळावंतीच्या भाषेत ऐकू या.

"अनेकविध भाषा जाणणारे हे स्वामी," तो म्हणाला, "त्या माणसाच्या घरात मी एका दिवसापेक्षा अधिक काळ थांबू शकलो नाही! खायला तो किडकं सडकं धान्य द्यायचा. शिळं पाणी प्यायला द्यायचा. शेवटी मलाही जीव आहे. मी एखादी निर्जीव वस्तू आहे असं समजून त्यानं का वागावं? माशाची दुर्गंधी असलेल्या दोरीनं त्यानं माझे पंख बांधले होते. अशा परिस्थितीत मी तिथं कसा राहू शकेन? मुळीच नाही! त्यानं मला माळवदावर सोडून जाताच, पंखाची फडफड करून मी तेथून उडालो. माझे पंख जड झाले होते. अन् उडतांना ते दुखायचे. मी गल्लीतल्या एका दुकानाच्या छतावर पडलो. तिथं बसलो असता कोणाची मदत मिळते की काय याची वाट पाहत होतो. काही आभोळ्या उडताना दिसल्या. त्यांना मी हाकदेखील मारली. परंतु साहाय्य करायला काही ते माझे मित्र नव्हते. नंतर एक जंगली कबुतर दिसलं. त्याला देखील हाळी घातली. परंतु प्रतिसाद मिळाला नाही. तेवढ्यात एक काळं मांजर माझ्याकडंच येताना दिसलं. प्रत्यक्ष यमच त्याच्या रुपानं माझ्याकडं चालत येत आहे असं वाटलं. ते जसं नजीक येऊ लागलं तसे त्याचे सुवर्ण स्फटिकासारखे डोळे आरक्त वर्णानं चमकू

लागले. उडी घेण्यासाठी ते किंचित दबलं. तोच मीदेखील उडी घेऊन त्याच्या माथ्यावरून पलीकडे गेलो. पलीकडच्या भिंतीतील एका कोनाड्यात आभोळीचं घरटं होतं. ते अत्यंत अवघड ठिकाणी होतं. तरी मी तिथं लोंबकळत, काळं मांजर निघून जाईपर्यंत वाट पाहत होतो. मी पुन्हा उडी घेऊन चारपाच फुटावर असलेल्या छतावर जाऊन बसलो. परंतु माझे पंख दुखत होते. मला होत असलेल्या वेदना कमी व्हाव्यात म्हणून मी चोचीनं ती पिसं रगडू लागलो. एक एक पीस मी चोचीनं दाबत होतो तेव्हा त्या घाणेरड्या दोरीच्या फासांतून एक पीस निसटले. मग मी दुसरं पीस चेपून पाहिलं. अन् तेही दोरीतून सुटलं. त्यामुळं मला किती आनंद झाला म्हणून सांगू! अशा रितीनं दाबून रगडून मी आपले पंख मोकळे केले. परत ते काळं मांजर छतावर आलं. परंतु आता दहाएक फुटांचं उड्डाण घेऊन मी इमारतीचा कंगोरा गाठला. तिथं बसायला मला सोयीची जागा मिळाली. काळरुद्रासारख्या वाटणाऱ्या त्या मांजराकडं पाहत होतो. दबा घेऊन त्यानं पंखातून सुटलेल्या दोरीवर झेप घेतली. तेव्हा माझ्या लक्षात आलं की दोरीला येणाऱ्या माशाच्या वासानं ते आकर्षित झालं होतं. त्याचा डोळा माझ्यावर नव्हताच. नंतर दुसऱ्या पंखाला बांधलेली दोरी चोचीनं चेपून आणि कुरतडून मोकळी केली. अशा रितीनं अर्ध्या पंखांवरच्या दोऱ्या सोडल्या. जेव्हा सारा पंख जखडलेल्या घाणेरड्या दोरीतून मुक्त झाला, तेव्हा रात्र झाली होती. घरी परतण्यासाठी मला पहाटेपर्यंत वाट पाहावी लागली. बहिरी ससाणे तिन्हीसांजा आपल्या आश्रय स्थानाकडं जातात अन् अंधार पडू लागला की घुबडांचं आगमन होतं. मला निर्धोक मार्ग हवा होता. आता मी घरी परतलोय—मी भुके—तहानेनं व्याकूळ झालो आहे.''

मी पहिली गोष्ट जर काही करत असेन तर विकत घेतलेल्या सर्व कबुतरांना चारा आणि स्वच्छ पाणी देत असे. ज्या पाण्यात त्यांनी आंघोळ केली, त्याचा पिण्यासाठी उपयोग करीत नसे. चित्रग्रीवाच्या पंखांना मासळीचा वास येत असल्याने त्याला वेगळ्या खणीत ठेवले.



तरीही त्याच्या पंखाचा वास जायला पुरते तीन दिवस लागले. यथेच्छ तीन आंघोळी चित्रग्रीवाला घ्याव्या लागल्या. तेव्हा कुठे त्याला इतर कबुतरात जाऊ दिले. चित्रग्रीवाची ख़रेदी करणाऱ्या इसमाला पैसे परत करण्याची सूचना माझ्या वडिलांनी दिली. खरे सांगावयाचे तर मला ते पैसे परत करावयाचे नव्हते. परंतु त्याबाबत मला वडिलांची आज्ञा पाळावी लागली. तेही एक प्रकारे बरेच झाले. साधारण पंधरा दिवसांनी मी नव्या कबुतरांचे पंख सोडले. माझा लळा लागावा म्हणून त्यांना कळसावले. याकरिता तुपात भिजवलेले धान्य आणि शेंगदाणे त्याना रोज सकाळी चारू लागलो. तत्पूर्वी दाणे लोण्यात दिवसभर भिजवले जात असत. अशा प्रकारचे दाणे प्रत्येक कबुतरास डझनभर द्यायचो. या रोजच्या रूचकर मेजवानीमुळे दोन दिवसात ती इतकी चांगलीच कळसावली, की सायंकाळी पाचाच्या आत कबुतरखान्यात परत येऊन स्वादिष्ट दाण्यांची मागणी करू लागली. पुढील तीन दिवसात मी त्यांचे पंख पुरते मोकळे केले. पहिल्याच उड्डाण्याचा स्वच्छंद आनंद लुटल्यावर चविष्ट चाऱ्यासाठी ती माळवदावर उतरली. ती चारा खाऊन तृप्त झाल्यावरच त्यांचा आत्मविश्वास मिळविता येतो. पण त्यांनाच दोष का द्या? अनेक स्त्री-पुरुषांचा स्वभाव या बाबतीत कबुतरासारखाच असतो!

# युद्धाकरिता शिक्षण (पुढे चालू)



दिवसामागून दिवस नवीन कबुतरे हळूहळू घरापासून दूरदूरपर्यंत उडायला शिकली. साधारण एका महिन्यानंतर त्यांना पन्नास मैल दूरवरच्या गावात नेऊन सोडले तर दोन कबुतरांचा अपवाद वगळता बाकी सर्व कबुतरे चित्रग्रीवाच्या मार्गदर्शनाखाली परत घराकडे आली. ती दोन कबुतरे आपल्या जुन्या मालकाकडे गेली.

निर्विवाद नायकपदाची समस्या सोडवणे तसे अवघड तर खरेच. त्यासाठी चित्रग्रीवाला थव्यातील हिरा आणि जवाहर या नर कबुतरांशी झुंज द्यावी लागली. काळ्याशार रंगाचा जवाहर लोटण वर्गातील होता. त्याची पिसे बिबट्याच्या लवीसारखी चमकदार होती. तो स्वभावाने मवाळ होता, तसेच भांडखोर नव्हता. परंतु साऱ्या थव्याचे नायकपद चित्रग्रीवाला देणे त्याला मान्य नव्हते. तुम्हाला माहीत आहे की कबुतरे किती भांडकुदळ असतात—हे बारकाईने त्यांच्या आचरणाकडे पाहिल्यावर आपल्या लक्षात येते. आमच्या घराच्या माळवदावर प्रत्येक नर कबुतर मोठ्या ऐटीत छाती फुगवून कूजन करीत घुमू लागायचे. ज्याला त्याला वाटे मीच काय तो राजा व्हायच्या लायकीचा आहे. जर चित्रग्रीव स्वतःला नेपोलियन समजत असेल तर सूर्यप्रकाशासारखा धवल वर्णाचा हिरा स्वतःला जणू राजाधिराज सम्राट अलेक्झांडर मानायचा, तर जवाहर (कृष्णवर्णाचा हिरा) स्वतःला ज्युलियस सीझर आणि मार्शल फोख लेखायचा. या तिघांशिवाय इतर आढ्यताखोर नर कबुतरे होती. परंतु या तिघांनी त्यांचा पराभव केला होता. आता या त्रिकुटापैकी थव्याचा नायक कोण होईल याचा निकाल लागायचा होता.

कबुतरांच्या कळपातील श्रीमती जवाहर चकोरनेत्री आणि काळ्याशार रूखासारखी सुंदर होती. तर एक दिवस हिरा चोचीने पंख साफ करीत, गुंजन करीत तिच्याशी लगट करू लागला. तोच जवाहर कसा आणि कोठून अवतीर्ण झाला माहीत नाही. तो लगेच हिरावर तुटून पडला. जवाहर त्वेषाने इतका बेभान झाला होता की तो हिराबरोबर एखाद्या काळरुद्राप्रमाणे झुंज घेत होता. चोचीने ते एकमेकावर प्रहार करीत होते. पायांनी परस्परांना लाथाडीत होते. पंखांनी एकमेकांवर आघात करीत होते. त्यांची ही तुंबळ लढाई पाहून इतर कबुतरे त्यांच्यापासून दूर पळाली. एखाद्या टेनिस खेळातील अम्पायरप्रमाणे चित्रग्रीव त्यांच्याकडे तटस्थपणे पाहत उभा होता. हिराची सरशी झाली. मोठ्या आढ्यताखोरपणे, छाती फुगवून मर्यादेचे पालन न करता तो श्रीमती जवाहरकडे जाऊन म्हणाला, ''बाईसाहेब, तुमचा नवरा भित्रा आहे. माझ्याकडे एकदा कृपाकटाक्ष तरी टाका!'' त्याच्या या लोचटपणाबद्दल तिनं आपल्या कूजनातून राग व्यक्त करीत त्याच्याकडे तिरस्काराने पाहिले, अन् पंख फडफडवीत कबुतरखान्यातील खणीत बसलेल्या नवऱ्याकडे धाव घेतली. या लज्जित प्रसंगाने हिराचा चेहरा पार पडला. अपमानित झालेला हिरा, रागाने भ्रमिष्ट होऊन चित्रग्रीवावर तुटून पडला. या अनपेक्षित चढाईने चित्रग्रीव कोलमडला. हिराने त्याच्यावर चोचीने वार केले. पंखाचा मारा केला. रागाच्या भरात त्याला स्वतःला सावरता येईना. ही संधी साधून चित्रग्रीवाने वेडापिसा झालेल्या त्या हिराच्या तावडीतून सुटका करून घेतली. ते एका वर्तुळातून धावू लागले. कोण कुणाचा पाठलाग करतोय हे देखील कळेना. ते इतक्या वेगाने पिंगा घालीत होते, की ते कधी

थांबत, कधी परस्परांना चोचीने प्रहार करीत आणि कधी पंखांनी झोडपत हेच दिसेनासे झाले. पंखांनी एकमेकांवर आघात करतांना, त्या आवाजाने वातावरण मुखरित झाले. झुंजीत झडलेली पिसे हवेत चोहोकडे उडू लागली. इतक्यात त्यांनी एकमेकांना चोचीने तडाखे दिले. नखांनी ओरबाडून घेतले. आता त्यांच्यात चांगलीच कुस्ती जमली. या झटापटीत ते एकमेकांच्या अंगास इतके भिडले की ते दोन पक्षी नसून जणू एकच पक्षी असावा असा भास होत होता. अशा अटीतटीच्या झुंजीने काहीही साध्य होणार नाही हे हेरून चित्रग्रीवाने प्रतिस्पर्ध्याच्या तावडीतून स्वतःची सुटका करून घेतली. तो हवेत उडाला. आपले पंख प्रचंड वेगाने फडफडवीत हिरा त्याचा पाठलाग करू लागला. इतक्यात चित्रग्रीवाने आपल्या पंजात हिराची मान पकडली. अशा रितीने पोलादी पकडीत धरून चित्रग्रीव त्याला पंखाचे तडाखे देऊ लागला. हिराच्या पंखातील हिमवर्णी पिसे गळून जिकडे तिकडे उडू लागली. त्या पिसांच्या वर्षावात ते दोघे उलटपालट होताना दिसत नव्हते. बेभान झालेल्या एखाद्या विषारी सर्पाप्रमाणे ते एकमेकांवर पुन्हा तुटून पडले. अखेर एखादे शुभ्र फूल कोमेजून मातीत पडावे तसा हिरा अति रम्य पंख पसरून पडला. त्याचा पाय मोडला होता. या झटपटीत चित्रग्रीवाच्या कंठ आणि मानेवरील पिसे झडून गेली. परंतु त्या झुंजीचा एकदाचा निकाल लागला याचा त्याला आनंद होत होता. त्याला एका गोष्टीची जाणीव होती की हिराचे अर्धेअधिक सामर्थ्य जवाहरशी झुंज खेळण्यात गेले होते. नाहीतर ही लढाई चित्रग्रीवाला जिंकणे अशक्य होते. पण सारे काही ठीक झाले असेच म्हणावे लागेल. जखमी हिराच्या पायाला मी मलमपट्टी केली. नुकत्याच घडलेल्या महाभारताची पुसटही आठवण न ठेवता अर्ध्या एक तासात साऱ्या कबुतरांचा थवा दाणे टिपत होता. कसलीही अप्रिय भावना त्यांच्या मनात नव्हती. अर्थात ती सारीजणे चांगल्या कुलांतून आली होती! अगदी लहानातल्या लहान कबुतरांत हे चांगले संस्कार होते. आणि हिराने आपला पराभव हसत खेळत झेलला.



जानेवारी महिन्याच्या आगमनाबरोबर आल्हाददायक थंडीला सुरुवात झाली. आकाश निरभ्र होते. अन् कबुतरांच्या शर्यतीला सुरवात झाली. सांघिक उड्डाण, दूर अंतरापर्यंत उडत जाणे, संकटांना तोंड देत उडत राहणे, या तीन गुणांचा शर्यतीत विचार केला जाई. यातील पहिली शर्यत माझ्या कबुतरांनी जिंकली. एका दुर्घटनेमुळे माझ्या कबुतरांना इतर दोन शर्यती जिंकता आल्या नाहीत. त्याविषयी मी पुढे सांगेनच.

ही सांघिक उड्डाणांची पैज असते. आपापल्या घरांपासून कबुतरांचे वेगवेगळे थवे आकाशात उडू लागतात. आभाळातून उंचावर उडत असताना जेव्हा त्यांना धन्याची साद आणि शीळ ऐकू येईनाशी होते तेव्हा सर्व थवे एकमेकात मिसळतात. क्षणातच योग्य अशा नायकाच्या मार्गदर्शनाखाली एकमताने त्याचे अनुसरण करतात. जे कबुतर सर्वांच्या आघाडीवर असते त्याला पुढे जाऊ दिले जाते. तोच त्या थव्यांचा नायक होतो. कबुतरांचे शहाणपण आणि त्यांच्या अतींद्रिय ज्ञानामुळे हे सहज घडू शकते.

तपमान पंचेचाळीस अंश इतके खाली आले. खरे म्हणजे वर्षातील अति थंडीचे हे दिवस. अशा काळात आकाश निरभ्र आणि नितळ असते. दूरवर क्षितिज इंद्रनीलमण्यासारखे शोभत होते. पहाटेच्या उजेडात शहरातील गुलाबी, निळी, पांढरी आणि सोनेरी वर्णाची घरे एखाद्या गंधर्वनगरीसारखी दिसत.

दूर क्षितिजावर अरुणोदय झाला. वस्त्रे आणि अलंकारांनी विभूषित स्त्री-पुरुष प्रभात समयीची प्रार्थना करून उदयाचली आलेल्या सूर्यनारायणाला वंदन करीत होते. रात्रीच्या गर्भात सामावलेले नाद आणि गंध येऊ लागले. आकाश घारी आणि कावळ्यांच्या आवाजांनी भरले. अशा या कोलाहलातून दूर राऊळातून वेणुचा मधुर स्वर ऐकू येत होता. शर्यतीला सुरुवात झाल्याबद्दल शिटी वाजली. प्रत्येक कबुतर शौकीन आपापल्या घरावरून पांढऱ्या पताका फडकवू लागले. इतक्यात कबुतरांच्या प्रचंड थव्याचे आकाशात आगमन झाले. विविध रंगाच्या

कबुतरांचे थवेच्या थवे पंख फडफडवीत शहरावरून उडत होते. आभाळात जणू ढगांचा गडगडाट व्हावा तसा उडणाऱ्या थव्यांचा ध्वनी येत होता. त्या आवाजाला भिऊन घारी आणि कावळ्यांनी पळ काढला. समानुपाती उडणारे सारे थवे ढगाप्रमाणे एकत्रित आले. त्या समूहाच्या उड्डाणाचा आवाज येत होता. प्रत्येक क्षणी ते उंच उडत असले तरी कबुतरांचे थवे त्यांच्या नायकासह वेगळे दिसत होते. शेवटी सारे थवे एकत्रित झाल्यावर आकाशात उडणाऱ्या एखाद्या विशाल पटासारखे दिसत होते. उडण्याच्या वैशिष्ट्यावरून चित्रग्रीव, हिरा, जवाहर आणि इतर सहा जणांना मी अचूक ओळखू शकत होतो. प्रत्येकाच्या उडण्याच्या तऱ्हा वेगळ्या. आपल्या कबुतरांचे लक्ष वेधण्यासाठी त्यांचे धनी थांबून थांबून कर्कश आवाजात शीळ घालीत. आवाज ऐकू येण्याच्या पल्ल्यात असलेल्या कबुतरांचे त्याकडे लक्ष वेधले जाई.

शेवटी सारा थवा इतक्या उंच गेला की मोठ्याने वाजविलेल्या तुतारीचा आवाज सुद्धा त्यांच्यापर्यंत पोचला नसता. आता त्यांनी आकाशात गोलगोल फेऱ्या घ्यायचे थांबविले आणि एकाच पातीतून उडू लागले. आता नायकपद मिळाविण्याची स्पर्धा सुरू झाली. आकाशातून एका दिशेकडून दुसरीकडे थवे वळताना आम्ही धनी मंडळी खालून डोळे फाडफाडून त्यांच्याकडे बघत असू. एकमेकांच्या उडण्याच्या पद्धतीवरून नायकपद कोण जिंकेल याचा अंदाज घेत असू. क्षणभर असे वाटले की नायकपदावर जवाहर विराजमान होईल. तो साऱ्या थव्याच्या आघाडीवर जातो तोच सारा कळप उजवीकडे वळला. त्यामुळे त्याच्या श्रेणीत गोंधळ उडाला. रेसकोर्समधील घोड्यांच्या शर्यतीप्रमाणे अगदी अनपेक्षित कबुतरे पुढे सरसावली. परंतु काही वेळेतच थव्यांनी त्यांना बाजूला सारले. हा प्रकार इतक्या वेळा घडू लागला की आम्हाला त्या स्पर्धेत रस वाटेनासा झाला. वाटले कुणी तरी अज्ञात कबुतर नायकपद जिंकेल.

आता एकाएकी प्रत्येक घराच्या माळवदावरून आवाज उठला, "तो



पाहा चित्रग्रीव, चित्रग्रीव, चित्रग्रीव!" खरोखरीच अनेक कबुतरप्रेमी त्या नावाचा गजर करीत होते. त्या विशाल थव्याच्या आघाडीवर माझे कबुतर उडत होते, हे निश्चित सांगू शकत होतो. साऱ्या नायकांत तो एक उठून दिसत होता. साऱ्यांना मार्गदर्शन करीत होता, ते दृश्य पाहून माझा आनंद गगनात मावेनासा झाला. तो एका क्षितिजरेषेपासून दुसऱ्या क्षितिजाकडे जाताना प्रत्येक वेळी उंच झेप घेई. सकाळी आठपर्यंत आकाशात एकही कबुतर दिसेनासे झाले. आम्ही आमच्या पताका उडविल्या. आणि नंतर अभ्यासासाठी खाली उतरलो. ते पाहा! अजूनही चित्रग्रीव अग्रभागीच होता. पुन्हा "चित्रग्रीव, चित्रग्रीव, चित्रग्रीव," या नावाचा उद्घोष ऐकू येत होता. खरेच त्याने स्पर्धा जिंकली होती. जवळ जवळ चार तास तो थव्याचे नेतृत्व करीत होता. जसा तो उंच गेला होता तसा तो खाली झेपावत होता. खरेच ते कौशल्याचे काम होते!

आता गगन विहारातील सर्वात मोठा धोकादायक प्रसंग आला. नेत्याने आज्ञा देताच विशाल समूहातून एक एक थवा वेगळा होत होता. प्रत्येक थवा आता घराच्या दिशेने उडत होता. परंतु यासाठी घाई करून चालणार नव्हते. सारेजण घराकडे परतत असताना वरच्या फळीवर राहून इतराचे संरक्षण करणे आवश्यक होते. ही जवाबदारी चित्रग्रीवाने घेतली. आपल्या थव्याचा आकार छत्रीसारखा करून खाली उडणाऱ्या साऱ्या स्पर्धकांवर संरक्षणाचे छत्र उभे केले. नेतृत्वासाठी फार मोठी किंमत द्यावी लागते—म्हणजे स्वार्थत्याग करावा लागतो.

आता तर त्याच्या खऱ्या सत्वपरीक्षेची वेळ आली. बाज नावाचे पक्षी हिवाळ्यात उत्तरेकडून दक्षिणेकडे स्थलांतर करतात. ते मेलेल्या पक्ष्यांचे मांस खात नाहीत. गरुड आणि ससाण्याप्रमाणे बाज स्वतः शिकार करून खातात. स्वभावाने ते क्रूर आणि लबाड असतात. गरुड कुलात खालच्या श्रेणीत असणाऱ्या बाजाचे घारीशी साम्य असते. फक्त त्यांचे पंख घारीच्या पंखांच्या किनाऱ्याप्रमाणे कात्रीदार नसतात. ते जोडीने

घारीच्या थव्याच्या वरच्या पातळीवर उडत असल्यामुळे क्वचितच भक्ष्याला दिसतात, मात्र भक्ष्याला पाहू शकतात.

चित्रग्रीवाला नायकपदाचा सन्मान मिळाला त्याच दिवसाची घटना. घारींच्या थव्याबरोबर बाज पक्ष्यांची जोडी उडताना मला दिसली. लगेच मी तोंडात बोटे घालून शिटी वाजविली. माझा इशारा चित्रग्रीवाच्या ध्यानी आला. समानुपाती थव्यामध्ये तो आला. जवाहर आणि हिरा यांना टोकावरची जागा घेण्यास सांगितले. सारा कळपच एकजिनसी होऊन तोच उडणाऱ्या एखाद्या प्रचंडकाय पक्ष्याप्रमाणे दिसू लागला. तो थवा वेगाने खाली डूब घेत उडत होता. आकाश-क्रीडांगणात घेतलेली जबाबदारी त्याने पार पाडली. सकाळी ज्या थव्याशी खेळ खेळत होता, ती सारी एव्हाना घरी परतली होती.

तो थवा डूब घेताना बाज पक्ष्याने पाहिले होते. हिमालयाच्या शिखरावरून एखादा दगड पडावा तसा तो त्यांच्या अग्रभागी पडला. थव्याच्या पातळीवर पोचताच आपले पंख उघडून तो त्यांच्या समोर गेला. ही काही त्याची नवीन करामत नव्हती. कबुतरांच्या कळपावर दहशत घालण्याची त्याची चाल होती. अकरापैकी दहा प्रयत्न यशस्वी होतात. असे घडले की घाबरलेली कबुतरे थवा सोडून वाट फुटेल त्या दिशेने उडून जाऊ लागतात. बाजाच्या अपेक्षेप्रमाणे आता तसेच घडले होते. परंतु धूर्त चित्रग्रीव न डगमगता पंख फडफडवीत थव्यासह शत्रूवरून पाच फूट उंच उडाला. ही रीत त्याने मुद्दाम अवलंबली. कारण एकजीव झालेल्या थव्यावर शत्रू कधीच हल्ला करीत नाही. तो शंभर एक यार्ड पुढे गेला नसेल तोच त्याची बाईल त्या कळपाला आडवी गेली. अन् आपल्या पतीप्रमाणे तिने पंख उघडले. परंतु चित्रग्रीवाने तिच्याकडे लक्षच दिले नाही. साऱ्या थव्याचा मोर्चा सरळ तिच्यावर नेला. खरे म्हणजे ती अतर्क्य घटना होती. यापूर्वी कोणा कबुतराने असले धाडस केले नसेल. या आकस्मिक चढाईमुळे गोंधळून तिने पळ काढला. जसे तिने आपली पाठ दाखविली तसे चित्रग्रीवाने थव्यासह



वेगाने खाली डूब घेतली. यावेळेपर्यंत बाजाची जोडीदारीण आमच्या माळवदावर जेमतेम सहाशे फूट उंच असावी. नंतर दुर्दैवाने नर बाज एखाद्या स्फोटकासारखा समानुपाती थव्याच्या मध्यभागी येऊन आदळला आणि त्याने लगेच आवेशाने पंख उघडले. तापलेल्या सांडशीप्रमाणे चोच वासून कोपाने किंचाळत तो ओरडू लागला. परिणामी एकजीव असलेला थवा भयाने दुभंगला. एका थव्याने चित्रग्रीवाचे अनुसरण केले. परंतु त्याला पाहताच भयाने कांपत दुसरा थवा तितरबितर झाला. अशा संकट काळात खरा नायक जे काही करील तेच चित्रग्रीवाने केले. भीतिग्रस्त थव्याचा पाठलाग करून त्याने त्यांना आपल्या समूहात सामील करून घेतले. असे घडते न घडते तोच बाजाची चपळांगी जोडीदारीण विद्युल्लतेप्रमाणे चित्रग्रीव आणि इतर कबुतरांच्यामध्ये झपाटली. ती जवळ जवळ त्याच्या शेपटीवर आदळली आणि इतरांपासून त्याला अलग पाडले. नायकापासून विभक्त होताच मागेपुढे न पाहता इतर कबुतरे भीतीने वाट फुटेल तिकडे उडाली. आता चित्रग्रीव एकटा पडला. त्याच्यावर कोठूनही हल्ला होण्याची शक्यता होती. आपले धैर्य खचू न देता माघारी चाललेल्या कबुतरांच्या दिशेने तो झेपावला. चित्रग्रीव बारा एक फूट खाली आला न आला तोच बाज महाशयाने त्याच्यावर चाल केली. मात्र चित्रग्रीवाने त्याला इतक्या जवळ आलेला पाहून निडरपणे कोलांटी घेतली. सुदैवाने त्याचे वर्तन बरोबर होते. जर त्याने तसे केले नसते तर चपळांगी बाजाने त्याला लगेच आपल्या पंजात पकडले असते.

तोवर माझी इतर कबुतरे उडत उडत घरापर्यंत पोचली होती. पिकलेली फळे जशी झाडावरून पडतात तशी ती माळवदावर टपकत होती. परंतु या कबुतरात एक निडर कबुतर होता. तो धैर्याचे मूर्तिमंत प्रतीक होता. तो म्हणजे कृष्णवर्णाचा जवाहर. जसे इतर कबुतरे माळवदावर उत्तरली तसा तो कोलांटी घेऊन उंच उडाला. त्याचा हेतू काही वावगा नव्हता. तो चित्रग्रीवाच्या बचावासाठी निघाला होता.



त्याने पुन्हा कोलांटी घेताच बाजाने आपला इरादा बदलला. चित्रग्रीवाचा पिछा सोडून तो जवाहरकडे झेपावला. चित्रग्रीवाचा स्वभाव कसा आहे हे तुम्हाला माहिती आहेच. जवाहरला वाचविण्यासाठी त्याने डूब घेतली. विद्युल्लतेपरी वेढा देऊन बाजाच्या चपळांगीला त्याने हैराण केले. वक्र घिरट्या घेण्याला जे चापल्य लागते ते चित्रग्रीवात होते. तिच्यात त्याचा अभाव होता. परंतु नर बाज मात्र अनुभवी होता. अचूक वेध घेण्यासाठी तो उंच उडाला. त्यामुळे जवाहर मात्र संकटात सापडला. एका चुकीच्या वळणात बाजाने त्याचा घात केला असता. अरेरे! जे करू नये तेच नेमके त्या पक्ष्याने केले. जवाहर नर बाजाखालून सरळ रेषेत असताना नेम धरून त्याच्यावर एखाद्या विजेच्या शांत लोळासारखा पडला. एवढे घडले तरी त्याचे किंचितसुद्धा पडसाद पडले नाही. बाजाच्या रूपाने मूर्तिमंत मृत्यू खाली खाली येत होता. इतक्यात एक चित्तथरारक गोष्ट घडली. बाज आणि जवाहर यांच्यामधून कोण, कसा व कोठून झपाटला न जाणे! त्याला जवाहरचा बचाव करून शत्रूला नाउमेद करावयाचे होते. या अकस्मात हल्ल्यामुळे न गडबडता त्या बाजाने तीक्ष्ण नखांनी त्या अनाहुताला पकडण्याचा प्रयत्न केला. या झटापटीत हवेत पिसेच पिसे उधळली. शत्रूच्या तावडीत सापडलेला चित्रग्रीव वेदनांमुळे अंगाला आळेपिळे देत होता. वाटले की माझ्या शरीरात कुणी तप्त लोखंडाची सळई खुपसतेय. तसे त्या हतबल पाखराकरिता मी कितीतरी मोठ्याने किंचाळलो! परंतु कशाचा काही उपयोग झाला नाही. आपल्या पंजाने पक्की पकड धरण्याच्या प्रयत्नात तो घिरट्या घालत त्याला उंचावर नेत होता. चित्रग्रीवाचे प्राण वाचावेत म्हणून मी इतका व्याकूळ आणि चिंतातुर झालो होतो की श्रीमती बाजाने केव्हा झपाटून जवाहरला पकडले हे माझ्या लक्षात आलेच नाही. जेव्हा चित्रग्रीवाला पकडण्यात आले त्याच क्षणी हे घडले असावे. आता जवाहरची पिसे हवेत विखुरली. शत्रूने जवाहरला आपल्या पंजात घट्ट पकडले होते. सुटकेसाठी त्याला हालचाल देखील करता येत नव्हती. परंतु चित्रग्रीवाची गोष्ट



वेगळी होती. तो अद्यापही बाजाच्या पंजातून निसटण्यासाठी वळवळ करीत होता. पंजातील भक्ष्याला पक्के पकडण्यासाठी त्याला मदत करण्याच्या हेतूने ती पतीजवळ आली होती. परंतु या प्रयत्नात अनावधानाने ती पतीवर जाऊन धडकली. त्याचवेळी जवाहर पंजातून सुटण्याचा प्रयत्न करीत होता. ती पतीवर इतके झुकली की परिणामी तिचे पंजे त्याच्यावर आदळले. तसा त्याचा तोल गेला. तो हवेत उलटा पालटा झाला. या संधीचा फायदा घेऊन चित्रग्रीव त्याच्या ताब्यातून सुटला. पुन्हा एकदा हवेत पिसांची पखरण झाली. तो एखाद्या दगडासारखा वेगाने खाली आला. अन् काही क्षणातच रक्तबंबाळ झालेल्या अवस्थेत धापा टाकीत माळवदावर कोसळला. मी लगेच त्याला हातात घेतले. त्याच्या दोन्ही अंगांच्या चिंधड्या झाल्या होत्या. परंतु जखमा गंभीर नव्हत्या. लगेच मी त्याला पशुवैद्याकडे नेले. त्याने जखमावर मलमपट्टी केली. यासाठी अर्धा तास लागला. घरी परतल्यावर त्याला कबुतरखान्यातील खणीत ठेवले. परंतु जवाहर मला कोठेच दिसेना. त्याचे घरटे रिकामे होते. मी जेव्हा माळवदावर गेलो तेव्हा जवाहरची पत्नी भिंतीवर बसलेली दिसली. आपला पती दिसतो काय यासाठी तिची नजर उदासपणे आभाळात भिरभिरत होती. त्यानंतर दोन-तीन दिवस त्याची वाट पाहत तिथेच बसून होती. आपल्या शूर मित्राच्या संरक्षणासाठी त्याने स्वतःच्या प्राणाची आहुती दिली होती. एवढाच काय तो तिला दिलासा असावा काय?

## चित्रग्रीवाचा प्रणय



चित्रग्रीवाच्या जखमा भरून निघायला बरेच दिवस लागले. फेब्रुवारीच्या मध्यापर्यंत तरी माळवदावरून त्याला दहा यार्ड देखील उंच उडता येत नसे. अन् तो उडताक्षणीच खाली येई. पुन्हा पुन्हा उडण्यास मी त्याला प्रवृत्त करी. परंतु पंधरा वीस मिनिटांपेक्षा तो अधिक समय उडू शकत नसे. सुरवातीला मला वाटले त्याच्या फुप्फुसात काही तरी दोष असावा. तपासणी केल्यावर तसे काही आढळून आले नाही. उडण्याचा त्याचा निरुत्साह पाहून वाटले अलिकडच्या दुर्घटनेमुळे त्याच्या हृदयात काही तरी बिघाड असावा. म्हणून त्याची फेरतपासणी केली. माझा अंदाज आताही चुकीचा होता.

चित्रग्रीवाच्या अशा वागण्यामुळे राग येऊन एक सविस्तर पत्र महाजनाला लिहिले. त्यात इत्थंभूत हकिकत कळविली. नंतर आढळून आले की तो कोणा इंग्रज माणसाबरोबर शिकारीच्या मोहिमेवर गेला आहे. कठीण समय येताच कोण कामास येतो याची प्रचिती येऊन मी स्वतःच त्याचा डॉक्टर बनलो. रोज माळवदाच्या भिंतीवर बसवून त्याचे निरीक्षण करायचो. परंतु त्याला होत असलेल्या त्रासाचे काही निदान होईना. शेवटी चित्रग्रीव कधी उडेल ही आशा सोडून दिली.

फेब्रुवारीच्या अखेरीला जंगलाच्या आंतर भागातून गिचमीड अक्षरात महाजनाची एक चिठ्ठी मिळाली. त्यात लिहिले होते, "तुझा कबुतरपक्षी भ्याला आहे. त्या भीतीपासून त्याला मुक्त कर. त्याला उडवत जा." परंतु हे कसे साध्य करायचे याचा त्यात खुलासा नव्हता. तो पुन्हा आभाळात उंच केव्हा उडेल याचा उपाय माझ्याजवळ नव्हता. छतावरून तो उडावा म्हणून मी त्याचा पिच्छा करी. एका कोपऱ्यापासून त्याचा पाठलाग केला की तो दुसऱ्या कोपऱ्यात जाऊन तेथे स्वस्थ बसून राही. आकाशातील ढगांची अथवा उडणाऱ्या पक्ष्यांच्या थव्याची नुसती सावली पडली तरी तो बुजे अन् भीतीनं थरथर कापू लागे. त्याच्या अंगावर पडलेल्या प्रत्येक सावलीमुळे आकाशातून बाज पक्षी झपाटत येत असल्याचा त्याला भास होई. त्यामुळे मला त्याची कल्पना आली की तो पार खचून गेला आहे. आता मात्र मी देखील चक्रावून गेलो की या भीतीपासून त्याला मुक्त कसे करायचे. हिमालयात असतो तर मी लगेच त्याला लामा साधूकडे नेऊन बरे केले असते. तसे त्याने एकदा त्याला बरे केले होते. परंतु अशा शहरात लामा कुठून आणायचा? वाट पाहिल्याशिवाय गत्यंतर नव्हते.

मार्चपासून वसंत ऋतूला सुरवात झाली. चित्रग्रीवाची अपूर्व अशी पखझड झाली. त्याला निळ्या-हिरव्या रत्नाचे अवर्णनीय रूप प्राप्त झाले होते. एके दिवशी तो जवाहरच्या विधवा पत्नीशी अवचितपणे गुढगुंजन करताना दिसला. वसंताच्या आगमनाबरोबर तिचेही सौंदर्य खुलले होते. सूर्यप्रकाशात ती एखाद्या कृष्णमण्यासारखी शोभे. वाटे की रात्रीच्या मखमली अंधारात ती एखाद्या नक्षत्रासारखी सुंदर दिसत आहे. मात्र चित्रग्रीव आणि जवाहरची पत्नी यांच्या मीलनातून उत्कृष्ट प्रजोत्पत्ती होणार नव्हती. परंतु याक्षणी तेच योग्य होते. या निमित्ताने कदाचित त्याने भीतीवर मात केली असती. अन् जवाहरच्या मृत्यूने तिच्यावर पडलेल्या दुःखाच्या सावटीतून ती पुन्हा सावरली असती.

त्यांच्या मैत्रीत वृद्धी व्हावी म्हणून एके दिवशी त्या दोघांना पिंजऱ्यात

घालून माझा मित्र राजाकडे गेलो. तो शहरापासून दोनशे मैल दूर अंतरावर जंगलाच्या सरहद्दीवर राहायचा. त्या गावाचे नाव होते घाटशिळा. नदीकाठी वसलेल्या या गावाच्या सभोवती उंच डोंगर होते. त्यावर घनदाट जंगल होते. त्यात अनेक वन्यप्राण्यांचा संचार होता. राजाचे वडील त्या गावचे पुरोहित. हे पुरोहितपण गेल्या अनेक पिढीपासून दहा शतके चालत आले होते. त्याची जागा आता राजाने घेतली होती. गावातील देवळाशेजारीच राजाचे वडिलोपार्जित मोठे घर होते. सभोवताली उंच भिंती असलेल्या देवळाच्या प्रांगणात जमलेल्या भाविकासमोर रात्री पोथीपुराण वाचून राजा प्रवचन द्यायचा. इकडे देवळात प्रवचन चालू असता नदीपलीकडच्या जंगलातून वाघाची डरकाळी अथवा हत्तीची तुतारी ऐकू यायची. ती जागा जशी सुंदर, तशी भयावह होती. घाटशिळेत कधी भीतिदायक घटना घडल्या नाहीत. वाघाबिबट्यासारखे हिंस्र प्राणी पाहायचे तर त्याकरिता दूर जावे लागत नसे.

रेल्वेमार्गाने घाटशिळेत पोचायला मला रात्र झाली. राजा दोघा गड्यांबरोबर मला घ्यायला स्टेशनावर आला होता. एकाने माझे सामान घेतले. तर दुसऱ्याने कबुतराचा पिंजरा हाती घेतला. प्रत्येकाजवळ कंदील होता. माझ्याकरिता एक कंदील जादा होता. एका रांगेत आम्ही चाललो होतो. पुढे एक गडी वाट काढीत चालत होता. तर दुसरा सर्वांमागून येत होता. जवळ जवळ तासभर आम्ही वाटचाल करीत होतो. मला संशय आल्यामुळे विचारले, "आपण असं आडमार्गानं का जात आहोत?" त्यावर राजा म्हणाला, "वसंत ऋतूत या जंगलातून वन्यप्राणी उत्तरेकडे स्थलांतर करतात. म्हणून जंगलातल्या नजीकच्या रस्त्यानं जाता येत नाही." "काय मूर्खपणा आहे?" मी म्हणालो. "यापूर्वी अनेकदा अशा वाटा तुडविल्या आहेत. अशा रितीनं आपण कधी घरी पोचणार?"

"अर्ध्या एक तासात पोचू—"

"मी असे बोलतो न बोलतो तोच जणू आमच्या पायाखालची



जमीन दुभंगून ज्वालामुखीचा स्फोट होऊन गडगडाट व्हावा तशा होअ-हो-हो-होअ अशा आरोळ्या ऐकू आल्या. पिंजऱ्यातील कबुतरांनी घाबरून फडफड केली. लगेच एका हाताने मी राजाच्या खांद्याला घट्ट धरले. माझी ही घाबरगुंडी उडालेली पाहून राजा खो-खो हसू लागला. जसा धनी तसा नोकर—दोघे गडी हसण्यात त्याला साथ देत होते.

आनंदाच्या त्यांच्या उकळ्या ओसरल्यावर राजा चेष्टेने म्हणाला, "अरे! तू या जंगलातील वाटेनं अनेकदा गेला होतास ना? मग माकडांच्या आवाजानं इतका का घाबरलास? ही माकडं कंदिलाच्या प्रकाशाला भिऊन ओरडली."

"ही माकडं होती तर?" मी आश्चर्याने विचारले.

"होय," त्यावर माझा मित्र म्हणाला, "या दिवसांत त्यांचे कळपच्या कळप उत्तरेकडं स्थलांतर करतात. झाडावर बसलेला सारा कळप आपल्याला पाहून बुजला. बस्स! निदान यापुढं तरी माकडांच्या ओरडण्याला वाघाची डरकाळी समजू नकोस." या प्रसंगाचा माझ्या चित्तवृत्तीवर काहीही परिणाम झाला नाही. सुदैवाने सुरक्षितपणे आम्ही गावात पोचलो.

दुसऱ्या दिवशी सकाळी राजा पूजाअर्चा करण्यासाठी देवळात गेला. मी मात्र घराच्या माळवदावर जाऊन कबुतरांना मोकळे सोडले. सुरवातीला ती बिचकली. परंतु मी त्यांच्याजवळ हातावर लोण्याने माखलेले दाणे घेऊन उभा असलेला पाहून कसलेही आढेवेढे न घेता न्याहारी करू लागली. जवळ जवळ सारा दिवस आम्ही माळवदावर काढला. बराच वेळ त्यांना सोडून इकडे तिकडे जाण्याचे मी धाडस केले नाही. नाहीतर अपरिचित अशा परिसराने ती अस्वस्थ झाले असती.

नंतरच्या आठवड्यात मात्र त्यांचा बुजरेपणा कमी झाला. त्या पाखरांना घाटशिळा आपल्या घरासारखी वाटू लागली. ती दोघे एकमेकाच्या अधिक जवळ येत होती. इतर कबुतरांच्या थव्यापासून त्यांना विभक्त केले ते शहाणपणाचे ठरले. आठव्या दिवशी आश्चर्यच घडले. राजा

आणि मी पाहत होतो—चित्रग्रीव आपल्या सखीचा अनुनय करीत पाठलाग करीत होता. फार उंचावर नाही अशी ती दोघे उडत होती. तो तिच्या मागून उडत होता. तिच्या जवळ पोचताच ती उंच उडत मागे वळली. तिचे अनुसरण करीत तो मागोमाग उडत होता. तिने पुन्हा उंच झेप घेतली. परंतु यावेळी उडता उडता एकदम थांबून तिच्या खालून तो गोल गोल फेऱ्या घेत उडू लागला. मला वाटले आता त्याचा आत्मविश्वास वाढतोय. हा कपोत कुल शिरोमणी चित्रग्रीव भयापासून पुन्हा एकदा मुक्त होतोय. आभाळमाया त्याला साद घालीत होती. तो पुनश्च निर्भयपणे आकाशात संचार करीत होता.

दुसऱ्या दिवशी ते पक्षी आभाळात उंच उडत उडत एकमेकांशी प्रेमक्रीडा करीत होते. चित्रग्रीव नेहमीप्रमाणे तिच्या भोवती खालून रुंजी घालण्याऐवजी मधूनच परत फिरला आणि झपाट्याने खाली येऊ लागला. त्यामुळे मी गोंधळून गेलो. परंतु राजाच्या ते लक्षात आले होते. त्याचे कारण सांगताना तो म्हणाला, "एखाद्या पंख्याएवढा ढगाचा तुकडा सूर्यावर आला. त्याची सावली इतक्या अचानकपणे पडली की चित्रग्रीवाला ती सावली एखाद्या शत्रू पक्ष्याची वाटली. ढग जाईपर्यंत वाट पाहा—"

राजाचे म्हणणे बरोबर होते. काही क्षणातच ढग निघून गेले. सूर्याचा प्रकाश पुन्हा चित्रग्रीवाच्या पंखातून पाझरू लागला. त्याक्षणी खाली येण्याचे थांबून तो आकाशात गोल गोल फेऱ्या मारू लागला. त्याला साथ देण्यासाठी त्याची साजणी खाली येत होती. परंतु त्याचे बदलते आचरण पाहून ती आकाशात शंभर फूट वर त्याच्या येण्याची वाट पाहू लागली. एखादा गरुड पक्षी पिंजऱ्यातून सुटावा तसा चित्रग्रीव आपले पंख झपाझप हालवीत उंच उडू लागला. जसे अधांतरी झोके घेत, वळणे घेत तो उंच जाऊ लागला तशी सूर्यप्रकाशामुळे चित्रग्रीवाच्या भोवती अनेक रंगांची वलये निर्माण होऊ लागली. आता तिचे अनुसरण न करता तो तिच्या आघाडीवर उडू लागला. ती दोघेजण दिगंतरात



पोचली. आता भयाचा लवलेशही त्याच्यात शिल्लक राहिला नव्हता. त्याचे चापल्य अन् सामर्थ्यावर ती मोहित झाली.

दुसऱ्या दिवशी सकाळी ती दोघे लवकरच आकाशात उडू लागली. ती उडत उडत दूरवर गेली. थोड्याच वेळात ती पार पर्वताच्या पलीकडे नाहीशी झाली. जणू शिखरावरून खोल दऱ्याखोऱ्यात ती घरंगळत गेली असावीत. एक तासभर तरी ती दिसली नाहीत.

शेवटी एकदाची अकराच्या सुमाराला परतली, तेव्हा त्यांच्या चोचीत गवताची पाती होती. अंडी घालण्याकरिता घरटे बांधण्याच्या ती तयारीत होती. मला वाटले आता त्यांना घरी परत न्यावे. परंतु राजाने आग्रह केला की आम्ही निदान एक आठवडाभर तरी थांबावे.

त्या दिवसात नदीकाठच्या किर्रर जंगलात आम्ही त्या कबुतरांना काही वेळ नेत असू. त्या घनदाट जंगलात त्यांना सोडून दिले की तेथून पाच मैल अंतरावर असलेल्या राजाच्या घराकडे ती परत जात. या काळात चित्रग्रीवाला सर्वस्वाचा विसर पडला होता. आकाशात उंच उंच उडत असता दिशांचे भान कसे ठेवावे हे पुन्हा एकदा तो पडताळून पाहत होता. साजणीविषयी नव्याने जागृत होणारे प्रेम, जागेत आणि हवामानात झालेला बदल या सर्वांचा त्याच्यावर अनुकूल परिणाम होऊन तो भयगंडापासून मुक्त झाला.

आपल्या जीवनात जी अनेक संकटे निर्माण होतात त्याचे मूळ भय, चिंता आणि द्वेष या त्रिदोषात आहे. या तीन दोषांपैकी एकाची जरी माणसाला बाधा झाली तरी दुसरी दोन दारात उभी असतात.

कुठलाही हिंस्र प्राणी समोरचे सावज प्रथम भ्याल्याशिवाय त्याला ठार मारणार नाही. भक्ष्य असलेला प्राणी भीतीने गर्भगळीत झाल्याशिवाय भक्षक त्याला नाहीसे करू शकत नाही. थोडक्यात सांगायचे म्हणजे शत्रूने शेवटचा तडका देण्याअगोदर तो प्राणीच भीतीने अर्धमेला झालेला असतो.

## चित्रग्रीवाला युद्धाची हाक



पिलांचा जन्म झाल्यावर ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात चित्रग्रीव आणि हिराची रवानगी कोलकात्याहून मुंबईला करण्यात आली. ती दोन कबुतरे घेऊन महाजन समुद्रमार्गाने युरोपात जागतिक युद्धाच्या कामगिरीवर जाणार होता. चित्रग्रीवाबरोबर हिरालाही पाठवले. तो अद्याप पावेतो ब्रह्मचारीच होता. तेथील सैन्याला दोघांची आवश्यकता होती. फ्लँडर्स आणि फ्रान्स येथील युद्धभूमीवर निघण्यापूर्वी चित्रग्रीवाने आपल्या चिमुकल्या पिलांना पाहिले होते. ज्या कबुतराची पत्नी आणि नवजात पिले घरी प्रतीक्षा करीत असतात तो कबुतर त्यांच्या ओढीने नेमका आपल्या घरी परत येत असतो. संदेशवाहकाचे कामही बरोबर बजावतो. याच कारणामुळे मलाही आनंद झाला. युद्धभूमीवरील तोफांचा गडगडाट आणि बंदुकीच्या फैरीच्या आवाजाला घाबरून तो आपले कर्तव्य अर्धवट वाटेत सोडणार नाही याची मला खात्री होती.

परंतु एखादा असा प्रश्न करील की घर कोलकात्यात होते आणि युद्धभूमी हजारो मैल अंतरावर. तुमचे म्हणणे खरे आहे. कारण पत्नी आणि पिले त्याने घरी सोडली होती. त्यांच्या ओढीने तो महाजनाबरोबर तात्पुरत्या कबुतरखान्याकडे परत येईल, यात शंका घ्यायला जागा नव्हती.

चित्रग्रीवाने सुरुवातीपासून अनेक महत्वाचे संदेश युद्धभूमीपासून मुख्यालयापर्यंत पोचते केले होते. मुख्य सैनिक अधिकारी आणि महाजन कचेरीत त्याची वाट पाहत असत. अर्थात चित्रग्रीवाची महाजनाकडे ओढ होतीच. परंतु काही महिन्यानंतर तो मुख्य सैनिक अधिकाऱ्याचाही आवडता झाला.

या दोघा कबुतरांबरोबर महाजन युद्धभूमीवर गेला. कारण वयाने लहान असल्यामुळे मला युद्धावर जाता आले नाही. म्हणूनच महाजनाला जावे लागले. हिंदुस्तान ते मार्सेय्य या समुद्रमार्गाच्या प्रवासात हिरा आणि चित्रग्रीव यांची जवळीक त्या अनुभवी शिकाऱ्याशी झाली. कुठलाही प्राणी महाजनाला वश झाला नाही असे कधी घडले नाही. तशी माझी कबुतरे त्याला पूर्वीपासून ओळखत असल्याने ती लगेच त्याला सरावली.

सप्टेंबर 1914 पासून उन्हाळ्यापर्यंत फ्लँडर्स येथील तळावर हिंदी फौजेबरोबर महाजन पिंजरे घेऊन राहिला. हिरा किंवा चित्रग्रीवाला मात्र युद्धाच्या वेगवेगळ्या आघाडीवर नेण्यात आले. पातळ कागदावर वेळोवेळी संदेश लिहून कबुतरांच्या पायाला बांधला जाई. कारण अशा कागदाचे वजन एका औंसापेक्षा अधिक नसे. नंतर त्याला उडविले जाई. मुख्यालयात महाजन असताना चित्रग्रीव अचूकपणे त्याच्याकडे उडत जाई. लगेच त्या संदेशाचे वाचन करून त्याचे उत्तर मुख्य सैनिक अधिकारी यांच्याकडे पाठविले जाई. चित्रग्रीव आपल्या चांगल्या कामगिरीमुळे आता मुख्य सैनिक अधिकाऱ्याला देखील आवडू लागला. चित्रग्रीवाने केलेली कामगिरी लाख मोलाची होती.

चित्रग्रीवाची कथा त्याच्याच तोंडून ऐकणे सयुक्तिक होईल. कारण तुम्हाला माहीत आहे की जो स्वप्न पाहतो तोच स्वप्नातील अनुभव सांगू शकतो. चित्रग्रीवाची काही साहसे त्याच्याकडूनच ऐकू या!



"हिंदी महासागर अन् भूमध्य महासागराचं काळं पाणी पार करून आम्ही रेल्वेनं नवीन अशा प्रदेशातून जात होतो. तो जरी सप्टेंबर महिना होता तरी त्या प्रदेशात खूप थंडी होती. वाटत होतं की आम्ही हिमालयाच्या जवळ जात आहोत, अन् थोड्या वेळानं आम्हाला बर्फाच्छादित पर्वत शिखरं आणि प्रचंड वृक्षराजी दिसू लागेल. पाहतो तो क्षितिजावर टेकड्या दिसू लागल्या. त्यांची उंची बांबूच्या बेटापेक्षा अधिक नव्हती. मला समजेना की हा प्रदेश उंचावर नसताही इथं इतकी थंडी कशी?

"शेवटी आम्ही युद्धआघाडीवर पोचलो. परंतु तो पिछाडीचा भाग होता. तेथेही तोफांचा धूमधडाका ऐकू येत होता. अशा आग ओकणाऱ्या अनेक प्रकारच्या तोफा मला काही नवीन नव्हत्या. एकसारखी भुंकत राहणारी आणि अग्निवर्षाव करणारी ही पोलादी कुत्री मला कधी आवडली नाहीत. तेथील दोन दिवसांच्या वास्तव्यानंतर चांचणी परीक्षेच्या आमच्या उड्डाणाला सुरवात झाली. हिरा आणि माझ्याबरोबर कलकत्यातील आणखी चार कबुतरं निवडचाचणीसाठी आणली होती. हिराचा स्वभाव किती अवखळ आहे हे तुम्हास माहीत आहेच. आम्ही त्या मोठ्या गावातील घरावरून उडत असता—ज्या दिशेनं तोफांचा बूम-बूम-बूम आवाज येत होता तिकडं हिरा उडाला. ते काय चाललंय हे त्याला शोधून काढायचं होतं. एका तासाच्या अवधीत आम्ही तिथं पोचलो. बाप रे! कसला कानठळ्या बसविणारा आवाज तो! झाडाखाली दडवून ठेवलेल्या त्या पोलादी कुत्र्यांच्या मुखातून हीस् ऽ सुई ऽऽ असा आवाज येई आणि उडालेला गोळा दूर जमिनीवर आदळताच त्याचा प्रचंड स्फोट होई. त्यामुळे मी भ्यालो अन् उंच उंच उडू लागलो. पण तिथं तरी कसली शांतता लाभते! इतक्यात प्रचंड गरुड रोंरांवत आणि हत्तीच्या तुतारीसारखा आवाज करीत अवतीर्ण झाले. हे भयानक दृश्य पाहत पाहत जिथं महाजन आमची वाट पाहत होता तिथं पोचलो. परंतु गरुडांच्या जोडीनं आमचा पिच्छा पुरविला. म्हणून आम्ही अति वेगाने



उडत होतो. त्यामुळं त्या गरुडांना आम्हाला गाठता आलं नाही. अपेक्षा केल्याप्रमाणं ते गरुड आमच्या छावणीवर आले. वाटले, आपले दिवस भरले. पिंजऱ्यातील पक्ष्यांना भोट कुमारीनं खावं तसा ते आमचा चट्टामट्टा करणार! परंतु काय चमत्कार पाहा. त्यांचा घर् घर् आवाज बंद होऊन ते जमिनीवर मृतवत पडले. त्या पक्ष्यांच्या पोटातून प्रत्येकी दोन दोन माणसं बाहेर आली. अन् लगेच चालू लागली. मला आश्चर्य वाटत होतं की गरुडांनी या माणसांना कसं खाल्लं असेल! बरं खाल्लं तर ती आता जिवंत कशी बाहेर आली?

"निरोप पोचविण्याची कामगिरी आटोपताच त्या माणसांनी परत गरुडांच्या पोटात प्रवेश केला. गरुड पूर्ववत रोंरावू लागले. आणि पुन्हा झटक्यासरशी धावत हवेत उडाले. आता मात्र माझ्या मनात शंकाच राहिली नाही. ते गरुड म्हणजे माणसांचे अग्निरथ होते. तेव्हा कुठं मला हायसं वाटलं.

"सुरुवातीला सारं काही नवनवीन वाटे. त्या परिसराचा सराव झाल्यावर तसं वाटेनासं झालं. तोफेच्या सतत धूमधडाक्यात गाढ झोप येणं अशक्यच. आघाडीवरील त्या साऱ्या दिवसात मी सुखानं झोपू शकलो नाही. त्यामुळं आमची गत अंड्यातून नुकतेच बाहेर आलेल्या सापाच्या पिलासारखी झाली. भीतीनं आम्ही सतत चुळबुळ करीत असू.

"रिसालदाराकडून संदेश घेऊन तो आघाडीवर पोचविण्याची साहसी कामगिरी पहिल्या प्रथम मजकडं आली. आघाडीवरील वातावरण कधीच शांत नसे. पोलादी कुत्र्यांच्या मुखांतून रात्रंदिवस आगीचे गोळे आवाज करीत बाहेर पडत. इथं रिसालदाराविषयी मला थोडं सांगावं लागेल. कोलकाता येथील हिंदी सैनिकाचा तो मुख्य होता. चाळीस सैनिकांच्या तुकडी बरोबर तो आघाडीवरील खंदकाकडं कूच करीत होता. त्याच्याबरोबर काळ्या कापडांनी झाकलेले आमचे पिंजरे होते. काळ्या वस्त्रानं झाकलेल्या पिंजऱ्यात मला दिवस आणि रात्र सारखीच वाटे. मजल दरमजल करीत आम्ही ठाण्यावर पोचलो. पिंजऱ्याभोवती

गुंडाळलेलं आवरण काढण्यात आलं. आजूबाजूला तटबंदीशिवाय काही दिसत नव्हतं. तिथं पगडी घातलेले सैनिक कीटकाप्रमाणं सरपटत जात होते. आकाशात कळसूत्री गरुड मोठ्यानं रोंरावत उडत. इथं आजूबाजूनी विविध प्रकारचे आवाज कानी पडत असल्याची जाणीव मला प्रथमच झाली. कानठळ्या बसविणाऱ्या बूम, बूम, बूम आवाजाबरोबर इतर अनेक तोफांचा बारीक, मोठा आवाजही ओळखता येई. सैनिक मजविषयी कौतुकानं बोलायचे ते मात्र क्वचितच कानावर पडे. हिरवळीवरून गार वाऱ्याची झुळूक यावी तसं त्यांची कुजबुज ऐकून वाटे. त्यांच्या हातातील पोलादी कुत्र्यांचा भुंकण्याचा आवाज कितीतरी वेळ चालू होता. नंतर तरस या प्राण्याचा आवाज आला. शेकडो सैनिक हातात बंदुका घेऊन आगे कदम, आगे कदम म्हणत पुढे चाल करीत होते. आभाळात उडणाऱ्या यांत्रिक गरुडांच्या समूहाच्या कोलाहलीत सैनिकांच्या आरोळ्यासुद्धा ऐकू येईनाशा झाल्या. गरुड एकमेकांशी झुंजत. सैनिकांच्या नाना प्रकारच्या आरोळ्या, किंकाळ्या आक्रोश, आणि चमत्कारिक आवाज यांनी युद्धभूमी निनादली होती. मी रिसालदाराच्या स्वाधीन होतो. कळसूत्री पोलादी कुत्र्याचे मुख आकाशाच्या दिशेने रोखून त्यानं फैरी झाडायला सुरुवात केली. तसे ते गरुड खाली धपकन् पडले. आता आवाजातील तीव्रताही वाढली. बूम, बझूम--बझे च्या आवाजानं सारं आकाश पाताळ एक झालं. वाघ गजराजाच्या गर्जनेप्रमाणं सैनिकवृंदाच्या वाद्यांच्या ध्वनीनं साऱ्या दिशा भरून गेल्या. त्यावेळचा संमिश्र कल्लोळ आजही माझ्या कानात घुमतो.

''मृत्यूच्या अगदी कुशीतच सौंदर्य का असावं? त्या अलौकिक अशा दिव्य संगीतानं मी प्रभावित झालो. तोच कुलपी गोळ्यांचा आकाशातून वर्षाव होऊ लागला. बिळात पाणी प्रवेश करताच जसे उंदीर गुदमरून भीतीनं सैरावैरा पळतात तशी माणसं वाट फुटेल तिकडं धावत सुटली. रक्तबंबाळ झालेल्या परिस्थितीतही रिसालदारानं कागदाच्या एका कपट्यावर काहीतरी घाईनं खरडलं आणि ती चिठ्ठी माझ्या पायाला



बांधली, अन् मला पिंजऱ्यातून सोडून दिलं. त्याच्या डोळ्यातील वेदना आणि चिंता माझ्यापासून लपल्या नाहीत. उद्‌भवलेल्या भीषण प्रसंगाची खबर त्वरित महाजनापर्यंत पोचवून या बिकट संकटात मदत आणावी अशी त्याची अपेक्षा होती.

''स्वामी, तुम्हाला माहिती आहेच. मी लगेच उंच उडालो. खंदकाच्या वरच्या भागात अग्निज्वालांचं थैमान पसरलं होतं. ते दृश्य पाहिल्यावर माझ्या पंखातून जणू बळच निघून गेलं. त्यातून कसं बाहेर पडावं ही माझी एक समस्या होती. यासाठी मी दाही दिशा धुंडाळल्या. परंतु कुठल्याही दिशेला गेलो तरी आगीच्या लक्षावधी भीषण जिभा जणू माझा ग्रास घेण्यास आतुर होत्या, या जीवनाच्या मार्गावर विनाशाचा रक्तरंजित पट विणला जात होता. हा कपोताचा बच्चा चित्रग्रीव कसली हार मानतोय? इतक्यात अवचितपणं मी हवेच्या भोवऱ्यात सापडून एखाद्या पानाप्रमाणं अलगद उंच उडत गेलो. मोठ्या प्रयत्नानं मी कसातरी अग्नीच्या पटातून बाहेर पडलो. पट विणण्याचं नियतीचं कार्य वेगानं चालू होतं. परंतु माझं लक्ष कशाकडंच नव्हतं. मी सारखा महाजनाचा धावा करीत होतो. महाजन हे नाव उच्चारताच माझ्या अंगात सामर्थ्याचा संचार होऊन मी अंतरिक्षात उड्डाण केलं. आजूबाजूला दृष्टिक्षेप केला अन् पश्चिमेकडं झेपावलो. इतक्यात बंदुकीच्या गोळीनं माझ्या शेपटीचा वेध घेतला. त्या काळाग्नीमुळं माझं अर्धं शेपूट गळून पडलं. त्यामुळं माझा क्रोध अनावर झाला! माझं पुच्छ म्हणजे माझं भूषण होय. त्याला स्पर्श केलेला मी कसा सहन करू शकेन? असो. मी कसातरी सुरक्षित पोचलो. त्याक्षणी मी खाली झेप घेण्याच्या तयारीत असताना वरच्या दिशेला दोन गरुडाचं युद्ध जुंपलं. ना मी त्यांचं रोंरावणं ऐकलं, ना त्यांच्याकडं दृष्टीक्षेप केला. आपसात लढून ते मेले असते तरी त्याची मला पर्वा नव्हती. परंतु त्यांनी माझ्यावर अग्नीचा वर्षाव सुरु केला. जितक्या आवेशानं ते लढत होते तितक्याच गतीनं त्यांच्या मुखातून ज्वाला निघत होत्या. शेवटी मी खाली जेवढी डूब घेता येईल

तेवढी घेतली. तिथं थोडी झाडं असली तर बरं झालं असतं. तशी तिथं ती होतीच. परंतु कुलपी गोळ्यांच्या वर्षावानं त्यांची छतं उध्वस्त झाली होती. त्यावर ना आधार देणाऱ्या फांद्या होत्या, ना सावली देणारी पालवी. जंगलातील हत्ती एखाद्या माणसाचा पाठलाग केल्यावर तो जसा झाडं चुकवत सैरावैरा धावतो तसं त्या उंच बुंध्यांना टाळण्यासाठी मला वक्र गतीनं उडावं लागत होतं. शेवटी एकदाचा घरी पोचताच मी महाजनाच्या मनगटावर बसलो. पायाची दोरी कापून मजसकट तो संदेश त्यानं सेनापतीकडं नेला. त्यावेळी तो सेनापती एखाद्या पिकल्या चेरी फळासारखा वाटला. त्याच्या अंगाला साबणाचा सुगंध येत होता. कदाचित तो दिवसातून तीन-चार वेळा तरी साबण लावून आंघोळ करीत असावा. रिसालदारानं लिहिलेला संदेश वाचून त्यांनी माझी पाठ थोपटली अन् एखाद्या पुष्ट वृषभाप्रमाणं डरकाळी मारली."



## दुसरे साहस



"रिसालदाराच्या जखमा बऱ्या झाल्यावर त्यानं पुन्हा आम्हाला आघाडीवर नेलं. या खेपेस माझ्याबरोबर हिरादेखील होता. मी मनोमन जाणलं की यावेळेचा संदेश इतका महत्वाचा आहे की आम्हा दोघांना तो एकाच वेळी घेऊन जायचा होता. कारण असं की एखादा तरी संदेश निश्चित पोचेल. बाहेर इतकी कडाक्याची थंडी होती की मला वाटलं आपण बर्फाळ प्रदेशातच आहोत की काय? पाऊस सारखा कोसळत होता. जमिनीतून दुर्गंधी येत होती. प्रत्येक पावलागणिक पाय तिथल्या दलदलीत फसत. ते इतके गार पडत की तुम्ही एखाद्या प्रेतावर चुकून पाय ठेवला की काय?

"आता आम्ही एका नवीन ठिकाणी पोचलो. तो खंदक नव्हता तर खोलगट भागात वसलेलं गाव होतं. सारा गाव आगीत होरपळून उध्वस्त झालेला. परंतु तेथील नागरिकांच्या चेहऱ्यावरील दुर्दम्य आशावाद पाहून वाटे की ते अत्यंत पवित्र आणि महत्त्वाचं गाव शत्रूच्या हाती लागू द्यायचं नव्हतं. गावांतील सारी घरंदारं आगीच्या भक्षस्थानी पडली होती. हे खुलं अवकाश पाहून मला आनंद झाला. सारं क्षितिज धरतीला टेकलेलं. दवाचे थेंब थंडीनं गोठून हिम झालेले. जिकडं तिकडं पांढरे

भूखंड दिसायचे. तिथं मात्र अजूनही कुलपी गोळ्यांचा स्पर्श न झालेला. वादळानं पाखरांची घरटी जशी उध्वस्त व्हावीत तसा तोफेच्या भडिमारानं आणि बंदुकीच्या फैरीमुळं सारा गाव जमीनदोस्त झालेला. घुशी एका बिळातून दुसऱ्या बिळाकडं जाताना दिसत. उंदीर खाद्यपदार्थावर तुटून पडत. कीटक पकडण्यासाठी कोळी नव्यानं जाळी बांधत होते. निसर्गात कसलंही परिवर्तन झालेलं दिसत नव्हतं. परंतु माणसं मात्र एकमेकांची हत्या करीत होती. एकमेकांच्या जीवावर उठली होती. त्यांना आपल्या दुष्कृत्यांचं काहीच वाटत नव्हतं.

''काही वेळानं तोफेच्या गोळ्यांचा वर्षाव बंद झाला. राहिलेलं गाव आता तरी विनाशापासून वाचेल काय? बाहेर काळाकुट्ट अंधार पडलेला. आभाळ इतकं खाली आल्यासारखं वाटत होतं की त्याला चोचीनं सहज स्पर्श करता आला असता. एवढ्या थंडीमुळं माझ्या पंखाची पिसंदेखील गारठलेली होती. वेदना तर इतक्या होत होत्या की ती सारी पिसं उपटून टाकावीत. अशा वातावरणात आम्हाला पिंजऱ्यात बसणं देखील शक्य नव्हतं. अंगाला उब यावी म्हणून मी हिराला बिलगलो.

''पुनश्च बंदुकीच्या फैरी झडू लागल्या. यावेळी मात्र चोहोकडून आगीचा वर्षाव होत होता. शत्रूंनी वेढा दिलेल्या एखाद्या बेटासारखं आमचं गाव दिसत होतं. सारं काही धुक्यानं अवगुंठित झालेलं. पिछाडीकडून शत्रूंनी आमचं दळणवळण तोडलं. नंतर त्यांनी आकाशातून जणू रॉकेटचा पाऊसच पाडला. दुपारची वेळ. तरीही सर्वत्र थंडगार आणि ओलसर वाटे. हे पाहून मला हिमालयातील रात्रींची आठवण होई. रात्र झाली हे माणसांना कसं कळत असेल? अर्थात पक्ष्यांपेक्षा माणसाला समजच कमी.

''हिरा आणि मला संदेश देऊन सोडण्यात आलं. आम्ही उंच उडालो. परंतु काही अंतर गेल्यावर मात्र दाट धुक्यात सापडलो. आम्हाला काहीही दिसत नव्हतं. असं काही घडेल हे मला अपेक्षितच होतं. अशा परिस्थितीत युद्धाच्या आघाडीवर अथवा हिंदुस्तानात जे



काही करणं शक्य होतं ते मी केलं. मी उंच उडू लागलो. एकावेळी फुटापेक्षा अधिक उंच जाणं शक्य नव्हतं. माझे पंख ओले झाले. मला श्वास घेता येईना. एकसारख्या शिंका येत होत्या. वाटलं कुठल्याही क्षणी मी जागच्या जागी मरून पडेन. तोच मला काही हातांवरचं दिसू लागलं. मी आमच्या कपोत कुलाच्या देवतेचे आभार मानलं! मी वर वर जात होतो. आता माझे डोळे चुरचुरू लागले. आंधळा होण्यापासून बचाव करण्यासाठी आता मी लगेच डोळ्यांच्या आतील पडदे ओढून घेतले. खरं म्हणजे ते धुकं नव्हतंच. दुर्गंधी असणारा, डोळ्यांना हानीकारक असा तो धूर माणसांनीच सोडला होता. कुणी तरी सुया टोचाव्यात तशा वेदना माझ्या डोळ्यांत होऊ लागल्या. डोळ्यांवर पडदे ओढून आणि दम रोखून मी वर वर जाण्यासाठी धडपडत होतो. माझा सोबती हिरादेखील उंच उडत होता. त्या विषारी वायुमुळं त्याचा जीव कासावीस होत होता. त्या विषारी वायुच्या पातळीवर आम्ही मजल मारली. इथं मात्र हवा शुद्ध होती. डोळ्यांवरचे पटल बाजूला सारताच मला दूर क्षितिजापर्यंत दिसत होतं. त्याच बरोबर आमच्या छावणीचा तळही दृष्टीस पडला. त्या दिशेनं आम्ही उडू लागलो. अर्धेअधिक अंतर उडून गेलो असू तोच एक भयंकर गरुड आमच्या मागं लागला. त्याच्या सर्वांगावर काळे पट्टे होते. तो आमच्याच रोखानं येत होता. आम्ही खाली डूब घेऊन मोठ्या शिकस्तीनं त्याच्या पिछाडीस आलो. तिथं मात्र यांत्रिक गरुडाचं काही चालेना. त्याच्या शेपटीवरून आम्ही उडत होतो. ते कसं याची कल्पना केलेली बरी. तो मात्र हतबल होता. तो गोल घिरट्या घालू लागला. आम्ही लगेच त्याचं अनुकरण केलं. त्यानं कोलांट उड्या घेतल्या. आम्ही देखील तशाच उड्या घेतल्या. सुकाणू गरजेप्रमाणं वळवता न आल्यामुळं त्याचा निरुपाय झाला. खऱ्या गरुड पक्ष्याला शेपटी पाहिजे तशी वळवता येते. यांत्रिक गरुडाची शेपटी ताठ होती. आम्हाला जाणीव होती की त्याच्यापुढं गेलो की आम्ही मारले जाऊ.

''संदेश घेऊन जायला आम्हाला विलंब होत होता. त्या यांत्रिक

गरुडाच्या शेपटीमागं फार वेळ दडून राहणं शक्य नव्हतं. जे गाव आम्ही मागं सोडलं होतं ते विषारी वायुनं व्यापलं होतं. आमचा मित्र रिसालदार तिथंच होता. त्यांना वेळेवर कुमक जावी म्हणून त्वरा करणं आवश्यक होतं.

"इतक्यात त्या यांत्रिक गरुडानं एक चाल केली. तो तोंड वळवून त्याच्या छावणीच्या दिशेनं उडू लागला. त्याच्या मागे जाऊन आयतेच शत्रूच्या हाती सापडण्याची आमची इच्छा नव्हती. आमच्या तळापासून अर्ध्या वाटेवर आणि कक्षा रेषेच्या आत आलो होतो. धोका स्वीकारून आम्ही उलट वळलो, अन् अतिशय वेगानं आमच्या तळाच्या दिशेनं उडू लागलो. पंख हवेत मारीत प्रत्येकवेळी उंच उंच जात होतो. आम्ही वळलेलं पाहून त्या यांत्रिक गरुडानेही पलटी मारली आणि तो आमचा पिच्छा करू लागला. परंतु वळण घ्यायला त्याला बराच वेळ लागला. आम्ही योग्य त्या दिशेनं उडत होतो. आम्ही ज्या उंचीवरून उडत होतो ती पातळी त्यानं गाठली, अन् तो आमच्यावर गोळ्यांचा वर्षाव करू लागला. त्या फैरी चुकवण्यासाठी आम्हाला खाली डुबी घ्यावी लागली. माझ्या खालच्या अंगानं उडायला हिराला सुचवलं. त्यामुळं त्याला संरक्षण मिळालं. आम्ही मार्ग आक्रमत होतो. परंतु दैव कुणी जाणलं आहे! कुठून तरी एक यांत्रिक गरुड आला अन् त्यानं शत्रूवर फैरी झाडायला सुरवात केली. आम्हाला खूप सुरक्षित वाटलं. आता हिरा आणि मी बरोबरीनं उडू लागलो. माझ्या दिशेनं सूं-सूं करीत आलेल्या गोळीनं हिराचे पंख तुटले. बिचारा घायाळ हिरा! एक गिरकी घेऊन एखाद्या चंदेरी पानासारखा तो हवेतून आमच्या नियंत्रण रेषेत पडला. त्याला धारातीर्थी पडलेला पाहून मी विजेच्या वेगानं उडू लागलो. त्या दोन गरुडांमध्ये चाललेल्या झुंजीकडं चुकूनही मी वळून पाहिलं नाही.


मी जेव्हा छावणीत पोचलो तेव्हा मला सेनापतीकडं नेण्यास आलं. त्यानं माझी पाठ थोपटली. नंतर मला प्रथमच जाणवलं की मी त्यांच्या दृष्टीनं किती महत्त्वपूर्ण संदेश आणला आहे. कारण त्यांनी तो मजकूर



वाचता क्षणी शिंगासारखी दिसणारी वस्तू उचलली आणि त्यातून करड्या आवाजात हुकूम सोडले. नंतर महाजनानं मला पिंजऱ्यात नेऊन ठेवलं. तिथं बसल्या बसल्या मला हिराची आठवण आली. तोच भूकंप होत आहे की काय असं वाटलं. यांत्रिकी गरुड एखाद्या टोळधाडीसारखे उडत होते. ते रोंरावत होते. तसंच अनेक पोलादी कुत्री गुरगुरत होती. जंगलातल्या एखाद्या पिसाळलेल्या वाघासारखी गर्जना करीत तोफांचा भडिमार होत होता. माझ्या मस्तकावरून हात फिरवत महाजन म्हणाला, "चित्रग्रीवा, तू आजचा दिवस आमचा बचाव केलास." परंतु समोर तर दिवस दिसत नव्हता. सारं आभाळ धुरांच्या लोटांनी भरलं होतं. त्याखाली मृत्युचं थैमान माजलं होतं. मरणोन्मुख पडलेल्या सैनिकांच्या किंकाळ्या, आरोळ्या, आणि आक्रोश ऐकू येत होता. जिकडं तिकडं हाहाकार उडाला होता. सारं काही वाईट घडत होतं. दुसऱ्या दिवशी सकाळी मी सरावासाठी तळावरून उडताना कबुतरखान्यापासून मैलभर अंतरावर युद्धभूमीची भीषणता दिसत होती. तोफेच्या गोळ्यांच्या कवचांचा खच पडला होता. घुशीउंदरांची देखील या भयंकर हत्याकांडातून सुटका झाली नव्हती. शेकडोंची त्यात कत्तल झाली होती. तो विध्वंस बघवत नव्हता! माझं मन उदास झालं. माझा मित्र हिरा देखील मला सोडून गेला. मला विलक्षण एकटं आणि उदासीन वाटू लागलं!"



## सर्वेक्षणासाठी महाजनाचे प्रयाण



डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात महाजनाने चित्रग्रीवाच्या सोबतीने सर्वेक्षणाची मोहीम हाती घेतली. यासाठी इप्रं, आर्मेतिए आणि हाजब्रुक या प्रदेशानजीक असलेल्या जंगलाची त्याने निवड केली. आपण जर फ्रान्स देशाचा नकाशा घेतला आणि त्यावर कॅले शहरावरून खाली दक्षिणेकडे एक सरळ काल्पनिक रेषा ओढली तर त्या कक्षेत जवळपास ब्रिटिश आणि हिंदी सैनिकाच्या छावण्या होत्या. आर्मेतिए भागात तर हिंदी सैन्यातील अनेक मुसलमान सैनिकांच्या कबरी दिसून येतात. पुरातन काळापासून हिंदू लोक मृतांना अग्नी देत असल्यामुळे त्यांची थडगी मात्र तिथे नव्हती. मृत देह जाळल्यानंतर त्या राखेचे अवशेष सर्व दिशांना उधळले जात. त्यामुळे कुठलीही जागा त्यांच्या स्मारकासाठी ठेवली जात नसे. असो.

हाजब्रुक जवळच्या जंगलात महाजन आणि चित्रग्रीवाला पाठविण्यात आले. हे क्षेत्र शत्रूपक्षाच्या नियंत्रण रेषेच्या पिछाडीस होते. याच भागात जमिनीखाली शत्रूच्या शस्त्रास्त्रांचा आणि दारूगोळ्यांचा प्रचंड साठा होता. तो शोधून काढण्याची जबाबदारी महाजन आणि चित्रग्रीवावर संयुक्तपणे अथवा स्वतंत्रपणे सोपविली होती. त्याचा शोध घेऊन संबंधित क्षेत्राचे नकाशे तयार करून महाजनाला ब्रिटिश सैनिकांच्या छावणीवर परतायचे होते.

डिसेंबर महिन्यातील एका सकाळी चित्रग्रीवाला विमानातून नेण्यात आले. वीस मैल परिसरातील जंगलात ते विमान उडत होते. त्यातील बरेच क्षेत्र हिंदी सैन्यांच्या ताब्यात होते. बाकी क्षेत्रावर जर्मन सैन्यांचा अधिकार होता. जर्मन छावणीच्या नियंत्रणकक्षेपलीकडे गेल्यावर चित्रग्रीवाला आकाशात सोडण्यात आले. साऱ्या जंगलावरून उड्डाण करतांना तिथल्या भूपृष्ठावरील ठळक वैशिष्ट्ये लक्षात ठेवून तो परत तळावर आला. त्यामुळे त्याला येण्याजाण्याच्या मार्गाची माहिती होऊन आपल्याला कोणती कामगिरी पार पाडायची याची कल्पना आली.

सूर्य मावळतीला गेला तेव्हा सायंकाळचे चार वाजले होते. महाजनाने अंगावर उनी कपडे चढविले अन् चित्रग्रीवाला कोटाखाली दडविले. ॲम्बुलन्सच्या वाहनातून घनदाट जंगलात असलेल्या हिंदी सैन्यांच्या दुसऱ्या नियंत्रण रेषेपर्यंत गेले. हेरगिरी करणाऱ्या काही लोकांच्या मार्गदर्शनाखाली ते रात्रीच्या काळोखातून वाटचाल करीत होते.

पुढे कोणाचेच नियंत्रण नसलेल्या क्षेत्रात त्यांनी प्रवेश केला. सुदैवाने तो जंगलाचाच प्रदेश होता. कुलपी गोळ्यामुळे अजूनही तिथल्या झाडांचा नाश झालेला नव्हता. महाजनाला फ्रेंच किंवा जर्मन भाषेचे ज्ञान नव्हते. 'होय,' 'नाही' किंवा 'ठीक आहे' या पुरतेच त्याला इंग्रजी अवगत होते. जर्मन सैन्याने दडवून ठेवलेल्या दारूगोळ्यांचा साठा या जंगलातील परिसरातून शोधून काढावयाचा होता. त्याच्या सोबतीला होते फक्त एक कबुतर. तेदेखील त्याच्या कोटाआड गाढ झोपले होते.

तेथील हवामान हिमालयासारखेच थंड होते याची त्याला आठवण झाली. हिवाळ्यात तेथील झाडांची पानगळ होऊन जमिनीवर पाचोळ्याचा ढीग पडतो. अन् त्यावर पडलेल्या दंवाचे हिम होते. झाडाझुडपांवर अगदी विरळ पाने होती. त्यामुळे लपत छपत जाणे अवघडच होते.

जिकडे तिकडे किर्रर अंधार अन् मी म्हणणारी थंडी. इतरजणांपेक्षा महाजनाला अंधारातही चांगलेच दिसे. आणि इतर कुठल्याही वन्यप्राण्यापेक्षा वासाविषयीच्या त्याच्या संवेदना अधिक तीव्र होत्या. कोणाचेही नियंत्रण नसलेल्या प्रदेशातून वाट कशी काढायची याचे पुरते ज्ञान त्याच्याकडे होते. सुदैवाने त्या रात्री वारा पूर्वेकडून वाहत होता.

झाडांच्या बुंध्या बुंध्याआडून तो जलद वाटचाल करीत होता. काही वेळेपूर्वी जर्मन सैनिकाच्या कंपनीने याच मार्गाने वाटचाल केली असल्याचे त्याच्या ध्यानी आले. एखाद्या बिबट वाघाप्रमाणे तो झाडावर चढून बसे आणि सैनिक निघून जाण्याची वाट पाही. त्या जाणाऱ्या सैनिकांना महाजनाची अजिबात चाहूल लागली नाही. मात्र दिवसा त्यांनी त्याला सहज शोधून पकडला असता. कारण तो हिमावरून अनवाणी चालत असल्याने त्याच्या पायातून रक्त ठिबकत होते. त्याच्या खुणा बर्फावर ठिकठिकाणी दिसत होत्या.

एकदा तर संकट त्याला चाटून गेले होते. दोघा जर्मन पहारेदारांच्या तावडीतून सुटण्यासाठी तो लगेच झाडाच्या फांदीवर चढून बसला. तिथे बसला असता कुणीतरी त्याच्या कानात कुजबुजले. हळू आवाजात पुटपुटणारा माणूस जर्मन सैनिक असल्याचे त्याने हेरले. परंतु ऐकताना महाजनाने डोके खाली केले होते. जर्मन सैनिक हळू आवाजात म्हणाला, "शुभरात्र *(गुट् नाख्ट)*". नंतर तो लगेच झाडावरून सरसर खाली उतरला. त्याला वाटले महाजन म्हणजे आपली सुटका करण्यासाठी आलेला आपलाच सैनिक असावा. काही वेळाने महाजन खाली उतरला. जर्मन सैनिकांच्या पायांच्या ठशांचा मागोवा घेत तो अंधारातून अनवाणी चालू लागला. असे काम त्याला कधीच अवघड नव्हते.

शेवटी तो अशा ठिकाणी पोचला की तेथे बरीच माणसे तात्पुरता तळ देऊन राहत होती. त्यांना टाळून त्याला सावकाश पण पुढे पुढे लपत छपत जावे लागत होते. इतक्यात त्याच्या पायानजीक विचित्र असा आवाज आला. तो लगेच थांबला. कानोसा घेऊन आवाज ऐकू



लागला. चाड-चूड-चाड-चूड असा पायरव येत होता. तो चाहुलीच्या दिशेने जात होता. इतक्यात दबक्या आवाजात त्याला कुंई-कुंई असे ऐकू आले. हा आवाज तर त्याच्या ओळखीचा होता. त्याची त्याला भीती तर मुळीच वाटली नाही. परंतु त्या परिचित आवाजाने त्याला आनंदच झाला. हिंदुस्तानातील वाघाने भरलेल्या जंगलात त्याने अनेक रात्री घालविल्या होत्या. परंतु त्याला रानकुत्र्याच्या शिळेची कधी भीती वाटली नाही. लगेच त्याला दोन तांबडे डोळे दिसले. एकाच ठिकाणी उभे राहून त्याने हुंगल्यासारखे केले. तेव्हा काय आश्चर्य, तो वास कुत्र्याचा होता. अन् तो रानटी अवस्थेत होता. कुठला आगंतुक प्राणी समोर उभा आहे याची खात्री करण्यासाठी कुत्रादेखील वास घेत होता. भ्यालेल्या माणसाचा वास त्याच्या अंगातून येत नव्हता, म्हणून ते जनावर पुढे येऊन त्याच्या पायांना आपले अंग घासत त्याचा वास घेत होते. महाजनाने आपल्या हातातील चित्रग्रीवाला त्याच्या नाकासमोर धरले. हवेतून येणाऱ्या गंधावरून ते पाखरू असल्याचे कुत्र्याच्या ध्यानी आले. तोच त्या कुत्र्याला समोर निर्भयपणे उभा असलेला मित्रच दिसला. तो शेपूट हालवीत कुंई-कुंई आवाज करीत होता. त्याच्या डोक्यावरून हात फिरविण्याऐवजी त्याने हात कुत्र्यासमोर केला. क्षणभर त्याला वाटले हा हाताला चावणार तर नाही ना? काही क्षण गेले. नंतर कुत्र्याने पुढे केलेला हात चाटला. अन् आनंदाने कूंऽ कूंऽ करू लागला. महाजन स्वतःशीच म्हणाला, "हे सारं असं आहे तर! या शिकारी कुत्र्याला कोणी वाली दिसत नाही. कदाचित् त्याच्या मालकाचा मृत्यू झाला असावा. बिचारा तो आता लांडग्यासारखा रानटी अवस्थेत जगत आहे. जर्मन सैनिकांकडून जो घास तुकडा मिळतो त्यावर तो गुजराण करीत असल्यामुळं त्याला अद्यापि माणसाच्या मांसाची चटक लागली नाही, म्हणून बरं."

हळू आवाजात त्याने शीळ घातली. 'छा-छौ' ही शिकाऱ्यांची भाषा. कुठल्याही देशात जा, ती सारखीच आहे. 'छा' म्हणजे सावधान! 'छौ'

म्हणजे, 'पुढे जा'. गुहेतील वाघाची नजर चुकवून जसे सांबर पसार होते तसा महाजन जर्मन छावणीकडे कडेने जात होता. अनेक घंट्यांच्या वाटचालीनंतर ते आपल्या ठिय्यावर पोचले ती जागा त्याने निश्चितपणे हेरली होती. या जमिनीखालच्या आगारात नुसताच दारूगोळा नव्हता तर जर्मनांची अन्नसामग्रीही होती. पुढे चालत असलेला तो रानकुत्रा रहस्यमय अशा एका बिळात शिरला. अन् अर्ध्या एक तासाने एका वासराची तंगडी तोंडात धरून तो बाहेर आला. त्या गुराच्या मांसाची दुर्गंधी येत होती. हिम असलेल्या जागेवर बसून कुत्र्याने खाणे चालू केले. आता तर महाजनाची खात्रीच झाली की याच ठिकाणी जर्मनांची सारी रसद जमिनीखाली पुरून ठेवली असावी. रात्रभर खांद्यावर एखाद्या पडशीप्रमाणे टाकलेले बूट त्याने पायात चढविले. वर खाली पाहून आजूबाजूचे निरीक्षण केले. ग्रहनक्षत्रांच्या आधारे आपण कोठे आहोत हे त्याला ओळखता येई. तिथेच तो काही वेळ थांबला.

हळूहळू दिवस उजाडू लागला. त्याने खिशातून कंपास काढला. आपण या जागेचा अचूक नकाशा काढू शकू असा त्याला विश्वास होता. इतक्यात त्या कुत्र्याने उडी मारून महाजनाचा कोट तोंडात धरला. आता तर त्याच्या मनांत किंचितही संशय राहिला नाही की कुत्रा आपणाला पुढे नेऊ इच्छितो. तो पुढे पुढे धावत होता, तर महाजन त्याच्या मागे पळत सुटला. इच्छित स्थळी पोचल्यावर असे आढळून आले की सारे क्षेत्र काटेरी झुडपांनी आणि थंडगार वेलींनी आच्छादलेले आहे. त्या जाळीतून एखाद्या श्वापदालाच प्रवेश करणे शक्य होते. त्या काटेरी जाळीत सरपटत कुत्रा नाहीसा झाला.

खिशातून कागद काढून आता महाजन नकाशा काढू लागला. आकाशात रात्री तारे कुठे कुठे होते त्यांच्या जागा नकाशात दाखविल्या. कंपासच्या साहाय्याने दिशाही निश्चित केल्या. नंतर तो नकाशाचा कागद घडी करून चित्रग्रीवाच्या पायात बांधून त्याला आकाशात उडविले. कबुतर एका झाडावरून दुसऱ्या झाडावर उडत, थांबत, आणि



चोचीने अंगावरची पिसे साफ करीत जात असल्याचे महाजन पाहत होता. त्यानंतर पायात बांधलेली संदेशाची चिठ्ठी घट्ट बांधली की नाही हे त्याने चोचीने ओढून खात्री केली. मग उडत उडत तो सर्वात उंच अशा झाडावर बसला. तेथून त्याने आजूबाजूच्या भूक्षेत्राची टेहेळणी केली. महाजनाचे सारे लक्ष चित्रग्रीवाकडे असताना कुणीतरी आपला कोट ओढत असल्याचा त्याला भास झाला. त्याचे लक्ष पायाकडे गेले. त्याला खेचत काट्यांखालच्या बिळाकडे नेण्याचा त्या कुत्र्याचा इरादा दिसला. कुत्र्याच्या मागे मागे जाताना महाजनाला देखील भुईसपाट होऊन सरपटत जावे लागले. तोच वरून पंखांची फडफड ऐकू आली. त्या पाठोपाठ बंदुकीच्या फैरीचा आवाज कानावर पडला. चित्रग्रीव हेच त्यांचे लक्ष्य होते. तो जिवंत आहे की मारला गेला हे पाहण्यासाठी देखील वेळ नव्हता. काट्यांखालून वाट काढताना त्याचे पोट पाठीला लागले होते. अशा रितीने वाटचाल करताना अकस्मात तो आठ फूट खोल असलेल्या खड्यात पडला. तिथे काळाकुट्ट अंधार असल्याने नेमके आपण कुठे आहोत हे काही त्याच्या लक्षात येईना. जखम झालेल्या डोक्यावरून तो हात फिरवीत होता.

कोठे आहोत याचा शोध तो घेत असता त्याला आढळून आले की आपण गोठलेल्या पाणझरीत बसलेलो आहोत. दरवडेखोरांची गुहा जशी काटेरी जाळीमुळे प्रवेश करण्यास कठीण असते तसे ते स्थळ होते. हिवाळ्याचे दिवस. वृक्षवेलींची पानगळ होऊनही त्या खड्ड्याच्या तळात भर दिवसादेखील मिट्ट काळोख होता. अजूनही कुत्रा त्याच्या सोबतीला होताच. त्याने महाजनाला सुरक्षित ठिकाणी ओढत आणले. आपणाला सोबती मिळाला याचा आनंद त्या बिचाऱ्या प्राण्याला झाला होता. त्याला त्याच्याबरोबर खेळायचे होते. परंतु महाजनाला मात्र झोप येत होती. बसल्या बसल्या डुलकी घेत घेत तो गाढ निद्रेच्या आधीन झाला. आजूबाजूला बंदुकीच्या फैरीचा आवाज येत होता. परंतु त्या आवाजाचा त्याच्या झोपेवर काहीच परिणाम झाला नाही.

तीन एक तासानंतर कुत्रा कुंई-कुंई-कुंई आवाज करीत एखाद्या पिसाळलेल्या प्राण्यासारखा भुक भुक करू लागला. तोच प्रचंड स्फोटामुळे सारी जमीन विलक्षण हादरू लागली. भीतीने थरथर कापत तो महाजनाला बिलगला. एका पाठोपाठ एक असे स्फोटांचे धाड-धुडूम, धाड-धुडूम कानठळ्या बसविणारे आवाज होत होते. महाजन बसला होता ती जागा तर झोक्यासारखी आंदोलत होती. परंतु ती जागा आता त्याला सोडता येत नव्हती. तो स्वतःशीच म्हणाला, ''बाबा चित्रग्रीवा! तुझ्यासारख्या पाखराला कशाचीच तुलना नाही. किती निष्ठेनं तू आपलं कर्तव्य पार पाडलंस. लालबुंद चेहरा असलेल्या सेनापतीला संदेश पोचविलास. अन् हा येत असलेला धूम-धडाका त्याचं उत्तर आहे. पक्षिकुलातील रत्न तू शोभतोस,'' असे कितीतरी वेळ तो बडबडत होता. आभाळातील विमानातून जर्मनांची रसद असलेल्या आगारावर भडिमार होत होता.


कुत्रा कोटाची बाही धरून महाजनाला दूर ओढण्याचा प्रयत्न करीत असताना तो कुंई-कुंई करीत अंगात ताप भरल्यासारखा थरथर कापत होता. इतक्या फुक् फुक् आवाज करीत काहीतरी धाडकन् जवळच पडले. लपलेल्या जागेतून बिचारा कुत्रा केंकाटत बाहेर पडला. त्याच्या पाठोपाठ महाजनही बाहेर येत होता. परंतु त्याला खूप उशीर झाला होता. काटेरी झुडपातून सरपटत येत असता अर्ध्या वाटेतच कानठळ्या बसविणारा भीषण स्फोट होऊन खालची जमीन दुभंगली. महाजनाच्या खांद्यातून असह्य वेदना येऊ लागल्या. एखाद्या राक्षसी शक्तीने उचलून फेकून द्यावे तसे त्याला वाटले. डोळ्यासमोर काही क्षण तांबड्या प्रकाशाचे नृत्य चालू होते. त्यानंतर ते थांबले. पुनश्च जिकडे तिकडे किर्रर अंधार पडला.

शुद्धीवर आल्यावर हिंदुस्तानी भाषेत कुणीतरी बोलत असल्याचा आवाज त्याच्या कानी पडला. आपल्या मायबोलीचा आवाज स्पष्ट ऐकू यावा म्हणून त्याने आतुरतेने आपले डोके किंचित उचलले. तोच



लक्षावधी नाग डसावेत अशा असह्य वेदना त्याला होत होत्या. घडलेल्या स्फोटात तो गंभीरपणे जखमी झाल्याचे आता सावकाश त्याच्या लक्षात येत होते. अशाही अवस्थेत मायबोलीचा आवाज कानावर येत आहे हे पाहून क्षणैक त्याला वेदनांचा विसर पडला. आता त्याला वाटले आपण शत्रूच्या नव्हे, तर आपल्याच माणसाच्या छावणीत आलो आहोत. हे जंगल आता आपल्याच सैन्यांच्या ताब्यात आहे. ''हुश्श!'' तो स्वतःशीच म्हणाला, ''मी आपलं कर्तव्य केलं. आता मी शांतपणं मरायला मोकळा झालो.''

## चित्रग्रीवाने संदेश कसा नेला (आत्मपुराण)



"हे सारं महाभारत घडण्याच्या आदल्या दिवशीची गोष्ट. मला झोप येत नव्हती. जरी महाजनाच्या कोटाखाली होतो तरी मी जागा आहे हे त्याला माहीत नव्हतं. जो माणूस हरणासारखा धावतो, खारीसारखा झाडावर चढतो किंवा भटक्या कुत्र्याला जवळ करतो त्याच्याजवळ झोपणं शक्य नाही. त्याच्या हृदयाची धडकन इतक्या जोरात होत असे की ती कैक हातांवर सहज ऐकू येई. त्याच्या सहवासात न झोपण्याला आणखीन् एक कारण होतं. रात्रभर त्याच्या घोरण्याचा आवाज येई. कधी मांजराच्या तावडीतून वेगानं उंदीर सुटून जावा तसं घोरणं ऐकू येई. अशा माणसाच्या कोटाखाली झोपण्यापेक्षा वाऱ्यावादळात देखील मी सुखेनैव झोपलो असतो.

"अन् तो कुत्रा! त्याला मी विसरणं कधीतरी शक्य आहे काय? महाजनानं एकदा मला त्याच्यासमोर धरलं. तरी बरं, त्याला माझा वास आला नाही. परंतु हवेतून त्याची दुर्गंधी येत होती. अन् तो आला होता आमच्याशी दोस्ती करायला. त्याच्या पावलांची हळुवार सावट तर मला आयुष्यभर विसरणं शक्य नाही. तो एखाद्या मांजरासारखा हळू चालायचा. तो रानटी झालेला कुत्रा असावा. कारण माणसांच्या सहवासात राहणारी कुत्री कधीच शांत नसतात. त्यांना सावकाश चालतादेखील येत नाही. माणसांची सोबत प्रत्येक प्राण्याला दुर्गुणी करीत असते. याला अपवाद मांजर. इतर प्राणी मात्र त्यांच्या संगतीत निष्काळजी आणि मोठ्यानं आवाज करणारे होतात. परंतु हा कुत्रा रानटी झालेला होता. तो कसलाही आवाज न करता चाले. त्याच्या श्वासाचादेखील आवाज येत नसे. मग त्याच्या अस्तित्वाची जाणीव मला कशी व्हावी? जमिनीवरून येणाऱ्या त्याच्या वासामुळं मला त्याचा सुगावा लागे.

"माझी सारी रात्र बेचैनीत गेली. दुसऱ्या दिवशी महाजनानं मला सोडून दिलं. कुठं सोडलं हेच मला उमजेना. दिशांचं ज्ञान होण्यासाठी मी एका झाडावरून दुसऱ्या झाडावर उडत होतो. जसं उजाडू लागलं तसं मी पार घाबरून गेलो. झाडाझाडांवर डोळे चमकताना दिसू लागले. वेगवेगळ्या दिशांना बंदुका रोखल्या होत्या. प्रत्येक बंदुकीमागं एक सैनिक होता. निळ्या डोळ्यांचे शिपाई त्या बंदुकीच्या नळीतून पाहत होते. एक तर झाडावर माझ्या अगदी जवळ होता. माझी सावट त्याला लागली नव्हती. सभोवताली बंदुकीच्या फैरी सारख्या झडत होत्या. मी वर उडताच त्याचं लक्ष माझ्याकडं वेधलं. मला वाटलं की आता जर घाई केली नाही आणि कुठं दुसऱ्या झाडावर लपून बसलो नाही तर तो मला ठार मारल्याशिवाय राहणार नाही. तशा त्यानं अनेक फैरी झाडल्याही होत्या. परंतु मी झाडाच्या दाट पानोळ्यांत लपल्यामुळं बचावलो. मी ठरवलं की न उडता एका एका झाडावरून दुसऱ्या झाडावर टुणटुण उड्या मारीत जायचं. तोपर्यंत धोकाही नाहीसा होईल. अशा रितीनं मी अर्धा एक मैल गेलो असेन. परंतु त्याला खूप अवधी लागला. शेवटी उड्या मारून माझे पाय थकले. मी ठरवलं की धोका असो वा नसो इथून उडून जायचं.

"सुदैवानं मला उडताना कुणी पाहिलं नाही. गोल गोल फेऱ्या घेत मी उंच उडालो. तेथून खालचं सारं जंगल एखाद्या लहान रोपवनासारखं दिसत होतं. माझी नजर अनेक दिशांकडं भिरभिरत होती. पूर्वेला अरुणोदय होत होता. त्या पार्श्वभूमीवर उडणारा विमानाचा समुदाय

एखाद्या सोन्याच्या रथासारखा दिसत होता. याचा अर्थ असा की मी अधिक वेळ इथं रेंगाळलो तर शत्रू माझ्या दिशेनं येईल. म्हणून मी पश्चिम दिशेनं उडू लागलो. त्याक्षणी झाडाझाडांवर लपून बसलेल्या हजारो सैनिकांनी माझ्या दिशेनं बंदुकीच्या फैरी झाडण्यास सुरवात केली.

"मी जेव्हा त्यांच्या झाडावरून गोल गोल फेऱ्या घेत उडू लागलो तेव्हा ते द्विधा मनस्थितीत होते की मी त्यांचा संदेशवाहक तर नाही? पण जेव्हा पश्चिम दिशेनं उडू लागलो तेव्हा त्या सैनिकांची खात्री झाली की मी त्यांचा संदेशवाहक नाही. म्हणून माझ्या दिशेनं फैरी झाडून मला खाली पाडण्याचा त्यांचा बेत होता. अन् त्यांना पाहावयाचं होतं की माझ्या पायाला बांधलेला संदेश काय आहे?

"हिवाळ्यातील आकाश स्वच्छ असलं तरी गोठविणाऱ्या थंड वाऱ्यामुळं मला फार उंच जाणं शक्य नव्हतं. त्याचवेळी शत्रूच्या विमानांच्या कक्षेबाहेर राहणं सयुक्तिक होतं. म्हणून मी पुन्हा पश्चिमेकडं धडकलो. त्याच बरोबर शत्रू सैनिकांनी बंदुकीच्या सतत फैरी झाडून माझ्यापुढं गोळ्यांचा जणू काही मृत्युरूपी अभेद्य तटच उभा केला होता. एक तर त्या गोळ्यांच्या वर्षावातून शिताफीनं सुटणं किंवा त्यातून मार्ग काढता काढताच मृत्यूला समोर जाणं याशिवाय मला पर्यायच उरला नव्हता. ती विमानं समोरून इतक्या जवळ आली होती की त्यातील सैनिक मला दिसायचे. म्हणून मी परत पश्चिमेकडं वळलो. काही महिन्यापूर्वी माझ्या शेपटीला दुखापत झाली होती. सुदैवानं ती आता पूर्ण बरी झाली होती. शेपटी म्हणजे सुकाणूच. त्यावाचून मला असं वेगानं उडणंच शक्य नव्हतं. आमच्या ठाण्याच्या दिशेनं मी उडत होतो. तशा बंदुकीच्या फैरी पुन्हा वाढल्या. झाडाझाडांवर बसलेले बंदुकधारी आणि खंदकात आश्रय घेतलेल्या सैनिकांचा मी एकमेव लक्ष्य ठरलो. गोळ्यांचा अशा वर्षावातून बचाव करून घेण्यासाठी मला ज्ञात असलेल्या अनेक युक्त्यांचा अवलंब केला. कधी वळसे घेत, तर कधी गोलाकार उडत, तर कधी कोलांट उड्या घेत पुढं संचार करीत होतो. परंतु वळसे घेत उडण्यात माझा खूप वेळ गेला. एक विमान तर इतक्या जवळ आलं की त्याला माझा वेध घेणं सहज शक्य होतं. माझ्या मागून आणि वरून फैरी झडतच होत्या. पुढं पुढं जाण्याशिवाय मला गत्यंतर नव्हतं. म्हणून मी मार्ग आक्रमतच होतो. बापरे! मी एखाद्या वादळाच्या गतीनं जीव तोडून उडतच होतो. अन् फटाफट करीत आलेली गोळी मला लागली. मांडीच्या सांध्यात माझा पाय मोडला. ससाण्याच्या पंजाच्या एकाच नखावर चिमणी लोंबत असावी तसं चिठ्ठीसह माझा पाय लोंबत होता. किती वेदना होत होत्या म्हणून सांगू. परंतु या साऱ्या गोष्टींचा विचार करण्यासाठी माझ्याजवळ वेळ नव्हता. कारण ते विमान माझ्या अगदी नजीक आलं होतं. जीवाचं रान करून मी उडतच होतो.

"शेवटी एकदाचा आमचा तळ नजरेच्या कक्षेत आला. मी खाली खाली झेप घेत उतरू लागलो. ते विमान झडप घालीत माझ्याच रोखानं खाली येत होतं. मी कोलांटी घेण्याचा प्रयत्न केला. परंतु ते मला जमलं नाही. माझ्या जखमी पायामुळं मला कसलीही कसरत करता येईना. फट् फट् आवाज करीत आलेल्या गोळीनं माझ्या शेपटीचा वेध घेतला. तसा पिसांचा सडा खाली पडत असताना खंदकात बसलेले जर्मन सैनिक काही क्षण दिसेनासे झाले. या संधीचा फायदा घेऊन मी तिरक्या रेषेत उडत, कोलांट्या घेत तळाच्या कक्षेत खाली झेपावलो. तेवढ्यात एक चमत्कार घडला. माझा पाठलाग करणाऱ्या विमानावर आमच्या सैनिकांनी तोफ डागली. तसं ते विमान झोंकाड्या आणि हेलकावे खात खाली कोसळलं. आगीच्या तोंडात पडणाऱ्या त्या विमानानं मला खूप इजा केली होती. माझ्या उजव्या पंखाला गोळी लागून तो तुटला होता. माझ्या देखत त्या विमानाला आग लागून खाली पडत असल्याचं दृश्य पाहून मला समाधान वाटलं. मला खूप वेदना होत होत्या. जणू काही अनेक बाज लोचून लोचून माझे तुकडे तुकडे करीत आहेत. आमच्या पक्षी कुलाच्या देवाच्या कृपेनं वेदना किंवा सुख या संवेदनाची जाणीवच

माझी शुद्ध गेल्यामुळं हरपली होती. जणू काय आभाळाच्या ओझ्यानं मी खाली कोसळत होतो...

"त्यानंतर एक महिनाभर मी कबुतरांच्या इस्पितळात होतो. माझे पंख दुरुस्त झाले. माझ्या पायाचा सांधाही जोडला गेला. इतकं होऊनही मला काही पूर्वीसारखं उडता येईना. मी एका पायावर हवेत उडायचा प्रयत्न करी, परंतु का कोण जाणं, बंदुकीचे भयानक आवाज माझ्या कानात घुसत असत. डोळ्यासमोर गोळ्यांतून येणारा आगीचा डोंब दिसे. त्यामुळं इतकं भयभीत व्हायचो की मी लगेच जमिनीवर झेपावायचो. तुम्ही म्हणाल की काल्पनिक बंदुकीचे आवाज आणि फैरीच्या अग्निज्वालांचा भास होत असावा. तसं कदाचित असेलही. त्यांचा परिणाम माझ्या मनावर असा झाला की ते भ्रमदेखील मला खरे वाटू लागत. माझ्या पोटात भीतीनं गोळा उठे. माझ्या पंखांना पक्षाघात झाला.

"शिवाय आता महाजनही इथं नव्हता. त्याच्यावाचून मी उडत नसे. ज्यांचा वर्ण पिंगट आणि डोळे निळे आहेत अशा माणसांच्या हातून मी का उडावं? यापूर्वी अशा प्रकारचे लोक मी पाहिले नव्हते. आम्ही कबुतरं असा कोणाचा आणि परक्याचा कधी स्वीकार करीत नाही. शेवटी मला एका पिंजऱ्यात घालून इथं इस्पितळात आणलं. महाजनही त्याच इस्पितळात होता. त्यांनी मला त्याच्याजवळ सोडलं. जेव्हा त्याच्याकडं पाहिलं तेव्हा मी त्याला ओळखू शकलो नाही. मी त्याच्या डोळ्यात पाहिलं. मूर्तिमंत भय त्याच्या नजरेतून ओसंडत होतं! तोदेखील भयाकुल अवस्थेत होता. पशुपक्षी, तसेच मलादेखील भय काय असतं हे माहीत आहे. म्हणूनच महाजनाकडं पाहून मला अतीव दुःख झालं.

"मला पाहताक्षणीच महाजनाच्या डोळ्यातील भीतीचं सावट निघून गेलं, अन् त्याचा चेहरा आनंदानं फुलून आला. तो अंथरुणावर सावरून बसला. मला हातात धरून ज्या पायाला त्यानं बांधलेला संदेश मी नेला होता त्या पायाचं त्यानं हलुवार चुंबन घेतलं. माझा उजवा पंख



कुरवाळीत तो म्हणाला, "नक्षत्रासारख्या दिव्य पंखांच्या पाखरा! संदेश पाठविण्याच्या कामी तुझी योजना केली. ते तू मोठ्या निष्ठेनं करून साऱ्या कपोत कुलाचाच नव्हे तर देशाचाही गौरव वाढविला आहेस." एवढं म्हणून त्यानं पुन्हा एकदा माझ्या चरणाचं चुंबन घेतलं. त्याच्या विनयशील स्वभावामुळं नम्रता म्हणजे काय हे मला शिकायला मिळालं. ते सारं आठवून माझा ऊर भरून गेला. विमानाच्या अपघातानंतर माझे पंख कसे तुटले? मी हिंदी पलटणीच्या खंदकात कसा पडलो? जर चुकीनं मी जर्मनाच्या खंदकात पडलो असतो तर!...त्यांनी माझ्या पायात बांधलेला संदेश मध्येच पकडला असता. आपल्या कुत्र्याबरोबर लपलेल्या आजूबाजूच्या साऱ्या जंगलाला शत्रूच्या पलटणीनं घेराव घातला असता...या साऱ्या स्मृतीनं माझा थरकाप उडाला. काय केलं नसतं त्यांनी आमचं! ज्यानं आमचे प्राण वाचविले तो बिचारा कुत्रा—कुठं असेल तो आता?"



# तिरस्कार आणि भयापासून मुक्ती



"तो कुत्रा, बरं का!" महाजन त्याची हकिकत सांगू लागला, "युद्धाच्या सुरवातीला त्या कुत्र्याची आणि त्याच्या फ्रेंच मालकाची ताटातूट झाली असणार! कदाचित जर्मनांनी त्याचा वधही केला असावा. नंतर शत्रूंनी त्या मालकाच्या घरादाराची लूटमार करून शेवटी ते पेटवून दिलं असणार. या घटनेनं भयाकुल होऊन कुत्र्यानं जंगलाचा आश्रय घेतला असावा. माणसांच्या सावलीपासून दूर अशा घनदाट काटेरी झुडपी जंगलात तो राहू लागला. थडग्यासारखी असलेली अंधारी कोठडीच त्याला बरी वाटत असणार! अन्नाच्या शोधात कदाचित तो फक्त रात्रीच बाहेर पडत असावा. एखाद्या हद्दपारासारखा रात्रंदिवस जंगलात राहिल्यामुळं मूळचा शिकारी कुलातील तो कुत्रा पुन्हा रानटी अवस्थेत जगू लागला.

"पहिल्यांदा जेव्हा त्याची जेव्हा भेट झाली तेव्हा माझा निडरपणा पाहून त्याला आश्चर्य वाटलं. भीतीनं माझ्या शरीराचा वास सुटला नाही. गेल्या अनेक महिन्यानंतर त्याला भेटलेला मी पहिलाच माणूस होतो. माझ्या धाडसी स्वभावामुळंच त्यानं मजवर हल्ला केला नाही.

"आपल्याप्रमाणं मलाही भूक लागली असावी असं त्याला वाटलं. म्हणून तो अन्नाच्या शोधात होता. नंतर त्यानं मला जर्मन रसद आगाराकडं नेलं. जमिनीखालून वाट असल्यानं त्यानं सरपटत आगारात प्रवेश केला. ते आगार म्हणजे अन्नाच्या साठ्यांची जणू सोन्याची खाणच होती. तेथून त्यानं माझ्यासाठी मांसाचा एक तुकडा आणला. त्यावरून मी या निर्णयाप्रत आलो की तिथं नुसताच अन्नाचा साठा नव्हे तर तेल आणि स्फोटक द्रव्यंदेखील असावीत. त्याप्रमाणं नकाशा काढून वरिष्ठाना संदेश पाठविण्याची व्यवस्था केली. ईश्वरकृपेकरून माझा अंदाज बरोबर होता. असो.

"खरं सांगायचं म्हणजे मला लढाईविषयी बोलायला आवडत नाहीय. पहा तिकडं! सूर्यनारायण मावळत आहे. हिमालयाची शिखरं तेजाळ दिसत आहेत, जणू काय गौरीशंकरानं सोन्याचा मुलामा चढविला आहे. आता आपण प्रार्थना करू या :

> असतो मा सद्‌गमय
> तमसो मा ज्योतिर्गमय
> मृत्योर्मा अमृतं गमय
> ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः।

(हे परमात्मन्) नश्वराकडून मला शाश्वताकडे ने—अज्ञानरुपी अंधकारापासून प्रकाशाकडे ने—माझे अज्ञान नष्ट होऊन मला शाश्वत ज्ञान मिळू दे—आमच्या त्रितापांची शांती होवो.)"

ध्यान केल्यानंतर महाजन आमच्या घराबाहेर पडून कलकत्याकडं रवाना झाला. तेथून त्याला सिंगालिला येथील बुद्ध मंदिरात जायचं होतं. तिथल्या साहसाची हकिकत वाचकांना सांगण्यापूर्वी महाजन फ्रान्समधील युद्धाच्या आघाडीवरून आमच्या घरी कसा पोचला हे कथन करावयाला हवं.

"1915 फेबुवारी अखेर बंगाल पलटणीला असं आढळून आलं की चित्रग्रीव यापुढं संदेशवाहकाचं काम करू शकणार नाही. त्याला घेऊन येणारा महाजन काही सैनिक नव्हता. वाघ किंवा बिबट यांच्याशिवाय

आयुष्यात त्यानं कुणाला मारलं नव्हतं. अन् आता तर तोसुद्धा आजारीच होता. या दोघांची यादीत आजारी म्हणून नोंद घेतल्यामुळं त्यांना परत हिंदुस्तानात पाठविण्यात आलं. पहिल्यांदा त्यांना पाहताच माझा डोळ्यावर विश्वास बसेना. महाजन तसेच चित्रग्रीव भयाकुल दिसत होते. उभयतांचं स्वास्थ्यही चांगलं नव्हतं.

"महाजनानं चित्रग्रीवाला माझ्या स्वाधीन केलं. हिमालयाच्या प्रवासाच्या तयारीनं तो मला भेटायला आला होता. प्रयाणापूर्वी तो म्हणाला, "मला भय आणि घृणा यांच्यापासून मुक्त व्हायला हवं. माणसानं माणसांची खूप हत्या करतांना मी बघितलंय. भयाच्या आजारामुळं मला घरी पाठविण्यात आलंय. आता एकांत असलेल्या निसर्गाच्या सान्निध्यात राहून या व्याधीपासून मुक्त होईन."

म्हणून तो सिंगालिला येथील बौद्ध मठात गेला. ध्यान आणि प्रार्थना या नियमित साधनेमुळे त्याला बरे वाटणार होते. मधल्या काळात चित्रग्रीवाला तंदुरुस्त करण्याचा प्रयत्न केला. त्या परिस्थितीत त्याची पत्नी आणि वाढलेल्या पोरांचा त्याला काही उपयोग झाला नाही. पोरांना तर तो परकाच वाटला. कारण त्याने कधी त्यांचे लाड केले नव्हते. परंतु पत्नी त्याची सेवा शुश्रुषा करावयाची. ती त्याला उडण्याची प्रेरणा देऊ शकली नाही. त्याला अजिबात हालचाल करता येत नसे. थोड्या फार तो उड्या घेई. कुठल्याही प्रलोभनामुळे तो हवेत उडण्यास राजी नसे. कबुतरांच्या चांगल्या डॉक्टराकडून त्याचे पंख आणि पाय यांची तपासणी करून घेतली. तेही म्हणाले की आता याच्यात काही दोष नाही. त्याची हाडे आणि दोन्ही पंख ठीक असले तरी अजूनही तो उडू शकत नव्हता. उजवा पंख तो उघडत देखील नसे. जेव्हा तो धावत अथवा उड्या मारीत नसे तेव्हा त्याला एकाच पायावर उभे राहण्याची सवय लागली.

आपल्या पत्नीबरोबर त्याने घरटे बांधले असते तरी मला त्याचे काही वाटले नसते. एप्रिलच्या मध्यानंतर माझी उन्हाळ्याची सुटी चालू



झाली. एके दिवशी मला महाजनाचे पत्र मिळाले. त्यात त्याने लिहिले होते, "चित्रग्रीवानं आता घरटं बांधू नये. जर घरट्यात अंडी असतील तर ती फोडून टाक. ती कुठल्याही परिस्थितीत उबवली जाऊ नयेत. भयगंड झालेल्या चित्रग्रीवाची पिलं चांगली निपजणार नाहीत. त्याला इकडं घेऊन ये. माझी तब्येत आता बरी आहे. चित्रग्रीवाला मात्र लवकर आण. तुला आणि कबुतराला पाहण्याची लामांना खूप इच्छा आहे. शिवाय पाची आभोळ्यांचं याच आठवड्यात दक्षिणेकडून आगमन झालं. त्यांच्या सहवासात चित्रग्रीवाला बरं वाटेल."

महाजनाने दिलेला सल्ला मला पटला. एके दिवशी चित्रग्रीव आणि त्याची सहचरी यांना वेगवेगळ्या पिंजऱ्यात घालून मी उत्तरेकडे प्रयाण केले. मागे असाच आलो तेव्हा शरदऋतू होता. आता वसंत ऋतू सुरु झाला होता. साऱ्या पर्वतमाला कशा आगळ्या वेगळ्या दिसत होत्या. आणिबाणीच्या परिस्थितीमुळे नेहमीपेक्षा काही महिने माझे आईवडील अगोदरच देंटम येथे राहायला गेले. एप्रिलच्या अखेरीस आम्ही स्थिरस्थावर झालो. नंतर चित्रग्रीवाला बरोबर घेऊन मी तिबेटी काफल्याबरोबर सिंगालिला येथे प्रयाण केले. मात्र त्याच्या पत्नीला मुद्दाम मागे ठेवले. मी मनात विचार केला की जर त्याच्या पंखात बळ आले तर तो तिला आतुरतेने भेटायला जाईल. मात्र तो बरा झाला पाहिजे. तिचा विरह तो सहन करू शकला नसता. महाजनालाही तशी आशा होती की नवीन अंडी उबविण्यात तिला मदत करण्यासाठी तो परत येईल हे निश्चित. मी निघायच्या आदल्या दिवशीच माझ्या पालकांनी ती अंडी नष्ट केली होती. कारण आम्हाला त्याची निकृष्ट प्रजा नको होती. अशी प्रजा जन्माला घालणे चित्रग्रीवाला लज्जास्पद होते.

दिवसभर चित्रग्रीव माझ्या खांद्यावर बसलेला असे. त्याच्या सुरक्षिततेसाठी रात्री आम्ही त्याला कुलूपबंद पिंजऱ्यात ठेवत असू. ते त्याच्याच हिताचे होते. पर्वतातील मोकळी स्वच्छ हवा आणि उन्हामुळे त्याच्या आरोग्यात अनुकूल बदल होऊ लागला. परंतु त्या काळात

एकदा देखील माझ्या खांद्यावरून त्याने उडण्याचा प्रयत्न केला नाही. आणि अंडी उबविण्याच्या कामात पत्नीला मदत करण्यासाठीही तो परत गेला नाही.

वसंत ऋतूत हिमालयातील सृष्टी सौंदर्य अलौकिक आणि अवर्णनीय असते. पांढऱ्या व्हायलेटच्या फुलांनी आच्छादलेली जमीन सुंदर दिसे. खोऱ्यातील राजबेरी आता पिकली होती. पाचू वर्णाचे नेचे जणू आपल्या हाताने पर्वताला स्पर्श करू पाहत. निळ्या-जांभळ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर शुभ्र पर्वतमाला अलंकारासारखी शोभे. काही वेळा ओक, एल्म, देवदार आणि चेस्टनट या वृक्षांच्या घनदाट जंगलातून आम्ही जात होतो. एकमेकांना स्पर्श करण्याऱ्या वृक्षांच्या छतांच्या फांद्यांतून सूर्यप्रकाशाची एखादी तिरीपही दिसत नसे. झाडांच्या डहाळ्या एकमेकात गुंतलेल्या होत्या. मुळ्यांचे जंजाळ जमिनीवर पसरलेले. सारी वनस्पती सृष्टी जीवनासाठी आवश्यक असलेल्या प्रकाशाच्या दिशेने उंच उंच जाण्याकरिता धडपडत होती. वृक्षांच्या छायेत वाढलेल्या गवत आणि झुडपांवर हरणे चरताना दिसत. जणू ती वाघा-बिबट्यांचे भक्ष्य होण्यासाठीच जगत असावीत. समृद्ध अशी जीवसृष्टी जिकडे तिकडे पसरलेली. पशुपक्षी आणि वनस्पती यांच्याच अस्तित्वासाठी स्पर्धा चालू होती. जगण्यासाठी चाललेला संघर्ष विसंगत वाटे. त्यापासून कीटक सृष्टीदेखील अलिप्त नव्हती.

जेव्हा अंधारलेल्या वनातून आम्ही बाहेर पडलो तोच समोर उघडी राने पसरलेली दिसली. सूर्य प्रकाशाच्या तापलेल्या झळा आपल्या डोळ्यांना ताप देत होत्या. चतुरांचा समूह हवेत उडतांना एखाद्या सुवर्ण लहरीसारखा भासत होता. फुलपाखरे, रान चिमण्या, दयाळ, भटतितर, पोपट, पपिहा, नीलकंठ आणि मोर इत्यादी पक्षी एका झाडावरून दुसऱ्या झाडावर, तसेच एका शिखरावरून दुसऱ्या शिखरावर जाण्यासाठी धडपडत होते.

रस्त्याच्या एका बाजूला चहाचे मळे आणि आमच्या उजवीकडे



देवदाराचे जंगल होते. उघड्या रानातून चालत आम्ही पुढे चढावाला लागलो. चढणीची वाट मोठी बिकट होती. तिथली हवा इतकी विरळ होती की आम्हाला श्वास घेणे देखील अवघड झाले. ध्वनी आणि प्रतिध्वनी दूरवर जात. साधे कुजबुजले तरी दोन हातावर सहज ऐकू येई. त्यामुळे काफला शांतपणे वाटचाल करीत होता. आवाज यायचा तो फक्त घोड्यांच्या टापाचा. तिथल्या एकांताला आणि शांततेला तडा जाऊ नये म्हणून माणसे, तसेच घोडेदेखील आवाज न करता चालत होते. निळे-जांभळे आकाश निरभ्र होते. उंच आकाशातून क्रौंच पक्ष्यांचा थवा एखाद्या तुतारीसारखा आवाज काढीत उत्तरेकडे जात असे. गगन भरारी मारीत खाली झेप घेणाऱ्या गरुडाच्या पंखाचा आवाज येई. जिकडे तिकडे थंडी पडलेली. आमरीची फुले पहाटे फुलायची अन् जांभळ्या नेत्रांनी आमच्याकडे बघायची. झेंडू पुष्पे पहाटेच्या दंवात ओणावलेली दिसत. खालच्या सरोवरात निळी आणि शुभ्र कमळे उमलून भुंग्यांचे स्वागत करीत होती.

सिंगालिला आता जवळ आले होते. बुद्ध मंदिरांचे कळस दुरून आम्हाला जणू पालवीत. पाखरांच्या पंखांसारखी छते आणि पुरातन भिंती क्षितिजावर गोंदविल्यासारखी दिसत. मी झपाझप पावले टाकीत होतो. थोड्याच वेळात बुद्ध मंदिराकडे जाणारी बिकट वाट धरली.

रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग अशा वृत्तीने जगणारी आम्ही माणसे! तिथे पोचल्यावर मला कसे स्वच्छंद वाटत होते म्हणून सांगू! खाली बालसम वृक्षांचे वन होते. महाजनाबरोबर तिथल्या पाणझरीवर गेलो. तेथे स्नान केले. चित्रग्रीवाला देखील यथेच्छ आंघोळ घातली. त्याला चारापाणी दिले. नंतर महाजनाच्या सोबत भोजन कक्षात प्रवेश केला. तेव्हा बौद्ध भिक्षू आमचीच प्रतीक्षा करीत होते. भोजनगृहात (टेंबुर्णी) एबनीच्या लाकडापासून कोरलेल्या खांबाची रांग होती. समोरच्या खांबांवर सोन्याने काढलेली ड्रॅगनची नक्षी होती. अनेक शतकापासून उभ्या असलेल्या सागवानी लाकडाच्या तुळया आता तेल

मुरून काळ्याशार झाल्या होत्या. त्यावर धातूच्या ठळक कमलपुष्पांचे कोरीव नक्षीकाम होते. ते जाईच्या फुलासारखे नाजूक अनू धातूंप्रमाणे बलवान होते. जमीन तांबड्या कुरुंदाच्या दगडांनी फरसबंद केलेली. नारिंगी रंगाची वस्त्रे घातलेले बौद्ध भिक्षू तेथे भोजनापूर्वीची प्रार्थना म्हणत होते. त्यांची प्रार्थना संपेपर्यंत महाजन आणि मी बाहेर वाट पाहत होतो. शेवटी एका सूरात सामुदायिक प्रार्थनेचा शेवट झाला.

बुद्ध मे शरणम्
धर्म मे शरणम्
ओम् मणि पद्मे ओम् ॥
बुद्धं ज्ञानं शरणं गच्छामः
धर्म शरणं गच्छामः
सत्यरूपरत्ने शरणं गच्छामः

पुढे जाऊन मी महंताना वंदन केले. त्यांनी आनंदाने मला आशीर्वाद दिला. नंतर साऱ्या लामांनाही नमस्कार केला. जमिनीवर बसलो. समोर ओळीने चौरंग मांडण्यात आले होते. उन्हातान्हातून आल्यावर अशा थंडगार जमिनीवर बसण्यात एक वेगळाच आनंद वाटत होता. आमच्या भोजनात वरण, बटाट्याची भाजी आणि वांग्यांचा रस्सा या पदार्थांचा समावेश होता. महाजन आणि मी शाकाहारी असल्याने पुढ्यातील अंडी मात्र आम्ही खाल्ली नाहीत. नंतर हिरव्या पत्तीचा कढत चहा घेतला.

भोजनानंतर आम्ही महंतांच्या विहारात झोपायला गेलो. एखाद्या गरुडाच्या घरट्याप्रमाणे उंच पर्वताच्या कड्यावर त्यांची मठी होती. सभोवताली फर वृक्षांची दाट झाडी. मठी लहानशीच. तिथे नावालाही फर्निचर नव्हते. यापूर्वी असा विहार मी कधी पाहिला नव्हता. आम्ही तिथे बैठक मारल्यावर महंत म्हणाले, "या मठात आम्ही रोज दोन वेळा त्या अनंत दयाघन विश्वंभराची करुणा भाकतो. पृथ्वीवरील साऱ्या राष्ट्रांचं कल्याण व्हावं म्हणून प्रार्थना करतो. सर्वमंगल कामना करतो.



तरीही युद्धं होत आहेत. त्याचा दुष्परिणाम साऱ्या प्राणिमात्रांवर होत आहे. त्यांना माणसाचं भय वाटतं. तिरस्कार वाटतो. मानसिक व्याधी शारीरिक व्याधीपेक्षा वेगानं पसरते. साऱ्या मानवजातीला परस्परांविषयी भय, तिरस्कार, संशय आणि द्वेष वाटतो. या साऱ्या अविद्येपासून मुक्त होऊन नवीन संस्काराची माणसं निर्माण व्हायला एका पिढीचा काळ लागेल."

हे सांगत असताना त्यांच्या गंभीर चेहऱ्यावर दुःखाचे सावट पसरले. गरुडाच्या घरट्याप्रमाणे असलेल्या विहारात राहणारे महंत मानवी जीवनाच्या सुखदुःखा पलीकडचे होते. माणसांच्या वाईट कृत्यांचे पातक ते वाहतच होते. परंतु ज्यांनी जगाला युद्धाच्या खाईत लोटले अशा माणसांची पापे दुष्कृत्यांपेक्षाही अधिक गंभीर होती.

परंतु लगेच मंद स्मित करीत ते म्हणाले, "ते जाऊ द्या. आता आपल्या समवेत असलेल्या चित्रग्रीव आणि महाजनाविषयी बोलू या. जर तुझं कबुतर दिगंतरात पुन्हा उडावं अशी इच्छा असेल तर तुला अमर्याद अशा धैर्यावर ध्यान धारणा करावी लागेल. त्याप्रमाणं महाजन गेले कित्येक दिवस साधना करतोय."

"ते कसं करायाचं महाराज?" मी उतावीळपणे महंताना विचारले. माझ्या या सरळ प्रश्नाने त्यांचा चेहरा विवर्ण झाला. त्यांना मी संकटात टाकले होते. त्यामुळे मलाच त्याची लाज वाटली. सरळ स्वभावाप्रमाणेच उतावळा स्वभावही त्या माणसाची क्षुद्र वृत्ती दर्शवितो.

यावर मला काय वाटले असेल हे जाणून महंत माझी अस्वस्थता घालवीत म्हणाले, "रोज पहाटे आणि सूर्यास्तासमयी चित्रग्रीवाला खांद्यावर घेऊन पुढील मंत्राचा जप कर : 'साऱ्या जीवनात अमर्याद धैर्य आहे. जगणारा प्रत्येक जीवमात्र म्हणजे अनंत धारिष्टाचा निधी आहे. ज्यांना मी स्पर्श करीन त्यांच्यात असीम प्रज्ञेचा प्रवेश व्हावा इतके मला पवित्र कर.' काही काळ तू ही साधना केलीस की एके दिवशी तुझं हृदय, मन आणि आत्मा परिपूर्ण निर्मळ होईल. भय, तिरस्कार आणि

संशय यापासून मुक्त झाल्यामुळं तुझ्या आत्म्यात आलेलं सामर्थ्य कबुतरात प्रवेश करील आणि तोदेखील तसाच बंधमुक्त होईल. जो स्वतःला सर्वाधिक निष्कलंक करील तो आपल्या सामर्थ्यानं जगातील पारमार्थिकता वाढवील. मी दिलेल्या आदेशाप्रमाणं रोज दोन वेळा साधना कर. आमचे लामादेखील तुला साह्य करतील. बघू या तरी, या साधनेतून काय हाती लागेल!"

काही क्षण शांत राहून महंत पुढे म्हणाले, "कुठल्याही माणसापेक्षा महाजनाला प्राण्यांविषयी अधिक ज्ञान आहे. हे तुलादेखील ठाऊक आहेच. आपल्या मनात असलेल्या भीतीमुळं प्राणीदेखील घाबरतात आणि आपल्यावर हल्ला करतात. तुझ्या कबुतरानं मनात इतकी धास्ती घेतली आहे की त्याला वाटतं की सारं आभाळ जणू त्याच्यावर कोसळणार आहे. मळत असलेल्या पानांचे देखील त्याला भय वाटतं. 'छाया देखुनी आपली। शंका अंतरी वाटली॥ भितो आपणा आपण।' अशी त्याची केविलवाणी परिस्थिती झालीय. संशयाची ही लक्षणं आहेत.

"त्या तिथं पलीकडं वायव्य दिशेला गाव दिसतं ना? त्या गावकऱ्यांची गत अगदी चित्रग्रीवासारखीच झाली आहे. या हंगामात दक्षिणेकडील प्राणी उत्तरेकडे स्थलांतर करतात. परंतु गावातील रहिवाश्यांनी त्या प्राण्यांची इतकी दहशत घेतली आहे की त्या निरुपद्रवी रानटी जनावरांना मारण्यासाठी ते बंदुका घेऊन जातात. आश्चर्याची गोष्ट म्हणजे यापूर्वी कधीही हल्ला न करणारी रानटी जनावरं आता गावकऱ्यांवर आक्रमण करू लागली आहेत. रानम्हशी येतात आणि त्यांची पिके खातात. बिबट्या त्यांच्या बकऱ्या पळवून नेतो. आजच वार्ता आली की काल रात्री रानरेड्यानं एका माणसाला ठार केलं. मी त्यांना सांगतो की तुमच्या मनातील भयगंड, प्रार्थना आणि ध्यानाद्वारे काढून टाका. परंतु ते ऐकणार नाहीत."

"महाराज," महाजनाने महंताना विचारले, "त्या गावात जाऊन लोकांना या प्राण्यापासून भयमुक्त करण्याची मला परवानगी का देत नाही?"

"अजून तरी ती वेळ आली नाही," महंतांनी उत्तर दिले, अन् पुढे ते म्हणाले, "जागृतावस्थेत तू भयमुक्त झाला असलास तरी स्वप्नावस्थेत त्या भयाच्या शापापासून अजूनही तू मुक्त झाला नाहीस. काही दिवस प्रार्थना आणि ध्यान करू या. म्हणजे तुझ्या आत्म्याला भयाचा स्पर्श होणार नाही. तू बरा झालास आणि खालच्या गावातील रहिवाश्यांना अजूनही रानटी जनावरांचा उपद्रव होत असेल तर तू तिथं जाऊन त्यांना साहाय्य करू शकशील."



## लामाचा शहाणपणा



सूचना दिल्याप्रमाणे जवळ जवळ दहा दिवस ध्यान धारणेचे व्रत केल्यानंतर महंतांनी मला एकदा चित्रग्रीवास घेऊन बोलाविले. अंजुळीत कबुतराला घेऊन, चढण चढत त्यांच्या विहाराकडे गेलो. महंतांची पीत वर्णाची मुद्रा आज पिंगट आणि तेजःपुंज दिसत होती. त्यांचे बदामी आकाराचे डोळे शांत आणि ओजस्वी दिसत होते. चित्रग्रीवाला त्यांनी हातात धरले आणि म्हटले :

''उत्तरायनातून वाहणारा वायु तुला शुद्ध करो.
दक्षिणायनातून वाहणारा वायु तुला आरोग्य संपन्न करो.
पूर्व आणि पश्चिमेकडून वाहणारा वायु तुला निरोगी दिर्घायुष्य देवो.
भय तुझा त्याग करून जात आहे.
द्वेष तुला सोडून जात आहे.
संशयापासून तू मुक्त होत आहेस.
गतिमान लाटांप्रमाणे धैर्य तुझ्यात प्रवेश करीत आहे.
तुझ्या त्रितापाची शांती झाली आहे.
मनःशांती आणि बळ हेच तुझे पंख.
तुझ्या नेत्रात धीरचित्ताचा प्रकाश पडला आहे.
तुझ्या हृदयात बळ आणि शौर्य वास करतात!
तू निरोगी झाला आहेस.
तू आरोग्य संपन्न झाला आहेस
तू निरामय झाला आहेस.
ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ।

वरील विचारांच्या अनुषंगाने आम्ही सूर्यास्तापर्यंत ध्यान करीत होतो. बाहेर हिमालयाची विविधरंगी शिखरे प्रसन्न अशा प्रकाशाने अलंकृत झाली होती. आमच्या सभोवतालच्या दऱ्या, खोरी आणि वने यांवर जांभळ्या वर्णाचे आवरण होते. चित्रग्रीव उडी घेऊन महंतांच्या हातातून खाली उतरला. विहाराच्या प्रवेशद्वारापर्यंत गेला आणि सूर्यास्ताकडे पाहिले. आपला डावा पंख उघडून तो थांबला. एक एक पीस, एक एक अवयव यांना नवजीवन प्राप्त होत होते. त्याने उजवा पंख हळुवार, सावकाश एखाद्या शिडाप्रमाणे उघडला. लगेच उडून जाण्याचा त्याने अभिनय केला नाही. मौल्यवान आणि नाजूक पंख्याप्रमाणे असलेले पंख त्याने परत मिटले. मावळत्या सूर्यनारायणाला कसे वंदन करावे हे त्याला माहीत होते. एखाद्या पुरोहिताप्रमाणे तो पायऱ्या उतरून खाली आला. नंतर तो दृष्टीआड झाला. त्याच्या पंखाच्या उडण्याच्या आवाजाने मी चकित झालो. खरे काय घडले हे पाहण्यासाठी मी घाईने उठू लागताच महंताने माझ्या खांद्यावर हात ठेवून उठण्यापासून मला रोखले. त्यांच्या ओठावर गूढ स्मित विराजमान झाले.

जे घडले ते मी दुसऱ्या दिवशी महाजनाला सांगितले. तो मार्मिकपणे म्हणाला, ''तू म्हणतोस चित्रग्रीवानं सूर्यास्ताला वंदन करण्याकरिता आपले पंख उघडले! यात काही आश्चर्य नाही. खरं म्हटलं तर पशुपक्षी आध्यात्मिक असतात. परंतु माणसांच्या अज्ञानामुळं त्यांना ते खरं वाटत नाही. माकडं, गरूड, कबुतरं, बिबट्या वाघ तसंच मुंगुस देखील पहाट आणि सूर्यास्त यांच्याकडं पूज्य भावानं पाहतात.'' ''मला तसं दाखवशील?'' मी विचारले. यावर महाजन म्हणाला, ''होय, दाखवेन की, पण यावेळी

नाही. बरं तर आता निघू या. चित्रग्रीवाला सकाळचा चारापाणी देऊ या."

आम्ही जेव्हा चित्रग्रीवाच्या पिंजऱ्याकडे गेलो तेव्हा त्याचे दार उघडेच दिसले अन् आत कबुतर नव्हते. परंतु मला मात्र याबद्दल आश्चर्य वाटले नाही.

लामासराईत वास्तव्याला असेपर्यंत मी रात्री त्याचा पिंजरा उघडाच ठेवत असे. मंदिराच्या परिसरात तो दिसला नाही म्हणून आम्ही ग्रंथालयाकडे गेलो. तिथल्या एका विहारात आम्हाला जमिनीवर त्याची पिसे विखुरलेली दिसली. महाजनाला जवळच भोट कुमारीच्या पायाचे ठसे उमटलेले दिसले. त्यामुळे काहीतरी अघटित घडल्याचा आम्हाला संशय आला. जर भोट कुमारीने त्याच्यावर हल्ला करून ठार मारले असेल तर जमिनीवर रक्त सांडलेले दिसले असते. मग चित्रग्रीव इथून निसटला की काय? काय झाले असेल त्याचे? आता तो कुठे असेल? आम्ही तासभर तरी त्याचा शोध घेत भटकत होतो. शेवटी त्याचा नाद सोडून द्यायचा असे ठरविले. तोच त्याच्या कूजनाचा आवाज कानी आला. पाहतो तो, ग्रंथालयाच्या छतावर तो बसला होता. तिथल्या आढ्याखालच्या घरट्यात आभोळ्यांचे कुटुंब दिसले. त्या जुन्या दोस्तांशी चित्रग्रीव हितगूज करीत होता. त्याच्या कूजनाला आभोळी प्रतिसाद देत असल्याचे ऐकू आले. आभोळा म्हणाला, "चीप् चीप् चीप्!" मी चित्रग्रीवाला आनंदाने हाक मारून त्याचा चारापाणी तयार असल्याच्या– "आ-आ-" अशा आवाजात खुणविले. त्याने आपली मान तिरकस करीत तो आवाज ऐकला. त्याला मी परत एकदा साद घातली तेव्हा कुठे त्याने माझ्याकडे पाहिले. पंख फडफडवीत तो उडत खाली आला अन् माझ्या मनगटावर बसला.

घडले ते असे. ब्राह्ममुहूर्तावर ध्यानाकरिता वर जात असलेल्या पुरोहिताच्या पावलांची सावट ऐकताच चित्रग्रीव पिंजऱ्यातून बाहेर आला असावा. उडत बाहेरच्या विहारात गेला असता तिथे पोरवय



असलेल्या भोट कुमारीने त्याच्यावर हल्ला केला असणार. त्याच्यासारख्या कसलेल्या कबुतराने जीवावर आलेले संकट फक्त काही पिसे देऊन निभावले असणार. अन् ती लहान भोट कुमारी त्याला आशाळभूतपणे पिसांखाली शोधत असणार. त्या संधीचा फायदा घेऊन चित्रग्रीवाने आभाळात भरारी मारली. अरुणोदयाला वंदन करीत उडणाऱ्या जुन्या आभोळी मित्रांची तिथे भेट झाली. मग त्या अवघ्या द्विजगणाने एकत्रित प्रभात समयीची पूजा आटोपली. नंतर एकमेकांशी हितगूज करण्यासाठी ती सारीजणं विहारातील ग्रंथालयाच्या छतावर आली.

त्याच दिवशी बुद्ध मठात वार्ता पोचली की काही दिवसापूर्वी महंतांनी उल्लेख केलेल्या गावात रानरेड्याने धुमाकूळ घातला आहे. तो आदल्या दिवशी सायंकाळी परत आला अन् दोघांना त्याने ठार मारले. त्याच दिवशी सायंकाळी गावातील खळ्यावर गावकऱ्यांचा एक छोटासा मेळावा होता. मेळावा आटोपून हे दोघे परत घरी जात असताना ही घटना घडली. गावकऱ्यांनी महंतांकडे मध्यस्थ पाठवून त्या पशूचा नाश व्हावा म्हणून प्रार्थना करण्याची त्यांना विनवणी केली. नंतर याचना केली की त्या झपाटलेल्या हिंस्र पशूच्या आत्म्याला शांती मिळावी, जेणेकरून भविष्यात त्याचा उपद्रव होणार नाही. महंतांनी त्यांना वचन दिले की चोवीस तासात त्या खुनशी रानरेड्याचा वध करण्यात येईल. महंत गावकऱ्यांना धीर देत म्हणाले, "त्या अनंत दयाघनाची आपणावर कृपा आहे. आता शांतपणे घरी जा. तुमची प्रार्थना सफल होईल. मात्र एकदा रात्र झाली की कुणीही घरांबाहेर पडू नका. घरातच थांबा. शांती आणि धैर्य प्राप्त व्हावे म्हणून ध्यान करा." महाजन त्यावेळी तिथे उपस्थित होताच. त्याने मध्यस्थी असलेल्या गावकऱ्यांना विचारले, "किती दिवसापासून हे जनावर तुमच्या गावाला उपद्रव देतेय?" तेथे जमलेली गावकरी मंडळी म्हणाली की तो गेला आठवडाभर रोज रात्री गावात येतो त्याने यंदाच्या हंगामातील अर्ध्याहून अधिक पिके फस्त केली आहेत." परिणामकारक मंत्रतंत्रांच्या साहाय्याने त्याचा बंदोबस्त करून त्याला नाहीसा करा, अशी याचना

करून ती मंडळी गावाकडे परतली.

ती मंडळी निघून गेल्यावर, जवळच उभ्या असलेल्या महाजनाला महंत म्हणाले, "तू आता बरा झाला आहेस. अपयश तर तुला ठाऊक नाही. आता जंगलात जाऊन त्या खुनी रानरेड्याची कत्तल कर."

"पण महाराज!"

"महाजना, घाबरू नकोस. ध्यानामुळं तू आता तंदुरुस्त झाला आहेस. इथल्या साधनेमुळं जे काही तू साध्य केलं आहेस त्याची परीक्षा जंगलात करण्याची हीच वेळ आहे. मौनामुळं माणसाला सामर्थ्य आणि तारतम्य प्राप्त होतं. त्याचं प्रत्यंतर लोकांत पाहिलं पाहिजे. दोन दिवसात तू यशस्वी होऊन परत येशील. जातांना या मुलाला आणि कबुतराला बरोबर घेऊन जा. शिकार करण्याच्या तुझ्या कौशल्याबद्दल मला पूर्ण खात्री आहे. नाहीतर सोळा वर्षाच्या या पोराला शिकार मोहिमेवर नेण्यास मी सांगितलं नसतं. जा, त्या खुनी पशूचा संहार करून गावकऱ्यांची चिंता दूर कर."

त्या दिवशी दुपारीच आम्ही जंगलाची वाट धरली. जंगलात आणखीन एक रात्र राहायला मिळेल या विचारानेच मला अतिशय हर्ष झाला. महाजन आणि कबुतराबरोबर जाण्यात केवढा आनंद वाटत होता म्हणून सांगू! ते उभयता संपूर्णपणे बरे होऊन रानरेड्याच्या शोधार्थ चालले होते. जगात असा कोणी पोर असेल काय, की जो अशी हातची संधी घालवेल?

झाडावर चढण्यासाठी दोरखंडाची शिडी, रानरेड्याला पकडण्यासाठी फास असलेली लांब दोरी, कुकरी इत्यादी आवश्यक त्या साधन सामग्रीसह आम्ही जंगलाची वाट धरली. चित्रग्रीवाला माझ्या खांद्यावर बसविले. हिंदुस्थानातील सामान्य नागरिकांनी बंदुकीचा उपयोग करू नये असा ब्रिटिश सरकारचा नियम होता. म्हणून आमच्या बरोबर बंदूक घेतली नाही.

बौद्ध मठाच्या वायव्य दिशेला असलेल्या गावात पोचायला दुपारचे



तीन वाजले. तिथून पावलांच्या ठशांवरून रानरेड्याचा मागोवा घेत आम्ही निघालो. घनदाट जंगलातून, तसेच रानातून त्याच्या पाऊलखुणा शोधत शोधत वाटचाल करीत होतो. कुठे ओढा ओलांडावा लागे, कुठे आडव्या पडलेल्या पुरातन आणि प्रचंड वृक्षावरून चढउतार करावी लागली. रानरेड्याच्या खुरांचे ठसे किती रेखीव आणि खोलवर रुतलेले होते!

हे पाहून महाजन म्हणाला, "रानरेडा जीवाच्या भयानं पळत सुटला असावा! बघ तरी, इथली जमीन त्याच्या वजनामुळं किती खोलवर दबली आहे. एरवी निर्भयपणं संचार करीत असलेली रानटी जनावरं मागं अशा पाऊलखुणा क्वचितच सोडतात. अशा परिस्थितीत मृत्यूच्या भयाचं ओझं देखील त्यांच्या शरीरावर पडतं. हे जनावर जिथं जिथं गेलं तिथं तिथं त्याच्या पावलांचे रेखीव आणि मोठे ठसे दिसतात. तो कितीतरी भ्याला असेल!"

जी नदी पार करावयाला अतिशय अवघड होती तिथे आम्ही पोचलो. महाजनाच्या अंदाजाप्रमाणे या नदीचा प्रवाह इतक्या वेगाने वाहत होता की त्यात पायदेखील ठरत नव्हते. आश्चर्य म्हणजे ती नदी ओलांडण्याचे धैर्य रानरेड्यालाही झाले नव्हते. म्हणून मागे सोडलेल्या पाऊलखुणांवरून नदीकाठी त्याच्या ठशांचा मागोवा घेत गेलो. थोड्याच वेळात एका ठिकाणी त्याच्या परतीच्या पाऊलखुणा दिसू लागल्या, त्या पार घनदाट जंगलात नाहीशा झाल्या होत्या. यावेळी सायंकाळचे पाच देखील वाजले नव्हते. तरीही त्या जंगलात जिकडे तिकडे अंधार पसरलेला होता. इथून रानरेड्याला गावात जायला अर्धा तास देखील लागत नसावा.

महाजनाने मला विचारले, "तुला पाण्याच्या प्रवाहाचा नाद ऐकू येतोय काय?" जवळच असलेल्या देवनळाच्या बेटातून आणि लव्हाळ्यातून घोंगावत वाहणाऱ्या प्रवाहाचा आवाज बऱ्याच वेळाने माझ्या कानी आला. जवळ नदी सरोवराला जाऊन मिळत होती. महाजन किंचित

मोठ्या आवाजात म्हणाला, "तो खुनशी रानरेडा इथलं जंगल आणि सरोवरातील झिलाणीचा आश्रय घेऊन स्वस्थपणं विसावा घेत असावा. पलीकडच्या झाडांच्या जोडीवर आपलं मचाण बांधू या. आता अंधारू लागलंय. माझी खात्री आहे तो लवकरच इथं येईल. अशावेळी खाली थांबणं धोक्याचं आहे. या दोन झाडांमध्ये चार फुटांचं अंतरदेखील नाही!" मला त्याच्या शेवटच्या बोलण्याचे आश्चर्य वाटले. मी त्या झाडांकडे पाहू लागलो. ती झाडे उंच आणि आकाराने विस्तृत होती. त्या दोहोंतील वाट इतकी निमुळती होती की आम्ही कसे तरी एकामागून एक असे चालू शकलो असतो.

आपण भ्यालो की अंगाला घाम सुटतो. त्यात भीतीचा अंश असतो. भीती मिश्रित घामाने आपले कपडे ओले होतात. अशा कपड्यांतून भीतीचा वास जात नाही. म्हणून महाजन म्हणाला, "भीतीचा वास असलेला कोट या दोन झाडांमधील जागेवर फेकून देईन." महाजनाने त्याच्या कोटाखाली नेसलेले जुने कपडे अंगावरून उतरविले. ते अद्यापपर्यंत त्याच्या अंगातच होते. त्याने ते जमिनीवर ठेवले आणि एका झाडावर चढला. वर जाताच त्याने दोरखंडाची शिडी खाली सोडली. मी त्यावरून चढत असता खांद्यावर बसलेला चित्रग्रीव आपला तोल सांभाळण्यासाठी पंखांची फडफड करीत होता. महाजन जेथे बसला होता तेथे आम्ही सुरक्षित पोचलो. अंधार झपाट्याने वाढत होता. आम्ही काही वेळ शांतपणे बसलो.

तिन्ही सांजा होताच एक गोष्ट माझ्या लक्षात आली ती म्हणजे तेथील समृद्ध पक्षी जीवन. सारंग, बगळे, धनेश, भटतितर, जीवजीवक, गाणारी चिमुकली पाखरे, पाचूच्या माळांसारख्या दिसणाऱ्या पोपटांच्या थव्यांनी ते वन मुखरित झाले होते. भुंग्यांचा गुंजारव, सुतार पक्ष्याचे ठोक् ठोक्, गरुडाच्या क्रेंकार या साऱ्यांचा संमिश्र आवाज, पर्वतातून धों धों वाहत येणाऱ्या जलप्रवाहाच्या गर्जनेत विसर्जन पावत होता. तोच नुकतेच जागे झालेल्या तरसांचे हसणे कानावर पडत होते.



ज्या झाडावर आम्ही मचाण बांधले होते ते खूप उंच होते. आम्ही जरा उंचावर चढून टेहळणी केली की तिथे बिबट्या वाघ किंवा साप लपून तर बसला नाही ना! अगदी बारकाईने तपासणी करून जवळ जवळ असलेल्या दोन फांद्यांची निवड केली. त्यावर दोरखंडाची शिडी बांधून त्याचा झुलता पाळणा केला. तिथल्या बैठकीवर स्थानापन्न झाल्यावर महाजनाने माझे लक्ष आभाळाकडे वेधले. मी लगेच वर पाहिले. माणिक रत्नासारखे लाल पंख असलेला एक मोठा गरुड आकाशात तरंगत होता. जंगलातून काळोख वर वर येत होता. कपोताच्या निळ्या पंखाप्रमाणे आकाश सुंदर दिसत होते. तो गरुड एकटाच प्रदक्षिणा घालीत होता. महाजनाचे म्हणणे असे की तो पक्षिराज मावळत्या सूर्यनारायणाला वंदन करीत आहे. त्या गरुडाच्या अस्तित्वामुळे पाखरांचे आणि कीटकांचे आवाज हळूहळू कमी होत होते. तो जरी उंच आकाशात विहार करीत असला तरी पुढे मागे उडत उडत तो जणू सूर्यनारायणापुढे नतमस्तक होत होता. जणू त्याच्या प्रती आदर प्रकट करण्यासाठी सारा पक्षिगण शांत झाला. त्याच्या पंखातून लाल रंगाच्या अग्निज्वाला निघत होत्या. तोच त्याचे रूपांतर सोनेरी चटक चांदण्यांची किनार असलेल्या जांभळ्या शिडात झाले. शेवटी त्याचे नमन पूर्ण झाल्यावर तो उंच उडाला, अन् देदीप्यमान अशा पर्वत शिखरांत दिसेनासा झाला. रानरेड्याचे क्रुद्ध हंबरणे ऐकू येत होते. त्याच्या भीषण डरकाळीमुळे जिकडे तिकडे खळबळ माजली. जवळच असलेल्या घुबडाचा धुत्कार ऐकू येत होता. त्यामुळे चित्रग्रीव भीतीने माझ्या छातीला बिलगला. इतक्यात रात्रौगा (Nightingale) पक्ष्याप्रमाणे असलेला हिमालय डोईल (Doel) या रात्रिंचर पक्ष्याचे मनाला मोहित करणारे सुस्वर गाणे ऐकू येऊ लागले. जणू परमेश्वरानेच अलौकिक बासरी वाजवावी तसा त्या दिव्य मधुर स्वरांचा साऱ्या चराचर सृष्टीवर वर्षाव झाला. तो वर्षाव झाडांच्या त्वचेतून पाझरत पाझरत मुळ्यांतून धरतीमातेच्या हृदयापर्यंत पोचला.

हिमालयातील त्या रात्रीच्या सौंदर्याचे किती आणि कसे वर्णन करावे? किती मधुर, किती शांत. तिच्या सुखद स्पर्शाने तर माझे डोळे झोपेने मिटू लागले. महाजनाने माझ्या अंगाभोवती दोरीचा वेढा देऊन झोपेत झाडावरून खाली पडणार नाही याची दक्षता घेतली होती. नंतर त्याच्या खांद्यावर डोके विसावून मी सुखाने झोपलो. तत्पूर्वी आपला बेत मला सांगताना तो म्हणाला, ''जे कपडे फेकून दिले ते मी भीतीग्रस्त काळात माझ्या अंगावर घातले होते. त्याला एक चमत्कारिक वास आहे. त्यामुळे रानरेड्याला त्या वासाचा सुगावा लागताच जर तो इथं येईल तेव्हा तोही भ्यालेलाच असल्यानं भ्यालेल्या माणसाच्या कपड्यांचं त्याला आकर्षण वाटेल. जर जो टाकलेल्या कपड्याच्या शोधात इथं आला तर आपलं काम अधिक सोपं होणार आहे. आपण त्याला दोरीच्या फासात पकडून एखाद्या रेडकाप्रमाणं बांधून गावात नेऊ शकू.'' पण माझे डोळे मिटू लागल्यामुळे त्याचे पुढील बोलणे मला ऐकू आलेच नाही.

मी किती वेळ झोपेत होतो हे मला ठाऊक नाही. मला जाग आली ती जनावराच्या हंबरण्याच्या भीतिदायक आवाजाने. मी खडबडून डोळे उघडले तेव्हा महाजन जागाच होता. माझ्याभोवती वेढा दिलेली दोरी त्याने सोडली आणि खाली पाहावयास सांगितले. पहाटेच्या अंधुक प्रकाशात सुरुवातीला मला काहीच दिसेना. परंतु त्या त्रस्त प्राण्याचे हंबरणे आणि डरकाळ्या ऐकू येत होत्या. उष्ण कटिबंधात दिवस लवकर उगवतो. मी खाली लक्षपूर्वक पाहिले. दिवसाच्या वाढत्या प्रकाशात आता मला जे दिसले त्यात कोणाचे दुमत होणे शक्य नाही. आम्ही ज्या झाडावर बसलो होतो त्याच्या बुंध्याला पहाडासारखे काळेभोर धूड आपले अंग घासताना दिसले. त्याची लांबी दहा फूट तरी असावी. त्याचे अर्धेअधिक शरीर झाडाझुडपांच्या पानांत झाकले होते. सूर्यप्रकाशात एखाद्या हिरव्या भट्टीतून काळा स्फटिक बाहेर निघावा तसे त्या श्वापदाकडे पाहून वाटत होते. मला वाटले, अरण्यात रानरेडा धष्टपुष्ट आणि तकाकित दिसतो. प्राणिसंग्रहालयात मात्र घाणेरडा, चिखलाने माखलेला आणि अस्वच्छ कातडीचा दिसतो. या रानरेड्याला जे कोणी प्राणिसंग्रहालयातील पिंजऱ्यात पाहतात त्यांना अरण्यात हा किती देखणा दिसतो हे कधी कळणार तरी आहे काय? किती केविलवाणी परिस्थिती असते त्याची. बहुतेक तरुण मंडळी अशा प्राण्याला अरण्यात पाहण्याऐवजी बंदीवासात बघतात. त्या आधारे त्यांना या देवाघरच्या प्राण्याविषयी माहिती मिळते. हा प्रकार म्हणजे तुरूंगात असलेल्या कैद्यांवरून बाहेरच्या जगातील माणसाची नैतिक पातळी अजमावण्यासारखी आहे. हे पिंजऱ्यात ठेवलेल्या प्राण्याकडे पाहून कसे सांगता येईल बरे?

माझ्या कोटाखालून चित्रग्रीवाला मोकळे सोडून देताच तो झाडावर उडू लागला. त्या झाडाच्या फांद्या फांद्यावरून आम्ही उतरत शेवटच्या फांदीपर्यंत येऊन पोहोचलो. तेथून रानरेडा दोन फूट खाली होता. महाजनाने फासाच्या दोरीचे एक टोक झाडाच्या बुंध्याला त्वरित बांधले. ते काही रानरेड्याच्या मुळीच लक्षात आले नाही. महाजनाने जे कपडे खाली फेकून दिले होते त्याच्याशी रानरेडा शिंगाने खेळत खेळत त्यांच्या चिंध्या चिंध्या करीत होता. ते कपडे महाजनाने वापरले होते, त्याचा वास त्या कपड्यांना लागला होता. त्या गंधामुळेच रानरेडा त्याकडे आकर्षित झाला होता. त्याची शिंगे जरी स्वच्छ होती तरी मस्तकावर ताज्या रक्ताचे डाग दिसत होते. म्हणजे रात्री गावात जाऊन आणखी एका माणसाला त्याने ठार मारले असणार. त्यामुळे महाजन बेचैन झाला होता. तो माझ्या कानात कुजबुजत म्हणाला, ''आपण त्याला जिवंत पकडू या. हा फास असलेला दोर वरून तू खाली त्याच्या शिंगावर सोड.'' लगेच दोरीच्या साहाय्याने उडी घेऊन महाजन रानरेडा जिथे उभा होता तिथे त्याच्या मागच्या बाजूला गेला. त्यामुळे तो प्राणी बिचकला. त्याच्या उजव्या बाजूला जवळच झाड आल्यामुळे त्याला काही पळता आले नाही. आणि त्याच्या डाव्या अंगाला असणाऱ्या झाडावर मी उभा होतो. त्या दोन झाडांमधून बाहेर यायचे तर

रानरेड्याला त्यामधून पुढे किंवा मागे हटावे लागले असते. परंतु हे सारे घडण्यापूर्वीच फास असलेली दोरी मी त्याच्या डोक्यावर फेकली. विजेच्या धक्क्यामुळे चकित व्हावा तसा तो दोरीच्या स्पर्शाने चमकला. फासातून सुटका करून घेण्याच्या प्रयत्नात तो मागे सरकला. महाजन लगेच तेथून दुसऱ्या झाडाच्या आश्रयाला गेला नसता तर खालीच कोलमडायाचा. परंतु तो थोडक्यात बचावला. जर तो खाली पडता तर रानरेड्याने क्षणात तुडवून त्याचा चेंदामेंदा केला असता. पण हे सारे घडण्याआधीच तो दुसऱ्या झाडाआड पोचला होता. फासात त्याची दोन शिंगे अडकण्याऐवजी एकच शिंग सापडले होते असे मला आढळून आले. त्याक्षणी भीतीने ओरडून मी महाजनाला म्हणालो, "सावध राहा! त्याचे एकच शिंग फासात अडकले आहे. त्यामुळे कुठल्याही क्षणी फास निसटून जाण्याची शक्यता आहे. पळ! कुठल्या तरी झाडावर लवकर चढ."

यावर त्या पट्टीच्या शिकाऱ्याने माझे ऐकले नाही. त्याऐवजी तो काही अंतरावर शत्रूच्या समोर उभा ठाकला. नंतर त्या हिंस्र श्वापदाने किंचित डोके उगारून महाजनाच्या दिशेने धाव घेतली. मी तर भीतीने गर्भगळीत होऊन डोळेच मिटून घेतले.

मी पुन्हा डोळे उघडून पाहिले की तो रेडा शिंगात अडकलेला दोर ओढत होता. त्यामुळे महाजन ज्या झाडाआड उभा होता त्यावर धडक देता आली नाही. त्याच्या त्या राक्षसी डरकाळीमुळे सारे जंगल दणाणून गेले. त्या आवाजाचा प्रतिध्वनी एखाद्या घाबरलेल्या मुलाच्या किंकाळीसारखा वाटला.

अजूनही रेडा त्याच्यापर्यंत पोचला नव्हता. हातभर लांब आणि चार बोटे रुंद असलेल्या पात्याची धारदार कुकरी महाजनाने बाहेर काढली अन् उजव्या बाजूच्या झाडाआड तो हळूच सटकला. नंतर तो दिसेनासा झाला. पूर्वी जेथे महाजनाला त्याने पाहिले होते त्या दिशेने रेड्याने सरळ मुसंडी मारली. सुदैवाने ती दोरी शिंगाला अजूनही पक्की बसलेली होती.



इथे महाजनाने वेगळीच युक्ती लढविली. तो रेड्याच्या विरुद्ध दिशेने झाडाझाडांतून वळणे घेत घेत धावू लागला. आपला वास त्या रेड्याला येणार नाही इतक्या अंतरापर्यंत महाजन दूर गेला. चकित झालेल्या रेड्याने वळसा घेऊन पाठलाग सुरू केला. झाडाखाली पडलेले कपड्याचे गाठोडे दिसताक्षणीच रेड्याला पुन्हा चेव आला. त्यामुळे तो वेडापिसा झाला. कपड्यांना हुंगून त्यावर शिंगाने ढुसण्या मारीत होता.

आता महाजन वाऱ्याच्या खालच्या दिशेला होता. तो दिसेनासा झाला. मला वाटले की रेडा जरी झुडपाआड असला तरी वासामुळे महाजनाला नक्कीच त्याचा सुगावा लागला असणार. शिंगे गाठोड्यात खुपसून त्या जनावराने पुन्हा डरकाळी फोडली तसा सारा आसमंत त्या रौद्र आवाजाने दणाणून गेला. कुठून तरी माकडांचा कळप एका झाडावरून दुसऱ्या झाडावर उड्या मारीत अवतीर्ण झाला. खारी झाडावरून जमिनीवर आणि जमिनीवरून झाडावर घाईने चढत उतरत होत्या. नीलकंठ, सारंग, आणि थव्यातून उडणाऱ्या पोपटांचा आवाज येत होता. कावळ्यांची काव-काव, घारींचा चीत्कार, आणि घुबडांचा धुत्कार चालू होता. रानरेडा पुन्हा त्वेषाने पुढे आला. समोरच महाजन शांतपणे उभा होता. त्याच्या इतका धैर्यवान माणूस माझ्या आयुष्यात पाहिला नाही. रानरेड्याचे मागचे पाय थरथर कापत होते. फासाच्या दोरीचे एक टोक झाडाला बांधले होते, त्या दोरीला ताण बसल्यामुळे तो मागील दोन पायावर उभा राहिला आणि जमिनीवरून अनेक फूट उंच उडाला अन् खाली कोसळला. त्याक्षणी एखाद्या काटकीसारखे त्याचे शिंग मोडून हवेत उडाले. या धडपडीत तो एका अंगाने जमिनीवर आदळला. आपले पाय जोराने हवेत हलवीत तो लोळत होता. त्याक्षणी महाजन विजेसारखा पुढे धावला आणि तो रेडा पुन्हा उठण्याआधीच त्याने कुकरीने त्याच्या मानेवर घाव घातला. धारदार पाते त्याच्या मानेत खोलवर रुतून बसताच महाजनाने आपल्या शरीराचा भार सर्वशक्तीनिशी त्या कुकरीवर दिला. तोच ते तीक्ष्ण लखलखते पाते त्याच्या मानेत

आरपार गेले. एखादा ज्वालामुखी पर्वत जागा व्हावा तशी त्याने भयंकर डरकाळी फोडली. तेव्हा सारे जंगल त्या भीषण आवाजाने दणाणून गेले. माणकासारख्या लालभडक रक्ताच्या चिळकांड्या उंच उडाल्या. ते भीतिदायक दृश्य मला पाहवेना. तेव्हा मी पुन्हा डोळे बंद केले.

काही वेळाने मी झाडावरून खाली उतरलो. पाहतो तो अति रक्तस्त्रावामुळे रेडा रुधिराच्या थारोळ्यात मरून पडला होता. रेड्याशी झालेल्या झटापटीमुळे महाजन खूप थकला होता. त्या मृत शरीराजवळच तो आपले अंग पुसत बसला होता. मी त्या झाडाजवळ जाऊन चित्रग्रीवाला साद घातली. त्याने प्रतिसाद दिला नाही. म्हणून मी झाडावर चढून पार शेंड्यापर्यंत त्याचा शोध घेतला, परंतु व्यर्थ—तो तिथे दिसला नाही. मी खाली येईपर्यंत महाजनाने हातपाय तोंड धुतले होते. त्याने आभाळाकडे बोट दाखविले. प्राण्यांचे कुजके मांस खाणारे पक्षी उडताना दिसत होते. घारी खालच्या पातळीवर अन् त्याच्या कितीतरी उंचावर गिधाडे विहार करीत होती. जंगलातील मृत प्राण्याचा त्यांना सुगावा लागला होता. आज आपणाला मेजवानी मिळणार याची पूर्वकल्पना त्यांना आली होती.

महाजन म्हणाला, "कबुतर आपणाला लामासराईमध्ये भेटेल. निश्चितच तो इतर पाखरांबरोबर उडून गेला आहे. इथून आपण लवकर निघूया. परंतु घराकडे परतण्यापूर्वी मला मृत रानरेड्याची मापे घ्यायची आहेत." तोपर्यंत चोहोकडून त्याच्या शरीरावर माशा घोंगावत होत्या. त्याची लांबी दहा फूट सहा इंच भरली. आणि पुढील पायाची उंची तीन फुटांपेक्षा अधिक होती.

अगदी शांतपणे आम्ही बुद्ध मंदिराची वाट धरली. गेले अनेक दिवस त्रस्त असलेल्या गावात पोचलो. तेव्हा दुपारची वेळ झाली होती. नायकाला कळविले की त्यांच्या दुष्मनाचा नायनाट झाला आहे. या बातमीने गावात खळबळ उडाली. ती वार्ता ऐकून त्याने एकदा सुटकेचा श्वास घेतला. परंतु तो दुःखी होता. कारण आदल्या दिवशीच्या



सायंकाळी गावातील मंदिरात देवदर्शनाला गेलेल्या त्याच्या आईला रेड्याने ठार मारले होते.

आमच्या पोटात आता कावळे ओरडू लागले होते म्हणून आम्ही झपाट्याने चाललो होतो. लवकरच बुद्ध मंदिरात पोचलो. तेथे लगेच मी चित्रग्रीवाविषयी चौकशी केली. पण तिथेही त्याचा ठावठिकाणा लागला नाही. काय करावे हे समजेना. आम्ही चिंताग्रस्त अवस्थेत महंतांच्या विहारात पोचलो. तेव्हा ते म्हणाले, "महाजन, तू जसा सुरक्षित आहेस तसेच ते कबुतरदेखील सुखरूप आहे." नंतर ते बराच वेळ शांत होते. ते म्हणाले, "तू अस्वस्थ दिसतोस. कसला एवढा विचार करतोस?

तो अनुभवी शिकारी काय उत्तर द्यावे याचा शांतपणे विचार करीत होता. तो म्हणाला, "काही नाही महाराज. एक गोष्ट मनाला लागली. हिंसा करणं मला आवडत नाही. त्या रेड्याला मला जिवंत पकडावयाचा होता. अरेरे! मला नाईलाजानं त्याची हत्या करावी लागली. जेव्हा त्याचं शिंग मोडलं तेव्हा आम्ही एकमेकाच्या समोर आलो. पण विवशतेनं त्याच्या मानेवरून कुकरी फिरवावी लागली. प्राणिसंग्रहालयास विकण्यासाठी त्याला जिवंत पकडता आलं नाही याबद्दल मला खंत वाटते."

यावर मी लगेच उद्गारलो, "महाजन, तू पक्का व्यवहारी आहेस! मला नाही दुःख होत तो रेडा मेल्याबद्दल. प्राणिसंग्रहालयातील पिंजऱ्यात आयुष्यभर कोंडून राहण्यापेक्षा मरण पत्करले. त्या जिवंत मरणापेक्षा मृत्यू बरा."

महाजन मला टोमणा मारीत म्हणाला, "तू जर त्याच्या दोन्ही शिंगांवर बरोबर फास टाकला असतास तर—एवढं रामायण घडलं नसतं."

महंत किंचित मोठ्याने म्हणाले, "जे होऊन गेलं त्याचा विचार नको. तुम्ही दोघांनी चित्रग्रीवाविषयी विचार करावयाला हवा."

"होय. खरंच महाराज," महाजन म्हणाला, "उद्या आपण त्याचा शोध घेऊ या."

परंतु महंत लगेच म्हणाले, "नाही पोरा, आता देंटमला परत जा. घरच्यांना तुझी काळजी वाटतेय. मला त्यांच्या मनातील विचार कळतात."

दुसऱ्याच दिवशी घोड्यावर स्वार होऊन आम्ही देंटमला रवाना झालो. घाई करीत आणि ठिकठिकाणाच्या चौकीवर दिवसातून दोनदा घोडे बदलत देंटमला पोचायला तीन दिवस लागले. घरची वाट धरल्यावर आमचा घरगडी वाटेतच भेटला. त्याने अधीरतेने सांगितले, "चित्रग्रीव तीन दिवसापूर्वी परत आला. तुम्ही त्याच्या सोबत न आल्यामुळं आई बाबांना खूप काळजी वाटू लागली. जिवंत अथवा मृत परिस्थितीत तुम्हाला शोधण्यासाठी त्यांनी अनेकांना रवाना केलं."

मी त्याच्याबरोबर पळतच घर गाठले. आईने मला प्रेमाने जवळ घेतले. अन् चित्रग्रीव माझ्या मस्तकावर बसून तोल सांभाळण्यासाठी पंखांची फडफड करीत होता.

चित्रग्रीव उडत उडत शेवटी घरी आला तर. याचा मला किती किती आनंद झाला म्हणून सांगू! लामासराई ते देंटम एवढे लांब अंतर कापीत तो घरी आला होता. तो वाटेत कुठेही अडखळला नाही की थकला नाही! महाजनाबरोबर झपाट्याने पावले टाकीत असता मी मनात म्हणालो, "वायुचा तू आत्मा आहेस. कपोत कुळातील तू हिरा आहेस."

येणेप्रमाणे सिंगालिलाच्या यात्रेची इतिश्री झाली. युद्धभूमीवर भय आणि तिरस्कार यांनी पछाडून गेलेले चित्रग्रीव आणि महाजन बरे झाले. जीवनातील अशा वाईट अधिव्याधीतून एखादा आत्मा जरी बरा झाला तर खूप काही मिळविले म्हणायचे.

या कथेच्या अखेरीला मला काही प्रवचन देण्याची इच्छा नाही. परंतु एक गोष्ट सांगितल्याशिवाय राहवत नाही :

"आपण जसा विचार करतो आणि आपणाला जे भावतं, त्यांचा परिणाम आपल्या उक्तीत आणि कृतीत होत असतो. जो कोणी अजाणपणे भ्याला असेल किंवा ज्याची स्वप्नं तिरस्कारानं भरली असतील तर लवकर किंवा उशिरा हे दुर्गुण तुम्हाला अटळपणं दुष्कृत्य करण्यास प्रवृत्त केल्याशिवाय राहणार नाहीत. म्हणून माझ्या बंधूंनो, धैर्यानं जगा. श्वासागणिक निर्भयपणं राहा. अन् दुसऱ्यांना धीर द्या. प्रेमानं वागा. फूल सहज सुगंध देतं. त्याला कशाची अपेक्षा नसते. अशाच निरपेक्ष वृत्तीनं विश्वावर प्रेम करीत राहिलं तर जगात शांतता आणि पावित्र्य नांदेल."

Lasertypeset by Ess Ess Enterprise, New Delhi and
printed at D. R. Printers and Convertors Pvt. Ltd., Noida

